नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६६ * * नागपूर * मंगळवार, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## राहुल यांच्या आरोपांची चौकशी व्हावी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :
माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस.वाय. कुरेशी यांनी रविवारी निवडणूक आयोगावर तीव्र टीका केली आणि म्हटले की, त्यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरण्याऐवजी मतचोरीच्या आरोपांची चौकशी करायला हवी होती.

पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत कुरेशी म्हणाले की, राहुल यांनी आरोप करताना 'हायड्रोजन बॉम्ब' सारखे अनेक राजकीय शब्द वापरले आहेत परंतु हे केवळ 'राजकीय वक्तृत्व' आहे. असे असूनही, त्यांनी उपस्थित केलेल्या गंभीर तक्रारींची सविस्तर चौकशी व्हायला हवी होती.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## वनवासी चव्हाण

देशाचे गृहमंत्री, संरक्षण मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अशा सर्वोच्च प्रतिभेच्या शंकरराव चव्हाण यांचे सुपुत्र मा. ना. अशोकजी चव्हाण हे आहेत. त्यांनी यापूर्वी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात अनेक बड्या बड्या खात्यांचे माजी मंत्री आणि माजी मुख्यमंत्री ही सर्व पदे काँग्रेसमध्ये भोगून नामे अशोक शंकरराव चव्हाण हे दोन वर्षांपूर्वी भाजपवासी झालेले आहेत. माननीय शंकरराव चव्हाण यांच्या सुपुत्रांना कोणीतरी संपवण्याच्या मागे लागलेले होते, असे त्यांचे विधान आहे.? मात्र त्यांना कोण संपवायच्या मागे लागलेले होते याचा खुलासा त्यांनी केलाच नाही. जर त्यांनी हा खुलासा केला असता तर नेमके कोण त्यांना संपवायला निघाले होते हे सुद्धा समजले असते. मोठे चव्हाण साहेब म्हणजे त्याकाळचे राज्यातील प्रतिभावंत नेते होते म्हणजे त्यांचेही सुपुत्र कसल्याच प्रतिभेचे नव्हते असे आमचे म्हणणे नाही. मग आता त्यांनी काँग्रेसमध्ये त्यांना कोण संपवायला निघाले होते याचा खुलासा जरूर करावा. अशोक चव्हाण यांना महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची सत्ता गेल्यावर वनवासात जावे लागले याचा शाब्दिक अर्थ घेऊ नये, कारण सत्ता असली म्हणजे राजविलास आणि सत्ता नसली म्हणजे मुंबई व्हाया दिल्ली ते नांदेड मध्ये राहूनही वनवास असा या वनवासाचा अर्थ घ्यावा काय? आता ज्या पक्षात आहेत तिथे ते खास असल्यामुळे खासदार आहेत. ते सत्तारूढ पक्षाचे आहेत. त्या पक्षात खास वागणूक मिळत असल्यामुळे आता त्यांचा वनवास संपलेला आहे असे समजावे. कोणत्याही परिस्थितीत आपल्या परमपूज्य वडिलांचा आदर्श घेऊन आदर्शवादी पाऊलवाटेवर त्यांनी बरीच पायपीट केली होती. त्यांचा तो 'आदर्श' महाराष्ट्राला चांगलाच परिचित आहे, असो. अशोक रावांच्या काँग्रेस पक्षात असताना अनेक गोड आठवणी असतीलही. प्रभू श्रीरामांना जेव्हा वनवास भोगावा लागला. तेव्हा त्यांच्याबरोबर भ्राता लक्ष्मण आणि घरमालकीण सीतादेवी प्रभू श्रीराम यांच्यासह वनात होती. सम्राज्ञी होता होता बिचा?या सीतेला वनवासात जाऊन वनवासी व्हावे लागले. तसेच अशोकरावांच्या पत्नीलाही हा वनवास भोगावा लागला की काय हे त्या माऊलीने स्पष्ट केलेले नाही. पण नवरा वनवासी तर आपणही वनवासी हे सितामाईंचे उदाहरण बहुतेक त्यांना ठाऊक असावे. आता आपल्या महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वनवासातून इंद्रप्रस्थवासी झालेले आहेत इंद्रप्रस्थचे मुख्य त्यांच्या नशिबात असल्यामुळे आता त्यांना खरं तर वनवासाच्या आठवणी काढण्याची गरजच नव्हती. पण मनातील शल्य कुठेतरी काढून टाकले पाहिजे म्हणून बहुतेक चव्हाण यांनी ही आठवण केली असावी. त्यांना भविष्य काळातील राजविलाससाठी आम्ही शुभेच्छा देतो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

आचार्य देवव्रत यांनी घेतली

# राज्यपाल पदाची शपथ



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले अभिनंदन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
गुजरात राज्याचे राज्यपाल असलेले आचार्य देवव्रत यांनी आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपाल पदाची शपथ दिली. राज्यपाल देवव्रत यांनी संस्कृत भाषेतून शपथ घेतली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल देवव्रत यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. आचार्य देवव्रत हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.

या शपथविधी सोहळ्याला विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अॅड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, कौशल विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, क्रीडा मंत्री अॅड.माणिकराव कोकाटे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार) मनीषा म्हैसकर व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीला मुख्य सचिव राजेशकुमार यांनी देवव्रत यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधीनंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

राज्यपाल देवव्रत यांचा जन्म १८ जानेवारी १९५९ चा असून, त्यांच्या वडिलांचे नाव लहरी सिंह आहे. राज्यपाल देवव्रत यांची शैक्षणिक पात्रता पदवीधर, पदव्युत्तर (इतिहास आणि हिंदी), बी.एड. अशी असून, योगशास्त्रातील डिप्लोमा बरोबरच नैसर्गिक चिकित्साशास्त्र व योगिक सायन्समध्ये डॉक्टरेट आहेत. अध्यापन व प्रशासन क्षेत्रात त्यांना ४५ वर्षांचा अनुभव आहे. हिमाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी बराच काळ काम केले आहे.

संयुक्त कमांडर्स परिषदेचे

## मोदींच्या हस्ते उद्घाटन



■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १५ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी १६ व्या कम्बाइंड कमांडर कॉन्फरन्सचे उद्घाटन केले. पंतप्रधान मोदी रविवारी संध्याकाळी कोलकाता येथे पोहोचले. गेल्या एका महिन्यात बंगालचा हा त्यांचा दुसरा दौरा आहे.

ही परिषद १७ सप्टेंबर पर्यंत लष्कराच्या पूर्व कमांडचे मुख्यालय असलेल्या फोर्ट विल्यम कोलकाता येथे आयोजित केली जाईल. या वर्षीची थीम 'सुधारणांचे वर्ष - भविष्यासाठी परिवर्तन' आहे. जॉइंट कमांडर्स कॉन्फरन्स हा लष्कराचा सर्वात मोठा चर्चा मंच आहे. यामध्ये लष्करी अधिकारी आणि सरकारी मंत्री देशाच्या सुरक्षा आणि रणनीतीवर चर्चा करतात.

### राजद-काँग्रेस धोका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवार, १५ सप्टेंबर रोजी बिहारसाठी ४०,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन केले. त्यांनी पूर्णिया विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन केले.

विमानतळानंतर, पंतप्रधानांनी पूर्णिया येथील एसएसबी मैदानावर उपस्थितांना संबोधित केले. ते म्हणाले,काँग्रेस आणि राजद बिहारच्या सन्मानाला तसेच त्याच्या अस्मितेला धोका निर्माण करत आहेत. हे लोक बिहारची तुलना बिडीशी करतात. आरजेडी आणि काँग्रेस घुसखोरांना वाचवण्यासाठी रॅली काढत आहेत. ते निषेध करत आहेत, परंतु घुसखोरांना कोंडणे ही एनडीएची दृढ जबाबदारी आहे.

## संपूर्ण वक्फ कायद्यावर बंदी नाही

३ बदलांना स्थगनादेश

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :
वक्फ (सुधारणा) कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम निकाल दिला.




न्यायालयाने संपूर्ण कायद्याला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. हा कायदा केवळ दुर्मिळ प्रकरणांमध्येच स्थगित केला जाऊ शकतो. तथापि, काही कलमांना स्थगिती देण्यात आली आहे.

बोर्डाच्या एकूण ११ सदस्यांपैकी ३ पेक्षा जास्त गैर-मुस्लिम सदस्य नसतील. राज्य मंडळांमध्ये ३ पेक्षा जास्त गैर-मुस्लिम सदस्य नसतील.

न्यायालयाने वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या तरतुदीला स्थगिती दिली आहे, ज्यानुसार वक्फ तयार करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला ५ वर्षांसाठी इस्लामचा अनुयायी असणे आवश्यक होते. राज्य सरकारे एखादी व्यक्ती इस्लामचा अनुयायी आहे की नाही हे ठरवण्यासाठी नियम बनवत नाहीत तोपर्यंत ही तरतूद स्थगित राहील.

न्यायालयाने वक्फ सुधारणा कायद्याच्या तरतुदीला स्थगिती दिली आहे, ज्या अंतर्गत सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वक्फ मालमत्तेने सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण केले आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार देण्यात आला होता.

यापूर्वी २२ मे रोजी, सलग तीन दिवसांच्या सुनावणीनंतर, न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. गेल्या सुनावणीत, याचिकाकर्त्यांनी हा कायदा मुस्लिमांच्या हक्कांच्या विरोधात असल्याचे म्हटले होते आणि अंतरिम स्थगितीची मागणी केली होती.

## 'देवाभाऊ' पोस्टर लावता, पण बळीराजाकडे ढुंकून पाहत नाही...

शरद पवारांचा हल्लाबोल

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १५ :
राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी वर्ग अस्वस्थ आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मागील दोन महिन्यांत दोन हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. संकट येत असतात, पण त्या संकटातून मार्ग काढावा लागतो आणि हा मार्ग काढण्याची जबाबदारी राज्य आणि केंद्र सरकारची असते, अशी टीका शरद पवार यांनी केली. ते आज नाशिकमध्ये आयोजित मोर्चात बोलत होते.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नाशिकमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून मोठा आक्रोश मोर्चा काढला. या मोर्चात पक्षाचे प्रमुख नेते जयंत पाटील, सुप्रिया सुळे आणि



रोहित पवार यांच्यासह हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. मोर्चाच्या माध्यमातून राष्ट्रवादीने सरकारचे लक्ष शेतकऱ्यांच्या समस्यांकडे वेधण्याचा प्रयत्न केला.

या मोर्चात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

आज महाराष्ट्रातील शेतकरी अस्वस्थ आहे. कधी दुष्काळ, तर यंदाच्या वर्षी अतिवृष्टी. बीड सारखा जिल्हा जिथे अनेकदा दुष्काळ असतो, आज त्या जिल्ह्यात अतिवृष्टी झाली आणि त्याच परिणाम शेतीवर झाला. शेतकरी सध्या अस्वस्थ आहे. संकटे येतात, त्या संकटातून मार्ग काढायचा असतो. तो मार्ग काढायची जबाबदारी राज्य आणि केंद्र सरकारची असते.

शेतकरी आक्रोश करतो आहे. मात्र आजचे राज्यकर्ते त्याकडे दुर्लक्ष करत आहेत, महाराष्ट्रात गेल्या दोन महिन्यांत दोन हजारपेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. परंतु, राज्यातील महायुती सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची टीका शरद पवार यांनी केली.

## आपत्कालीन कार्य केंद्राला शिंदे यांची भेट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
मुंबईसह राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देऊन पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. पुराच्या पाण्याने वेढल्याने अडकलेल्या ४० ग्रामस्थांना एनडीआरएफच्या मदतीने सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले.

## ह्युंदाई कंपनीने राज्यात अधिकाधिक गुंतवणूक करावी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
वाहन उद्योगात ह्युंदाई कंपनीचे मोठे नाव आहे. कंपनीने राज्यातही गुंतवणूक केली आहे. पुणे येथील प्रकल्पातून वाहन उत्पादनात वाढ होणार आहे. ह्युंदाई कंपनीने राज्यात वाहन उद्योगात अधिकाधिक गुंतवणुक करीत रोजगार निर्मितीमध्ये वाढ करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी ह्युंदाई कंपनीच्या शिष्टमंडळासोबत आयोजित बैठकीत केले.



ह्युंदाई कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक उन्सू किम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. बैठकीस मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, उद्योग सचिव डॉ. पी. अनबलगन, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे कार्यकारी संचालक जिओन्जीक ली, उपाध्यक्ष (वित्त) सारावनन टी, सहायक उपाध्यक्ष पुनीत आनंद, कार्तिक एल, वरिष्ठ व्यवस्थापक विनोद बनसोड आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, कंपनी राज्यात सामाजिक उत्तरदायित्वअंतर्गत विविध कामांसाठी ५६ कोटी रुपयांचा निधी देत आहे. ही बाब स्तुत्य असून या निधीतून राज्यात सुरू असलेली कामे पथदर्शी ठरतील. या निधीतून कंपनीने पर्यावरण संवर्धनासाठी काम करीत रस्ता सुरक्षा, चालक प्रशिक्षण आदींमध्ये काम करावे. राज्यात उद्योगस्नेही वातावरण तयार करून उद्योगांना सहकार्य करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे, असेही त्यांनी सांगितले.

विश्वास पाटलांच्या निवडीला

## वंचित आघाडीचा विरोध

■ वृत्तसंस्था, सातारा, दि. १५ :
सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड झाल्याबद्दल वंचित बहुजन आघाडी, सातारा जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यातील वातावरण तापलेले असताना, पाटील यांनी केलेल्या काही विधानांमुळे समाजात जातीय तेढ निर्माण होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे सातारा जिल्हा महासचिव गणेश भिसे यांनी प्रसिद्धिपत्रक काढून आपली भूमिका मांडली आहे.

## मला संपवायचा प्रयत्न!

माजी मुख्यमंत्र्यांच्या दाव्याने खळबळ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
कधीकाळी काँग्रेसची विचारधारा मराठवाड्यात रुजवणारे खासदार अशोक चव्हाण आज भाजपात आहे. तब्बल १४ वर्षे ते काँग्रेसमध्ये होते. या काळात त्यांनी



राज्याचे मुख्यमंत्रिपदही भूषवले आता मात्र ते याच काँग्रेसवर सडकून टीका करताना दिसतात. असे असतानाच आता त्यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. १४ वर्षे मी वनवासात होतो. मला संपवण्याचा प्रयत्न केला जात होता, असा मोठा दावा अशोक चव्हाण यांनी केला आहे.

अशोक चव्हाण लातूरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांनी काँग्रेस तसेच विरोधकांच्या आघाडीवर टीका केली. लातूरला या अगोदर येण्याची संधी अनेकदा मिळाली. पण अत्यंत प्रेमाने आजचे निमंत्रण मिळाले. सध्या राजकीय समीकरणे बदलली आहेत.

आज या सभेत मी या बदललेल्या समिकरणाचे चित्र पाहतो आहे. देवेंद्र फडणवीस यांचे निवडणूक जिंकण्याचे स्वप्न पूर्ण होईल. लातूरकरांनी धक्का तंत्र वापरत आमदार रमेश कराड यांना लातूर ग्रामीणमधून निवडणून आले लातूर जिल्ह्यातल्या सहा पैकी पाच जागा महायुतीने जिंकल्या हा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिष्मा आहे, असे गौरवोद्गार अशोक चव्हाण यांनी यावेळी काढले.

तसेच, नांदेडलादेखील आम्ही अनेक सहकाऱ्यांनी एकत्र येत नऊच्या नऊ जागा जिंकल्या. मला संपवायचा प्रयत्न होत होता. त्यामुळेच मी निर्णय घेतला. मोदी, फडणवीस साहेबांशी चर्चा करून भाजपत गेलो, असे यावेळी चव्हाण यांनी सांगितले. तसेच मागच्या काळात जेव्हढे प्रयत्न काँग्रेससाठी केले तेव्हढेच प्रयत्न आम्ही भाजपासाठी करू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## तीन नक्षलवाद्यांचा खात्मा

केंद्रीय समिती सदस्याचा समावेश

■ वृत्तसंस्था,
रांची, दि. १५ :
झारखंड मधील हजारीबाग जिल्ह्यातील गोरहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणा?या पंटिटरी जंगल परिसरात आज सोमवारी सकाळी सुरक्षा दल व नक्षलवाद्यात झालेल्या चकमकीत तीन जहाल नक्षल ठार झाले.



यात केंद्रीय समिती सदस्य सहदेव सोरेन याचा समावेश असून त्याच्यावर विविध राज्यात चार कोटीहून अधिक बक्षीस होते. आठवडाभरात दोन केंद्रीय समिती सदस्य ठार झाले.

पंटिटरी जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची गोपनीय माहिती सुरक्षा यंत्रणेला मिळाली होती. त्यावरून सोमवारी सकाळी या परिसरात कोब्रा २०९ बटालियन पथक आणि स्थानिक पोलिसांनी शोधमोहीम राबवली होती.

दरम्यान, जंगलात दडून असलेल्या नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलावर गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत तीन नक्षलवादी ठार झाले. केंद्रीय समिती सदस्य सहदेव सोरेन, झोनल समिती सदस्य रघुनाथ हेंब्रम, झोनल समिती सदस्य बिरसन गंझू अशी ठार झालेल्या नक्षलवाद्यांची नावे आहेत. सर्वांवर मिळून झारखंडमध्ये २ कोटींहून अधिक बक्षीस होते तर सहदेव सोरेन याच्या विविध राज्यात मिळून चार कोटीपेक्षा अधिक बक्षीस होते.

## सर्वोच्च न्यायालयाची वनताराला क्लीनचिट

कायदेशीर मानली प्राण्यांची खरेदी-विक्री

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :
अंबानी कुटुंबाच्या रिलायन्स फाउंडेशनद्वारे चालवल्या जामनगरमधील वनतारा वन्यजीव बचाव आणि पुनर्वसन केंद्रात प्राण्यांची खरेदी आणि विक्री नियमांच्या चौकटीतच झाली, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी म्हटले.

विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) अहवालात कोणतीही अनियमितता आढळली नाही, असे न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती पंकज मित्तल आणि न्यायमूर्ती पी.बी. वरळे यांच्या खंडपीठाने म्हटले की,आता हे प्रकरण पुन्हा पुन्हा उपस्थित होऊ दिले जाणार नाही. एका स्वतंत्र समितीने चौकशी केली आहे आणि आम्ही त्यावर अवलंबून राहू.

यापूर्वी, २६ ऑगस्ट रोजी, सर्वोच्च न्यायालयाने दोन जनहित याचिकांवर (पीआयएल) एसआयटी स्थापन



करण्याचे आदेश दिले होते. कोल्हापूरमधील एका मंदिरातून 'माधुरी' हत्ती वनतारा येथे हलवल्याच्या वादानंतर जुलैमध्ये वकील सीआर जया सुकिन यांनी एक आणि देव शर्मा यांनी दुसरी याचिका दाखल केली होती.

वनताराचे वकील हरीश साळवे यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, तपास अहवाल सार्वजनिक करू नये. त्यांनी असा युक्तिवाद केला की जर अहवाल बाहेर आला तर न्यूयॉर्क टाईम्स सारखी वर्तमानपत्रे त्याचा फक्त एक भाग छापून खोटी कथन तयार करतील. यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, अहवाल सार्वजनिक केला जाणार नाही.

४ सदस्यीय एसआयटीचे नेतृत्व माजी न्यायाधीश न्यायमूर्ती जे. चेलमेश्वर यांनी केले होते आणि या पथकात न्यायमूर्ती राघवेंद्र चौहान (माजी मुख्य न्यायाधीश, उत्तराखंड आणि तेलंगणा उच्च न्यायालय), मुंबईचे माजी पोलिस आयुक्त हेमंत नागराळे आणि कस्टम अधिकारी अनिश गुप्ता यांचा समावेश होता.

एसआयटीने १२ सप्टेंबर रोजी आपला अहवाल सादर केला. न्यायालयाने एसआयटीचे कौतुक केले आणि समितीला मानधनही दिले पाहिजे असे म्हटले. देशभरात गाजलेल्या या संपूर्ण प्रकरणात एसआयटीने एकूण पाच मुद्यांवर चौकशी केली होती . अखेर सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण निकाली काढले असून, प्राण्यांची खरेदी विक्री कायदेशीर मानली आहे.

युवाराष्ट्र दर्शन
वार्ताहार नेमणे आहे
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता नागपूर जिल्ह्यातील नरखेड, काटोल, कळमेश्वर, कन्हान, बुट्टीबोरी, उमरेड, कुही, सावनेर, हिंगणा, वाडी व मौदा येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहार नियुक्त करणे आहे.
संपर्क
9881717811 / 9168555384

# मुंबईसह राज्यभरात कोसळधार!

## महायुती सरकारचा माज उतरवण्याची वेळ आली



■ **नाशिक :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार भ्रष्टाचाराचे आरोप झालेल्या मंत्र्यांवर कोणतीही कारवाई करत नाही. हे सरकार घमंडी झाले असून, त्याचा माज उतरवण्याची वेळ आली आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने सोमवारी नाशिकमध्ये शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी आयोजित सभेत बोलताना रोहित पवार म्हणाले, भाजप सरकारचा कल खासगीकरणाकडे आहे. या सरकारने १० हजार कोटी रुपयांहून अधिकची कामे ठेकेदारांना दिली आहेत. यातील बहुतांश कंत्राटदार भाजपच्या विचारांचे आहेत. नेत्यांना फायदा व्हावा म्हणून सरकारने सरकारी भरती बंद करून ठेकेदारांमार्फत भरती सुरू केली आहे. आदिवासी विभागाचे खासगीकरण करण्याची गरज नाही. आम्ही आगामी अधिवेशनात खासगीकरणाचा मुद्दा सभागृहात मांडू.

रोहित पवार यांनी यावेळी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरूनही सरकारवर निशाणा साधला. तसेच सरकारवर भ्रष्टाचारी मंत्र्यांना पाठिशी घालण्याचाही आरोप केला. ते म्हणाले, एकतर या सरकारला घमंड आहे. अहंकार आहे. त्याचे असे मत आहे की, आमचे सर्वात जास्त आमदार निवडून आलेत. ते कसे निवडून आलेत हे सर्वांना माहिती आहे. त्यांच्या घमेंडीमुळे कुणाचीही विकेट पडत नाही. या सरकारच्या मंत्र्यांनी हजारो कोटींचा भ्रष्टाचार केला. आम्ही त्याचे पुरावे दिले. पण त्यानंतरही संबंधितांचे राजीनामे घेण्यात आले नाही. पुरावे देऊनही राजीनामा घेतला जात नसेल, तर हा कुठे ना कुठे तरी सरकारचा अहंकारच आहे. हे सरकार माजले आहे. त्याचा माज उतरवण्याची वेळ आता आली आहे.

## मराठी माणसाने फक्त सतरंज्या उचलायच्या...



**मुंबई :** हुकूमशाहीने भरलेल्या भाजपने विरोधकांसह स्वपक्षातील लोकांनाही लाथाडल्याची टीका सुषमा अंधारे यांनी केली आहे. केशव व माधव (केशव उपाध्ये व माधव भंडारी) हे मराठी आहेत. पण मराठी माणसाने फक्त सतरंज्या उचलायच्या आणि मलिदा मात्र उपऱ्या मोहित कंबोजला मिळणार, असे त्यांनी या दोन्ही नेत्यांचा चिमटा काढत म्हटले आहे. दरम्यान, काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी भाजपतून व्हीआरएस घेतलेल्या एका नेता - कम - बिल्डरला लागोपाठ एसआरए प्रकल्प कसे मिळतात? असा सवाल उपस्थित करत मोहित कंबोज यांच्यावर निशाणा साधला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, ही भाजपा अडवाणी वाजपेयी ची भाजपा नाही. ही भाजपा मोदी फडणवीस यांनी उध्वस्त केलेली भाजपा आहे. ही भाजपा हुकूमशाहीने भरलेली आहे. विरोधकांचे सह अस्तित्व नाकारतेच पण सोबतच सत्ताधारी स्वपक्षातल्या लोकांना सुद्धा लाथाडते. सत्तेतला वाटा असो कंत्राट असो की निधी असो केशवराव तुमच्या तोंडाला पानेच पुसली जाणार, असे अंधारे म्हणाल्या.

## मागासलेपण मागून मिळत नाही



**मुंबई :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याच्या मुद्यावरून पुन्हा एकदा मनोज जरांगे व त्यांच्या समर्थकांचा चिमटा काढला आहे. मागासलेपण हे मागून मिळत नाही. ते जन्माने मिळते. जातीयवादाचा काळाकुट्ट बिळातून बाहेर काढण्यासाठीच मी ओबीसी - मराठा समाजात लग्नाचा प्रस्ताव ठेवला होता, असे ते म्हणालेत. त्यानंतर अनेकांनी त्यांच्यावर शिवराळ भाषेत टीका केली होती. या पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी प्रस्तावामागील भूमिका समजावून सांगितली आहे. लक्ष्मण हाके म्हणाले, आंतरजातीय विवाहचा प्रस्ताव मांडला तर शिव्यांची लाखोली वाहिली जाते. शाहूंचे वारसदार व्हायला तुम्हाला शंभर जन्म घ्यावे लागतील. शाहूंनी त्यांच्या भगिनींचा विवाह होळकरांच्या घरात लावून दिला होता. शंभर वर्षांपूर्वी तो विचार होता आज असा विचार मांडला तरी मारून टाकण्याची धमकी दिली जाते. धन्य ते महात्मा फुले -शाहू राजे -बाबासाहेब. जातीयवादाचा नाग हा फक्त बिळातून बाहेर काढण्यासाठी मी हे वक्तव्य केले होते, असे ते म्हणाले.

---

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

हवामान खात्याने मुंबईत पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. या काळात ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडू शकतो. पुढील ३ दिवस ईशान्येकडील राज्ये आणि महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

मुंबई आणि उपनगर परिसरात काल रात्रीपासूनच तुफान पावसाने जोर धरला असून आज पहाटेपासून त्याचा तीव्रतेने जोर वाढला आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्यांवरील वाहतुकीला अडथळे निर्माण झाले असून वाहनचालकांसाठी दृश्यमानता कमी झाली आहे. अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे सकाळच्या गर्दीच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चाकरमान्यांसाठी घराबाहेर पडणे अवघड झाले असून ह्यकामावर जायचे की नाहीह्ल या संभ्रमात अनेकजण अडकले आहेत.

मुंबईत रात्रभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पाणी साचले आहे. पाणी काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पंप सुरू केले असले तरी, पाण्याचा निचरा वेगाने होत नसल्याने कर्मचाऱ्यांनी रस्त्यावरील मॅनहोलची झाकणे काढायला सुरुवात केली आहे.

पाण्याचा जलद निचरा व्हावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, उघड्या मॅनहोलमुळे कोणत्याही व्यक्तीचा अपघात होऊ नये म्हणून पालिकेचे कर्मचारी या मॅनहोलजवळ बसून लोकांना सावध करत आहेत. देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळख असलेल्या मुंबईची ही अवस्था पाहून टीका होत आहे.

उघड्या मॅनहोलजवळ बसले बीएमसी कर्मचारी : बीडमध्ये हेलिकॉप्टरने रेस्क्यू : पाचोऱ्यातही ढगफुटी



**मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही धुंवाधार**

कोकणात सर्वत्र मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला असून या संपूर्ण पट्ट्याला आज ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातदेखील विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याठिकाणी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक आणि प्रवाशांनी हवामान विभागाच्या सूचना पाळाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात पिके नुकसानीच्या टप्प्यात असल्याने जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांपुढे नवी अडचण उभी राहू शकते.

पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात पालिका अपयशी ठरल्यानेच दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांना अशा अडचणींचा सामना करावा लागतो, असे म्हटले जात आहे. उघड्या मॅनहोलच्या या प्रकारामुळे मुंबई महानगरपालिका आणि सरकारच्या नावाला बट्टा लागला आहे.

**मुंबईसाठी रेड अलर्ट**

संपूर्ण महाराष्ट्रात दोन दिवस हवामान अस्थिर राहणार असल्याचे संकेत हवामान खात्याने दिले आहेत. मुंबईसाठी रेड अलर्ट असल्याने या कालावधीत अतिवृष्टीची शक्यता असून प्रशासनाने बचाव पथके सतर्क ठेवली आहेत. आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक सक्रिय करण्यात आले आहेत.

पावसामुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून नागरिकांनी अधिकृत सूचना वर्तविण्यावर भर द्यावा, असे प्रशासनाने नमूद केले आहे.

**चारना नदीला पूर, नागरिक अडकले**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात चारना नदीला पूर आल्याने जवळपास १५ ते २० नागरिक पुरात अडकले आहेत. या लोकांच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने ते छतावर चढून मदतीची वाट पाहत आहेत.

या घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दल आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची बचाव पथके तात्काळ घटनास्थळी रवाना झाली आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, प्रशासनाने विशेष रेस्क्यू टीमही बोलावली आहे. आवश्यकतेनुसार लष्कराची मदतही घेण्याची तयारी प्रशासनाने ठेवली आहे.

पुरात अडकलेल्या नागरिकांची संख्या १५ ते २० असून, ते मदतीची याचना करत आहेत. प्रशासनाकडून या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या अचानक आलेल्या पुरामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून, बचाव कार्याकडे लक्ष लागले आहे.

**पाचोऱ्यात ढगफुटी, दगड नदीला पूर**

जळगाव जिल्ह्याच्या पाचोरा तालुक्यातील सातगाव डोंगरीत ढगफुटी सदृश्य पावस पडला आहे. मुसळधार पावसामुळे येथील दगडी नदीला पूर आल्याने उपकेंद्र, घरे आणि शेती पाण्याखाली गेली आहेत.

## मोदींचे परराष्ट्र धोरण हे अराजकतेचे व्याकरण...

**प्रकाश आंबेडकर यांचे टीकास्त्र**



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १५ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण हे भारतीय हितसंबंधां विरोधात अराजकतेचे व्याकरण ठरत असल्याचा घणाघात वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी केला. भारताचे पारंपरिक परराष्ट्र धोरण अमेरिका व रशिया यांच्यात संतुलन राखण्याचे आहे. पण मोदी सरकारचे अपयशी नेतृत्व व आर्थिक परराष्ट्र धोरणामुळे या दोन्ही देशांशी आपले संबंध बिघडले आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. आंबेडकरांनी मोदींवर मणिपूरवासीयांची क्रूर थट्टा केल्याचाही आरोप केला आहे.

प्रकाश आंबेडकरांनी सोमवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, भारताचे पारंपरिक परराष्ट्र धोरण हे अमेरिका व रशिया यांच्यात संतुलन साधण्याचे आहे. पण मोदी सरकारचे अपयशी नेतृत्व व आर्थिक परराष्ट्र धोरणामुळे भारताचे या दोन्ही देशांसोबतचे संबंध बिघडलेत. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या ५० टक्के रेसिप्रोकल टॅरिफमुळे भारत - अमेरिका संबंध १९७० च्या दशकातील स्थितीकडे फेकले गेलेत. तर रशियाचा चीनकडे वाढलेला कल व व्यापारात चिनी युआनची मागणी यामुळे भारतासाठी समस्या निर्माण होत आहे.

प्रकाश आंबेडकरांनी यावेळी मोदींच्या धोरणांमुळे केवळ मुकेश अंबानी व त्यांच्या रिलायन्स कंपनीचेच उखळ पांढरे झाल्याचाही आरोप केला. मोदींच्या धोरणांचा सर्वाधिक फायदा मुकेश अंबानी आणि त्यांची कंपनी रिलायन्सला झाला. भारत रशियाकडून स्वस्त कच्चे तेल युरल्स क्रूड खरेदी करतो.

रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताला प्रति बॅरल सरासरी ११ डॉलर्सचा नफा झाला. रिलायन्सने स्वस्त दरात रशियन तेल आयात केले, ते त्यांच्या रिफायनरीजमध्ये प्रक्रिया केले आणि परदेशात विकले. गेल्या तीन वर्षांत रिलायन्सने ५० हजार कोटींपेक्षा जास्त नफा कमावला. परंतु सामान्य जनतेला याचा कोणताही फायदा झाला नाही, कारण रिलायन्सने रशियन तेलावर प्रक्रिया करून ते परदेशात विकले. भारतात पेट्रोल प्रतिलीटर ९५ व डिझेल प्रतिलीटर ८८ च्या आसपासच राहिले. पण मोदींच्या धोरणाचा सर्वाधिक फायदा मुकेश अंबानी आणि त्यांची कंपनी रिलायन्सला झाला, असेही ते बोलताना म्हणाले.

## पुरात अडकलेल्यांना हेलिकॉप्टरने केले एअरलिफ्ट

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. १५ :**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या पूर्व भागात आणि बीड जिल्ह्याच्या पश्चिम भागात रविवारी रात्री झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे पूरस्थिती गंभीर झाली आहे. नद्यांना पूर आल्याने अनेक गावांत पाणी शिरले असून ग्रामस्थ पुराच्या पाण्यात अडकले.

बीड जिल्ह्यातील कडा येथे पूरस्थिती गंभीर बनल्याने लष्कराला पाचारण करण्यात आले आहे. पुरात अडकलेल्या अनेकांना हेलिकॉप्टरने एअरलिफ्ट करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात पूर स्थिती गंभीर बनली आहे. कडा नदीला आलेल्या पुरामुळे अनेक गावात पाणी शिरले असून, ग्रामस्थ जीव वाचवण्यासाठी इमारतींच्या छतावर चढले होते आणि मदतीची वाट पाहत होते. पुरात अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले. लष्कराच्या जवानांनी हेलिकॉप्टरच्या मदतीने अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. स्थानिक आपत्ती निवारण पथकेही जेसीबी आणि इतर साधनांच्या सहाय्याने बचावकार्य करत आहेत. आतापर्यंत अनेक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून, सुदैवाने मोठी जीवितहानी झालेली नाही. मात्र, अनेक शेतकऱ्यांची जनावरे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



आमदार सुरेश धस कडा गावात दाखल झाले. दुपारी पाऊस थांबल्याने बचावकार्य वेगाने सुरू झाले आहे. लष्करी पथकाने हेलिकॉप्टरच्या सहाय्याने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे.

अहिल्यानगरच्या पाथर्डी तालुक्यातील करंजी, जवखेडे, तिसगाव आणि मढी या गावांना ढगफुटीसदृश पावसाचा मोठा फटका बसला आहे. पुलांवरून पाणी वाहत असल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. विशेषतः करंजी आणि जवखेडे येथे सुमारे 70 ते 80 लोक पुरात अडकले होते, ज्यांना स्थानिक आणि आपत्ती निवारण पथकांनी सुरक्षित बाहेर काढले. करंजी गावातील प्रसिद्ध उत्तरेश्वर मंदिरालाही पुराचा वेढा बसला आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज राज्यातील पावसाचा आढावा घेतला. आष्टी पाथर्डी तालुक्यातील काही गावांना पुराच्या पाण्याने वेढल्याने त्यात ४० गावकरी अडकून पडले होते. त्यांना एनडीआरएफच्या मदतीने एअरलिफ्ट करावे लागेल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानुसार नाशिक वरून हेलिकॉप्टर बोलवून या अडकलेल्या लोकांना तत्काळ एअरलिफ्ट करून सुरक्षित ठिकाणी हलवावे असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. त्यानंतर ग्रामस्थांना एयरलिफ्ट केले गेले.

## ही तर फिक्सिंग मॅच



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १५ :**

भारत - पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना हा फिक्सिंग मॅच असून यातून दीड लाख कोटी रुपयांचा जुगार खेळला गेला असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

यातील किमान २५००० कोटी रुपये पाकिस्तानत गेले आहेत. हा पैसा आता पाकिस्तान भारताविरुद्ध वापरणार आहे. हे नरेंद्र मोदी, अमित शहा, जय शहा आणि भारतीय क्रिकेट बोर्डाला कळत नाही का? असा प्रश्न देखील संजय राऊत यांनी उपस्थित केला.

पाकिस्तान सोबत विजय किंवा पराजय हा मुद्दाच नाही. कोणी जर असे म्हणत असेल तर तो मूर्खपणा आहे. पाकिस्तान सोबत क्रिकेटची मॅच न खेळण्याचा मुद्दा आहे. पाकिस्तानला हरवल्यामुळे पहलगाम मधील २६ महिलांचे कुंकू परत आले का? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला.

कालच्या मॅचवर दीड लाख कोटी रुपयांचा जुगार खेळला गेला. यातील काही पैसे पाकिस्तानला देखील मिळाले असतील. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला किमान १००० कोटी रुपये कालच्या मॅचने मिळाले असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला.

## दिवे घाटात दरड कोसळली

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**

पुणे शहर आणि परिसरात रविवारी रात्रीपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शहरातील दहा वेगवेगळ्या ठिकाणी झाडे कोसळली आहेत. पुणे-सासवड रस्त्यावरील दिवे घाटात दरड कोसळल्याने वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे.

मुसळधार पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडे कोसळली. या घटनांमध्ये काही रिक्षा आणि बसेसचे नुकसान झाले. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ कारवाई करत रस्त्यावरील पडलेल्या फांद्या हटवून वाहतूक सुरळीत केली. दिवे घाटातील परिस्थिती चिंताजनक आहे. सध्या येथे रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून, ब्लास्टिंग तंत्रज्ञानाने डोंगर फोडण्यात आला आहे. यामुळे दगड सैल झाले असून, पावसाळ्यात दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. प्रशासनाने घाटातील धोकादायक भागात लोखंडी कठडे बसवले आहेत.

## तांत्रिक बिघाडामुळे मोनोरेल थांबली : १७ प्रवाशांना हलवले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

मुंबईतील वडाळा परिसरात तांत्रिक बिघाडामुळे मोनोरेलची सेवा अचानक बंद पडली. एमएमआरडीएने १७ प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले आणि नंतर मोनोरेलने पुन्हा प्रवास सुरू केला. तांत्रिक बिघाडामुळे काही काळ मोनोरेल विस्कळीत झाली होती, परंतु नंतर सिस्टम दुरुस्त केल्यानंतर सेवा सामान्यपणे सुरू करण्यात आली.

सोमवारी सकाळी मुंबईतील वडाळा परिसरात तांत्रिक बिघाडामुळे अचानक मोनोरेल बंद पडली. एमएमआरडीएच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेत कोणताही प्रवासी जखमी झाला नाही आणि सर्व १७ प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती सीपी कंट्रोलने दिली.

अधिकाऱ्याने सांगितले की अँटोफिल बस डेपो आणि जीटीबीएन मोनो रेल स्टेशन, वडाळा दरम्यान तांत्रिक बिघाडामुळे मोनोरेल थांबली. या दरम्यान १५-२० प्रवासी मोनोरेलमध्ये अडकले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, मोनोरेलमध्ये बिघाड झाल्याची घटना



आज सकाळी ७:१६ वाजता घडली, तर अपडेट केलेली माहिती सकाळी ८ वाजता उपलब्ध झाली. जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले की प्रवाशांना दुसऱ्या मोनोरेलमध्ये हलवण्यात आले आहे आणि सर्वजण सुरक्षित आहेत. मुसळधार पाऊस आणि पावसाळ्यात वडाळ्यातील मोनोरेल सेवेत ही तांत्रिक बिघाड झाला. या घटनेत कोणतीही दुखापत झाली नाही.

## राज्यस्तरीय लघुपट स्पर्धेत 'कूस'चा तिसरा क्रमांक




■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**

ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य व त्यांच्या जगण्याचे वास्तव मांडणाऱ्या 'कूस' या लघुपटाला राज्यस्तरीय उत्कृष्ट लघुपट म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

या लघुपटाची निर्मिती उचित मीडिया सर्व्हिसेसने केली असून, दिग्दर्शन व लेखन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त या लघुपट महोत्सवाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत आगीनफूल लघुपटास प्रथम, तर चंद्रलेखा लघुपटास द्वितीय पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत राज्यभरातून ३५० पेक्षा अधिक लघुपटांनी सहभाग घेतला होता. त्यातून कूस लघुपटाने तिसरा क्रमांक मिळवला.

मंत्री नरहरी झिरवाळ व प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते 'कूस' लघुपटाच्या टीमला सन्मानित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, चित्रपट महामंडळाचे मेघराज राजे भोसले, अभिनेत्री देविका दफ्तरदार, अभिनेते मिलिंद दास्ताने, सुनील गोडबोले, प्रभाकर मोरे, असित रेडीज, राष्ट्रवादीच्या नेत्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, बाबा धुमाळ, संयोजक बाबासाहेब पाटील, नितीन धवणे पाटील, आदित्य संजयराव, अपेक्षा चव्हाण आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे जगणे, त्यांच्या मासिक पाळीचा व आरोग्याचा प्रश्न, गर्भाशय पिशवी काढण्याचे प्रकार आणि त्यातुन होणारी त्या स्त्रीची, कुटुंबाची कुचंबणा आदी गोष्टी या लघुपटातून मांडण्यात आल्या आहेत. डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांच्याच अनेक पुरस्कारप्राप्त 'कूस' या कादंबरीवर आधारित हा लघुपट असून, निर्माता व लेखक-दिग्दर्शक ऊसतोड मजूर कुटुंबातून आल्याने अतिशय वास्तविक रूपात तो मांडला गेला आहे. विठ्ठल काळे यांच्यासह अनुया कळसकर, वैशाली केंजळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे व जीवराज चोले यांच्या यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.

निर्माता जीवराज चोले व दिग्दर्शक डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी हे पारितोषिक स्वीकारले. ५५ हजार ५५५ रुपये, मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. अभिनेता विठ्ठल काळे यांना उत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार मिळाला. यावेळी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

## बाल अवस्थेतील आरोग्य सुदृढ राखण्यावर आरोग्य विभागाचा भर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १५ :**

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग राज्यातील बाल अवस्थेतील आरोग्य सुदृढ राखण्यावर भर देत आहे. तसेच, असंसर्गजन्य आजारांबाबत इतर अधिक सजग असून, विविध विभागांच्या समन्वयातून प्रभावी उपाययोजना राबवत असल्याचे आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांनी सांगितले.

युनिसेफ इंडिया आणि प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो यांच्या संयुक्त विद्यमाने बाल अवस्थेतील असंसर्गजन्य आजारांवरील राज्यस्तरीय कार्यशाळा हॉटेल ताज प्रेसिडेंट, मुंबई येथे पार पडली. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. निपुण विनायक यांच्यासह पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता वत्स शर्मा, अक्क्टर नागपूरचे मुख्य संचालक डॉ. प्रशांत जोशी, युनिसेफचे महाराष्ट्र प्रमुख संजय सिंग, विवेक सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती.




सचिव डॉ. विनायक यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने बाल अवस्थेतील असंसर्गजन्य आजार टाळण्यासाठी विविध पातळ्यांवर उपाययोजना सुरू केल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये गर्भारपणाच्या काळापासून काळजी घेतल्यास भविष्यात असे आजार टाळता येऊ शकतात.

त्यांनी दुर्लक्षित घटकांवर लक्ष केंद्रित करणे महत्वाचे असल्याचे सांगून म्हणाले की, समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचण्यासाठी, विशेषतः दुर्लक्षित समुदायांसाठी, आपण सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे.

यावेळी स्मिता वत्स - शर्मा यांनी माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. तसेच सत्य माहिती समाजापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. चुकीच्या आणि असत्य माहितीमुळे समाजात गैरसमज वाढतात, त्यामुळे माध्यमांनी काळजीपूर्वक सत्य माहितीचे प्रसारण करणे आवश्यक आहे.

तसेच असंसर्गजन्य आजार, आहार, जीवनशैली आणि काळजी यासंदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे. राज्यस्तरीय कार्यशाळांमुळे अशा विषयांवर सखोल चर्चा होऊन त्याचा सकारात्मक परिणाम आरोग्य व्यवस्थेवर दिसून येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यशाळेत युनिसेफ व अन्य तज्ज्ञांनी असंसर्गजन्य आजारांची वाढती तीव्रता, लहान वयात होणारे परिणाम, आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर सखोल चर्चा केली.

# जात पडताळणी कार्यालयातील त्रास थांबवा

## भीमशक्ती संघटना, अशोक प्रतिष्ठानचा इशारा; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १५ :

जात पडताळणी कार्यालयात नागरिकांना होत असलेला त्रास थांबवून कार्यालयातील संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी भीमशक्ती सामाजिक संघटना व अशोक प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व व जात पडताळणी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. ही मागणी पूर्ण न झाल्या आंदोलनासह गुन्हे दाखल करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.



सध्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारची कागदपत्रे नागरिकांकडून काढण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी आवश्यक महत्वपूर्ण जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जात पडताळणी कार्यालयात धावपळ सुरू आहे. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रासाठी विश्वसनीय अत्यंत महत्त्वाचा पुरावा असलेल्या कोतवाल बुकाची नक्कल अकोला तहसील कार्यालयामधून दिले जाते. तहसीलमधून देण्यात येणारे कोतवाल बुक नक्कल प्रमाणपत्र जात पडताळणी संशोधन कार्यालयात नाकारले जात असून जात वैधता तपासणी अर्ज फेटाळण्यात येत आहेत, असे संघटनेचे म्हणणे आहे. या विरोधात भीमशक्तीचे नेते प्रा. विजय आठवले, प्रदेश सरचिटणीस मधुसूदन भटकर, अनिल तायडे यांनी जात वैधता समिती कार्यालयात संबंधित कर्मचाऱ्यांना याबाबत विचारणा केली. मात्र, त्यांना समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत, असा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे.नागरिकांचा हा त्रास थांबला नाही तर भीमशक्ती संघटना अशोक प्रतिष्ठानचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. निवेदनावर प्रा. विजय आठवले, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे प्रदेश सरचिटणीस मधुसूदन भटकर ,प्रा. डॉ बाळकृष्ण खंडारे, अनिल तायडे, प्रा सुनील कांबळे, विद्याधर मोहोड, अनिल गवई, संदेश गवई पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत. भीमशक्ती संघटना व अशोक प्रतिष्ठानने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात पुढील काही मागण्या केल्या आहेत. जिल्ह्यातील तहसील कार्यालय व जिल्हा जात वैधता संशोधन कार्यालयांमध्ये समन्वय असायला हवा. नेमकी कोणत्या प्रकारची कागदपत्रे जात वैधता समितीला हवी आहेत, तशी कागदपत्रे अकोला व इतर तहसील कार्यालयाने नागरिकांना उपलब्ध करून दिली पाहिजेत. अशा सूचना तहसीलदार यांना जात वैधता संशोधन कार्यालयाकडून देण्यात याव्यात. दोन्ही कार्यालयाचे प्रमुख यांनी एकमेकांशी संवाद साधला पाहिजे समन्वयाअभावी हा गोंधळ निर्माण झाला आहे असून, यावर उपाय योजनेसाठी वरिष्ठांनी पुढाकार घ्यावा.

नागरिकांकडून पैसे उकळण्याचा प्रकार जुनी कागदपत्रे जीर्ण होत असल्याने याद्या संगणकीकृत करण्यात आल्या; परंतु अशा याद्यातील नोंदी जात पडताळणी कार्यालयात स्वीकार्य नाहीत. नागरिकांकडून पैसे उकळण्यासाठी जात पडताळणी कार्यालयाने केलेली ही खेळी असल्याचा आरोप निवेदनात म्हटले आहे. कार्यालयात बसून जनतेचे मालक असल्यासारखे वागणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना जनतेला होत असलेल्या त्रासाबाबत संवेदना दिसून येत नाही, अशी टिका संघटनेने केली.

# भविष्याला आकार देण्यासाठी विनोबा भावे उपक्रमामध्ये सहभाग नोंदवावा

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १५ :

विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देण्यासाठी विनोबा भावे सहाय्यक कार्यक्रमात यवतमाळ जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळांनी सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी अमित रंजन यांनी केले. विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत गुरुवारी ११ सप्टेंबर रोजी आचार्य विनोबा भावे यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा परिषदेत जिल्ह्यातील शिक्षकांचा गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.




पोस्ट ऑफ द मंथ या उपक्रमांतर्गत विनोबा ॲपमध्ये ज्या शिक्षकांनी अध्ययन व अध्यापनाच्या अनुषंगाने चलचित्र निर्माण करून विनोबा ॲपवर अपलोड केलेल्या व जास्तीत जास्त प्रतिसाद मिळालेल्या तालुकास्तरावर दोन आणि जिल्हास्तरावर पाच शिक्षकांना प्रत्येक महिन्याला सन्मानित करण्यात येते. जुलै महिन्यात दि. १५ ऑगस्ट या स्वतंत्र दिनी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या हस्ते विजेत्या शिक्षकांना भेट वस्तु व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले होते.

ऑगस्ट महिन्यातील जिल्हास्तरीय विजेत्या शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी अमित रंजन यांच्या हस्ते त्यांच्या दालनात पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

यावेळी शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, उपशिक्षणाधिकारी राजू मडावी, प्रथम इन्फोटेक संस्थेच्या जिल्हा समन्वयक शुभांगी रामगोणव, ओलफचे प्रकल्प अधिकारी राम हटकर छगन चिंचे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी चिल्ली (ज) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे अ. तैय्यब साहेबलाल शेख, बोथ (वन) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे डॉ. दीपक वसंत ढोक, कळमुळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विशाल सुर्यवंशी, रामगाव (रा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तृप्ती खोडे, गोंडबुरांडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या जयश्री जाधव, साखरा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे अमोल पाईकराव यांना सन्मानित करण्यात आले.

## तहसीलदाराने २ लाख लाच घेतली

# टॉयलेटमध्ये टाकली

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १५ :

दोन लाखांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोताळ्याचा तहसीलदार हेमंत पाटील यास रंगेहाथ पकडले. दरम्यान, कारवाईची शंका येताच तहसीलदाराने ही रक्कम शौचालयात टाकून देत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ही कारवाई रविवार, १४ सप्टेंबर रोजी तहसीलदाराच्या राहत्या घरी बुलडाणा येथे करण्यात आली.

मोताळा तालुक्यातील थड येथील एक शेतकरी गट क्रमांक २३ मधील १.६२ हेक्टर ही शेतजमीन आपल्या भाच्यास विक्री करणार होता. यासाठी सौदेपत्रक तयार करण्यात आले. ही जमीन भोगवटादारास वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरित करणे होती. शेतकरी अशिक्षित असल्याने त्याचा भाचा तहसीलदार हेमंत पाटील याला भेटला. तहसीलदार पाटील याने तक्रारदारास या कामासाठी प्रतिएकर ५० हजारप्रमाणे दोन लाख रुपयांची मागणी केली.

तक्रारदाराने याबाबत एसीबी अकोलाकडे तक्रार केली. एसीबीने सापळा रचला. १३ रोजी तक्रारीची पडताळणी केली. १४ रोजी दुपारी पाटील याने तक्रारदाराकडून दोन लाख रुपये लाच घेतली.

# शिक्षकांचा टीईटी मुद्दा पुन्हा चर्चेत

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने टीईटी परीक्षेसंदर्भात नवा मुद्दा उपस्थित केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यातील शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे.

निवृत्तीपूर्व पाच वर्षांचा कालावधी असलेल्या शिक्षकांना टीईटीमधून सूट देण्यात आली आहे. मात्र त्यांना पदोन्नतीसाठी परीक्षा देणे बंधनकारक करण्यात आले आहे. पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा असलेल्या शिक्षकांना दोन वर्षांत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना सेवामुक्त करण्यात येईल.



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे पदाधिकारी अजयानंद पवार, शैलेन्द्र दहातोंडे, प्रशांत निमकर, नंदकिशोर पाटील आणि मनिष काळे यांनी १४ सप्टेंबर रोजी खासदार बळवंतराव वानखडे आणि आमदार संजय खोडके यांची भेट घेतली. त्यांनी या संदर्भात निवेदन सादर केले.

शिक्षक समितीच्या म्हणण्यानुसार, २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण करण्याचे आदेश शासन निर्णयात नाहीत. या नव्या निर्णयामुळे लाखो शिक्षक आणि त्यांच्या कुटुंबांचे भविष्य धोक्यात येण्याची भीती आहे. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी, अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे.

# इरई धरणाचे सातही दरवाजे १ मीटरने उघडले



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १५ :

जिल्ह्यात मागील 24 तासात मुसळधार पाऊस झाला. वरोडा, भद्रावती, नागभीड तालुक्यात अतिवृष्टीमुळे तिकडे मोठी पुरस्थिती निर्माण झाली असून, अनेक मार्ग बंद आहेत. पिक पाण्याखाली आल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच धरण तुडुंब भरली आहेत. इरई धरणाची जलपातळी वाढत असल्याने प्रशासनाने धरणाचे सर्व सातही दरवाजे 1 मीटरने उघले असून, नदीच्या काठावर वसलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इरई धरणात मोठ्या प्रमाणावर पाणी साठले असून, जलसाठ्याने मर्यादा ओलांडू नये यासाठी प्रशासनाने सर्व दरवाजे उघडून नियंत्रित जलविसर्ग सुरू केला आहे. त्यामुळे इरई नदीच्या काठावरील गावांमध्ये महसूल व आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सूचना पोहोचविण्यात आल्या आहेत. नदीला पूर येण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी नदीकाठाच्या भागात जाणे टाळावे, नदीपात्र ओलांडू नये, कोणत्याही पुलावरून पाणी जात असल्यास पूल ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, जनावरांना नदी काठी चरण्यास सोडू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

पद्मापूर, किटाळी, मासाळा, पडोली, यशवंतनगर, दाताळा, आरवट, नांदगाव पोडे, भटाळी, वडोली, चिचोली, कढोली, पायली, खैरगाव, चांदसूरला, विचोडा बुजुर्ग, आंभोरा, लखमापूर, कोसारा, खुटाळा हडस्ती, चारवट, कवटी, चेक तिरवंजा, देवाळा, चोराळा, हिंगणाळा, चिंचोली, मिनगाव, वडगाव, चंद्रपूर, माना आणि इतर इरई नदीच्या काठावर राहणाऱ्या सर्व नागरिकांनी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जगण्यात निष्कलंकपणा असला की तो कवितेमध्ये सत्व असते : रमेश इंगळे

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १५ :

"कवी आजन्म आपली कविता शोधत असतो. त्याच्या जगण्यात निष्कलंकपणा असला तर तो कवितेतही स्वतःहून येतो त्याशिवाय सत्व असलेली कविता लिहिता येत नाही. मुळात कविता ही कवीच्या जगण्याचा आरसाच असते "असे प्रतिपादन मातीचे पाय, निवार्णीचा शब्द हे दोन प्रसिद्ध काव्यसंग्रह लिहिणारे कवी रमेश इंगळे उत्रादकर यांनी शनिवारी दि.१३ रोजी झालेल्या निवार्णीचा शब्द या कवी संवादामध्ये केले.



आपल्या दर्जेदार कार्यक्रमांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या परीस बहुद्देशीय संस्था,बुलडाणा यांच्यातर्फे डॉ. माधवी जवरे आणि विनोद जवरे यांनी साहित्याविषयी आस्था असणाऱ्यांनी चुकवू नये असा " निवार्णीचा शब्द " हा कवी रमेश इंगळे उत्रादकर यांच्याशी संवाद शनिवारी आयोजित केला होता. प्रेषित प्रदीप सिद्धभट्टी यांनी संवादक म्हणून रमेश इंगळे यांना बोलते केले.

डॉ माधवी जवरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत परीस बहुदेशीय संस्थेची वाटचाल मांडली , याप्रसंगी ज्येष्ठ प्राध्यापक, साहित्यिक डॉ.एस एम कानडजे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा सत्कार आणि अभीष्टचिंतन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून आलेले कवी डॉ. संतोष पवार यांचाही सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रेषित सिद्धभट्टी यांनी अत्यंत आणि तरल भाषेत इंगळे यांची ओळख करून देत त्यांचा काव्यप्रवास सर्वांसमोर मांडला आणि संवादाला सुरुवात झाली .

कवितेतील पैलू संवादातून उलगडले अत्यंत गंभीरपणे झालेल्या या संवादात कवितेबाबत सर्व पैलू बोलल्या गेले , त्याला रसिकांची उत्तम दाद मिळत गेली . उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या संवादात प्रेषित सिद्धभट्टी यांनी रमेश इंगळे यांच्या काही अप्रतिम कविता वाचून रसिकांना अंतर्मुख केले. याप्रसंगी बुलडाण्यातील अनेक मान्यवर रसिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी रविकिरण टाकळकर, जवरे दाम्पत्य, वैशाली तायडे यांनी पुढाकार घेतला होता.

# यंदा घाटावर पावसाचा मोठा कहर

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १५ :



जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासुन पाऊस सुरु असून आज सायंकाळी पर्यंत पावसाने उसंत दिली होती. दरम्यान या पावसामुळे दोन तालुक्यातील पर्जन्यवृष्टी ही शंभरी पार गेली असून पाच प्रकल्पातही शंभर टक्के जलसाठा उपलब्ध झाला आहे. अजुनही १६ सप्टेंबर पर्यंतच पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे जास्त पाणी पडलेल्या भागातील पिकांची अवस्था बिकट राहणार आहे. पावसामुळे जिल्हयातील अनेक ठिकाणी सध्या नाले खळाळून वाहु लागले आहेत. विजेच्या कडकडाटासह रात्री पाऊस पडला होता. काही भागात वीज पडल्याच्या घटनाही घडल्या मात्र नुकसान काही झाला नसल्याचे समोर आले आहे. शनिवार व रविवार या शासकीय सुट्या असल्याने नुकसानीचा अंदाज कळु शकला नाही. गतवर्षीच्या तुलनेत यंदा कमी पर्जन्यमान आहे.

# समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये खामगाव तालुक्यातील ९७ ग्रामपंचायतींचा सहभाग

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. १५ :




ग्राम विकासाला नवा वेग देण्यासाठी राज्य शासनाने राबवलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला खामगाव तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींचे काम अधिक सक्षम व्हावे, लोकसहभागातून गावोगाव विकासाची स्पर्धा निर्माण व्हावी आणि शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानात खामगाव तालुक्यातील तब्बल ९७ ग्रामपंचायती या अभियानात सहभागी होत असून १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत गावागावात विकास कामांची चढाओढ पाहायला मिळणार आहे.

या अभियानाचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व कामगार मंत्री आकाश फुंडकर आभासी स्वरूपात उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमात अनेक महत्त्वाच्या बाबींना प्राधान्य देण्यात आले आहे. लोकवर्गणीतून जास्तीत जास्त विकास कामे करण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून देणे, गावातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी निचरा, तसेच पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण हे मुद्दे अग्रस्थानी राहणार आहेत. गावकऱ्यांच्या सहभागातून दर आठवड्याला स्वच्छता अभियान राबवण्याची अपेक्षा आहे.

या सर्व उपक्रमांची जबाबदारी सरपंच आणि ग्रामसेवकांवर सोपवण्यात आली असून त्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्यातून ठराविक कालावधीत कामे पूर्ण करावीत, असे आदेश देखील देण्यात आले आहे. ग्रामपंचायतीने केलेल्या कामांचे मूल्यांकन तालुका स्तरावरील समितीमार्फत करण्यात येणार आहे. प्रत्येक उपक्रमाला गुण दिले जातील आणि सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या ग्रामपंचायतींना शासनाकडून विशेष बक्षीस दिले जाणार आहे. या बक्षिसातून ग्रामपंचायतींना आणखी बळकटी मिळणार असून गाव विकासासाठी नवे मार्ग खुल्या होतील.

खामगाव तालुक्यातील एकूण ९७ ग्रामपंचायती या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभागी होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विकास कामांना वेग मिळणार असून, गावोगाव सकारात्मक स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता आहे. या अभियानातून प्रत्येक ग्रामपंचायत आदर्श ग्राम होण्याच्या दिशेने वाटचाल करेल, असा विश्वास ग्रामविकास विभागाने व्यक्त केला आहे.

सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये १७ सप्टेबर रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पधेर्चे उद्घाटन होताच गावागावात ग्रामसभा घेवून गावकऱ्यांना या स्पर्धेत सहभागी करुन घेण्यासाठी जनजागरण देखील केले जाणार आहे. अभियानात सदर कामांना मिळणार प्राधान्य मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायती विविध विकास कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

# परदेशातही आयुर्वेदिक उपचारांचा प्रसार

■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. १५ :

देश विदेशात सुद्धा भारतीय आयुवेर्दाचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. विदेशी लोक सुद्धा भारतात आयुष व्हिसा घेऊन भारतीय आयुर्वेदिक चिकित्सा उपचार पद्धतीने उपचार घेत आहेत. ही भारतीय आयुवेर्दासाठी गौरवाची बाब असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी उद्घाटनप्रसंगी केले.

शेगाव येथे शारीरिक मानसिक आणि अध्यात्मिक या त्रिविध व्याधीवर आधारित 'माऊली पर्व ' या दोन दिवसीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे . आज १३ सप्टेंबर रोजी आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन झाले.त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कामगार मंत्री आकाश फुंडकर, महाराष्ट्र आयुर्वेदिक विद्यापीठाचे प्रमुख वैद्य नीलेश आवारे, वैद्य सचिन म्हळसने, वैद्य अभय भारसाखळे, राजेश्री आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या प्राचार्या वैद्य सोनल राठी उपस्थित होत्या. यावेळी आयुर्वेदिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या वैद्यांचा आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शारीरिक मानसिक आणि अध्यात्मिक हे त्रिविध व्याधी आहे. याबद्दल आयुर्वेदामध्ये खूप महत्त्व आहे, असे त्यांनी सांगितले. आयुवेर्दाला आले चांगले दिवस आयुवेर्दाला आजपर्यंत कोणी महत्त्व दिलं नाही ही भारतासाठी महत्त्वाची आणि गौरवाची बाब असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.


purple FINANCE

कार्यालय: पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१.
दूरध्वनी: ०२२-६९१६५१२३, मोबाईल: ९३२५७५०५५४, वेबसाइट: www.purplefinance.in

**मागणी सूचना**

पर्पल फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१ येथे आहे आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा (यापुढे पीएफएल म्हणून संदर्भित) ही कंपनी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आहे. आणि पीएफएल ही सरफेसी कायद्याअंतर्गत सुरक्षित कर्जदार असल्याने आणि सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम २ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना / सह-कर्जदारांना सूचनांमध्ये नमूद केलेली रक्कम सूचनांच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे, त्याव्यतिरिक्त खाली सूचीबद्ध केलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, सदर कर्जदारांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे / सह-कर्जदाराचे / लॅन / शाखा यांचे नाव | ज्या हितसंबंधाच्या संदर्भात सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | एनपीए तारीख | सूचना पाठवल्याची तारीख आणि थकबाकीची रक्कम |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | १. मनोहर बाटू गंथाडे (कर्जदार) २. प्रमिला मनोहर गंथाडे (सह-कर्जदार) लॅन:PFLSLBHN0000832 शाखा: भंडारा | ग्रामपंचायत मिल्कत क्रमांक २८ चे सर्व तुकडा आणि पार्सल ५१७ चौ.फुट, म्हणजेच ४८.०१ चौ. आणि प्रधानमंत्री आवास योजना घरकुल आरसीसी बांधकाम क्षेत्र ३७१ चौरस फूट, म्हणजेच ३४.५० चौरस मीटर, पुढरी - गावात वसलेले, तालुका साकोली आणि जिल्हा -भंडारा - महाराष्ट्र -४४१८०२ पूर्व - अजनराव गंताडे यांचे घर, पश्चिम-ग्रामपंचायत सिमेंट रोड, दक्षिण - ग्रामपंचायत रोड, उत्तर - ग्रामपंचायत रस्ता | ०७-०८ -२०२५ | ०१-०९-२०२५ आणि रु. ३४६२१८/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना या सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध येथे दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम पुढील व्याजासह भरण्यात अयशस्वी झाल्यास, पीएफएलला वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवर सुरक्षा व्याज लागू करण्यासाठी कलम १३(४) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, तसेच कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या इतर पद्धतीने नोटीस बजावण्यासाठी पावले उचलली जात आहेत. तुम्हाला सूचना देण्यात येते की, सरफेसी कायद्याच्या कलम १३(८) मध्ये तपशीलवार वर्णन केल्यानुसार, सार्वजनिक लिलावासाठी किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणासाठी खाजगी करारासाठी नोटीस प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही पीएफएलने केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाणखत परत मिळवता येते. लक्षात ठेवा की सरफेसी कायद्याच्या एस-१३ (१३) च्या अटींनुसार, तुम्हाला सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास मनाई आहे.

तारीख: १६/०९/२०२५। ठिकाण: महाराष्ट्र

स्वा/- अधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.



# कार्यालय नगर परिषद, मोवाड

## ता. नरखेड जि. नागपूर

E-mail-mcmowad1867@gmail.com

जा.क्र/नपमो/कावी-/लेखा/नि.जा/५७/२०२५ दिनांक १५/०९/२०२५

**निविदा सूचना**

मोवाड नगरपरिषदेला सन २०२३-२४ ते २०२५-२६ या वर्गाकरिता दुहेरी नोंद लेखा पद्धतीची कामे सनदी लेखापाल कडून करावयाची आहे. इच्छुक निविदाधारकांनी न.प. कार्यालयातून निविदा अर्ज प्राप्त करून घेऊन त्यात दर समाविष्ट करून दिनांक २२/९/२०२५ ला दुपारी ३:०० वाजेपावतो सीलबद लिफाफा मध्ये सादर करावे. तसेच कमी अथवा जास्त दराची निविदा स्वीकारणे अथवा कोणतेही कारण न दर्शविता सर्वच निविदा दर्शविण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांचेकडे सुरक्षित आहे

विवरण

| अ.क्र | कामाचे नाव | कालावधी | निविदा प्रपत्र किमत | अनामन रक्कम | शेरा |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | द्विनोंद लेखा पद्धतीचे आज्ञावालीमध्ये लेखा संकेताक निर्माण करून लेखा संकेताक मध्ये वार्षिक नोंद करणे | सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ | ५००/- | २०००/- | दर वर्ष निहाय द्यावे |

अटी व शर्ती

१. न प कर्यालयात उपलब्ध राहिल.

प्रशासक तथा मुख्याधिकारी
न.प. मोवाड

# नेपाळच्या हंगामी कारभारी सुशीला कार्की



स्टेटलाईन
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

भारताचा शेजारी देश असलेल्या नेपाळमधे जनरेशन झेड या बॅनरखाली युवाशक्तिने क्रांती घडवली. भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, घराणेशाही आणि राज्यकर्त्यांचे विलासी जीवन या विरोधात लक्षावधी युवकांनी रस्त्यावर येऊन प्रक्षोभ प्रकट केला. जाळपोळ, हिंसाचार, रस्तारोको, लुटमार, अशा घटनांनी पाच दिवस नेपाळ धगधगत होते, अखेर पंतप्रधान के. पी शर्मा ओली यांना राजीनामा देऊन लष्कराच्या संरक्षणात पलायन करावे लागले.

संतप्त निदर्शकांनी सरकारमधील अनेक मंत्र्यांचा पाठलाग करून त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. माजी पंतप्रधानांच्या पत्नीला पेटविण्यापर्यंत दंगलखोरांची मजल गेली. अनेक मंत्र्यांची घरे, पंतप्रधानांचे निवासस्थान, राष्ट्रपतींचे निवासस्थान, संसद भवन, बँका, पंचतारांकीत हॉटेल्सही तोडफोड जाळपोळ झाली. हजारोंच्या हिंसक जमावापुढे पोलीसही हतबल झाले.

अखेर नेपाळमधे सत्तापालट झाला आणि माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांना राष्ट्रपतींनी हंगामी पंतप्रधान म्हणून शपथ दिली. सुशीला कार्की या नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान आहेत. सहा महिन्यात निवडणुका घेण्याची त्यांनी घोषणा केली आहे. नेपाळच्या इतिहासात युवाशक्तिने केलेल्या क्रांतीतून सत्तापालट प्रथमच घडवला गेला.

हंगामी पंतप्रधान म्हणून सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले तेव्हा सर्वांना आश्चर्यच वाटले. नेपाळमधील लक्षावधी तरूणांचे प्रेरणास्थान असलेले बालेन शाह हे पंतप्रधान होतील व जनरेशन झेड त्यांच्या नावाला मान्यता देईल असा सर्वांचा समज होता. पण हंगामी पंतप्रधान होण्यास बालेन शाह राजी नव्हते, म्हणून सुशीला कार्की यांचे नाव पुढे आले.

सुशीला कार्की यांच्या नव्या सरकारमधे कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता किंवा पदाधिकारी असणार नाही, अशी अट जनरेशन झेड या संघटनेने घातली. सुशीला कार्की यांना राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी राष्ट्रपती भवनात शीतल निवास येथे पंतप्रधानपदाची शपथ दिली. जनरेशन झेड च्या निषेध मोर्चाला पाठिंबा देणाऱ्या काठमांडूचे महापौर बालेन शाह यांनीही सुशीला कार्की यांच्या नावाला पाठिंबा दिला. नव्या सरकारमधे जनरेशन झेड सहभागी होणार नाही पण सल्लागार गट म्हणून भूमिका बजावणार आहे.

न्या. सुशीला कार्की या ७३ वर्षांच्या आहेत. भारतातील वाराणसीच्या बनारस हिंदू विद्यापीठातून त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांनी त्रिभुवन विद्यापीठातन कायद्याचे शिक्षण घेतले व १९७९ मधे वकिली सुरू केली. सन २००६ मधे नेपाळच्या संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या मदोसा समितीच्या त्या सदस्या होत्या.

२०१६ मधे त्या प्रथम त्या कार्यवाहक न्यायाधीश व नंतर सरन्यायाधीश झाल्या. पोलिसांच्या नियुक्त्यांमधे झालेल्या राजकीय हस्तक्षेपाच्या विरोधात त्यांनी निर्णय दिला. जून २०१७ मधे निवृत्तीच्या अगोदर त्यांच्यावर महाभियोग चालविण्यात आला व त्यांना पदावरून हटविण्यातही आले होते.

भारताचा सख्खा शेजारी असलेला नेपाळ हा जेव्हा कम्युनिस्ट विचारप्रणालीच्या अधिन गेला, तेव्हापासून या देशात अस्थिरता व अशांतता आहे.

चीनच्या दबावाखाली व प्रभावाखाली नेपाळचा कारभार चालू आहे असे आरोप गेले काही वर्षे उघडपणे केले जात आहेत. देशात राजेशाही संपुष्टात आल्यावर स्थिर सरकार मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील, विकासाला वेग येईल अशी अपेक्षा येथील तरूणाईची होती. प्रत्यक्षात सरकार बदलले तरी देशात अस्थिरता कायम राहिली आहे. गेल्या सतरा वर्षात पंधरा वेळा सरकार बदलले. राज्यकर्ते म्हणून तीन राजकीय पक्षांचा आलटून पालटून खेळ चालू असल्याचे दिसून आले.

या खेळात भ्रष्टाचार तर शिगेला पोचला. राज्यकर्त्यांचे व राजकीय नेत्यांचे सगे सोयरे व परिवारातील लोक विलासी व श्रीमंती जीवन जगत आहेत आणि आम जनता मात्र गरीबीशी झुंज देऊन लढत आहे असे वास्तव आहे. गरीब जनतेला दोन वेळा जेवायला पुरेसे मिळत नाही आणि नेत्यांची मुले विदेशात शिक्षणाला व मौज मजा करायला फिरत आहेत, अशा पोस्ट सोशल मिडियावर सतत व्हायरल होत असतात.

नेपाळमध्ये रोजगार नाही म्हणून रोज नेपाळी तरूणांचे लोंढे अन्य देशात जात आहेत आणि राजकीय पुढाऱ्यांची मुले फाईव्ह स्टार जीवन जगत आहेत. यातून तरूणांमधे असंतोष वाढला व गेल्या आठवड्यात तो रस्त्यावर आक्रोश प्रकट झाला. कम्युनिस्ट सरकारच्या विरोधात देशातील तरूणांना भारताने व अमेरिकेने उचकावले आहे अशाही बातम्या पेरल्या गेल्या. पण सत्तापालट झाल्याशिवाय आंदोलन थांबण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा केपी शर्मा ओली यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

माजी पंतप्रधान शेर बहादूर देउबा यांच्या घरात घुसुन निदर्शकांनी त्यांच्या पत्नीला पेटवून दिले. नेपाळमध्ये हिंसाचाराचे आणि अराजकतेचे टोक गाठल्याचे हे उदाहरण आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या जमावावर पोलिसांनी गोळीबार केला, त्यात पन्नासहून अधिक तरूणांचा बळी गेला व बाराशेहून अधिक जखमी झाले. फेसबुक, इंस्टाग्रामसह देशातील २६ सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर ओली सरकारने बंदी घालून तरूणांच्या रोषाचा आग्या मोहोळ आपल्या अंगावर ओढवून घेतला. सरकारी संपत्तीची निदर्शकांकडून दिवसा ढवळ्या राख रांगोळी होत असताना, मंत्र्यांना अंगावरच्या कपड्यानिशी पळ काढावा लागला, यापेक्षा दुर्दैव कोणते असू शकते.

काठमांडूतील रस्त्यावर उतरलेल्या तरूणांच्या जमावाने राष्ट्रपती भवन किंवा पंतप्रधान कार्यालयाचा ताबा घेतला, सर्व परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे राष्ट्रपतींना घाई करून नवे हंगामी सरकार स्थापन करणे भाग पडले.

रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात आंदोलन करणारे युवक हे सर्व पंधरा ते तीस वयोगटातील होते. विशेष म्हणजे शाळेतील हजारो मुले मुली शालेय युनिफॉर्ममधे पाठिवर दप्तर घेऊन रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात घोषणा देत होते. जिथे हजारो तरूण व विद्यार्थी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतात तिथे सरकार टिकत नाही हा आजवरचा जगभरातला अनुभव आहे. तोच अनुभव काठमांडूतील आंदोलनातून जगाला पाहायला मिळाला.

तीन कोटी लोकसंख्येच्या नेपाळमधे १५ ते ३० वयोगटातील युवाशक्ति ३५ टक्केहून अधिक आहे. म्हणून त्यांच्या भावनांकडे व मागण्याकडे दुर्लक्ष करणे कोणत्याच सरकारला परवडणारे नाही. भ्रष्टाचाराने कळस गाठला असताना व त्याविरोधात तरूणांचे असंतोष खदखदत असताना ओली सरकारने इंटरनेट बंद करून आगीत तेल ओतण्याचे काम केले . जनरेशन झेड आंदोलनामागे कोणी नेता नव्हता. काठमांडूतील आंदोलन नेपाळमधील ७७ जिल्ह्यात पसरले, पण त्याचे नेतृत्व करणारा कोणी एक चेहरा नव्हता. भ्रष्टाचार, बेरोजगारी व महागाईच्या खाईत सापडलेल्या नेपाळमधील संतप्त तरूणाईचा आक्रोश रस्त्यावर दिसला. जे बांगला देश, श्रीलंका मधे घडले तोच उद्रेक नेपाळमधे बघायला मिळाला.

बांगला देशात उठाव झाल्यानंतर शेख हसीना यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन पळ काढावा लागला. तेथे मोहमद युनूस हंगामी सरकार चालवत आहेत. नेपाळमधे केपी शर्मा ओली यांना राजीनामा देऊन पलायन करावे लागले. नेपाळमधे शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हे देशाच्या पहिल्या महिला कारभारी सुशीला कार्की यांच्यापुढे मोठे आव्हान आहे. नेपाळमधील घडामोडींवर भारत, चीन व अमेरिकेचे बारीक लक्ष आहे.

# हक्क मागाल तर अर्बन नक्षल ठरवाल का?

आज सभोवताली एक विचित्र शांतता आहे. रस्ते ओस पडलेले, आंदोलनं विरलेली, सभा-मेळाव्यांत प्रश्न थांबलेले. पहिल्या दृष्टीक्षेपात हे सुखद वाटतं. वा! किती शांती आहे.पण ही शांती म्हणजे वादळाआधीचं भयाण मौन आहे. कारण,

*जिस देश की सडके सुनी हो जाती है,*
*उस देश की संसद आवारा हो जाती है....*

लोकशाहीचा प्राण म्हणजे जनतेचा आवाज. आणि तोच आवाज जर विधेयकांच्या नावाखाली गप्प बसवला गेला, तर हा देश फक्त कागदोपत्री स्वातंत्र्यशील राहील; प्रत्यक्षात मात्र गुलामच ठरेल.

**जनसुरक्षा विधेयक : एक गुप्त फास**

आज जनसुरक्षा विधेयक या नावाखाली दोन संज्ञा उभी राहिल्या आहेत. बेकायदेशीर कृत्य,बेकायदेशीर संघटना. पण गंमत अशी की. या दोन्हींची व्याख्या दिलेलीच नाही. मग ठरवणार कोण? अर्थातच सत्ताधारी.म्हणजे उद्या शिक्षकांनी अनुदान मागितलं, तर ते बेकायदेशीर. शेतकऱ्यांनी हमीभाव मागितला, तर ते बेकायदेशीर. नोकरदारांनी जुनी पेन्शन मागितली, तर ते देशद्रोह. विद्यार्थ्यांनी फी कमी करण्याची मागणी केली, तर ते अर्बन नक्षलवाद. मग लोकशाहीचा अर्थ काय उरला?



गजानन हरणे
वारकरी समाजसेवक
खडकी, अकोला.
9822942623

**इतिहासाचा धडा :**

आवाज दडपला की साम्राज्य कोसळतात. भारताचा इतिहास सांगतो, मुघलांनी तलवारीने आवाज दाबला, पण शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या गजरासमोर त्यांचा मोहोर गळून पडला. इंग्रजांनी रॉलेट आक्ट, सेन्सॉरशिप, फाशी यांसारखे कायदे आणून आवाज दाबला. पण गांधीजींच्या सत्याग्रहासमोर, क्रांतिवीरांच्या गर्जनेसमोर, भगतसिंहांच्या हसताहसता दिलेल्या बलिदानासमोर इंग्रजी साम्राज्य थरथरलं. आवाज दडपून कुणीही टिकला नाही.

आज जर पुन्हा सरकार जनतेचा आवाज गळा घोटून मारू पाहत असेल, तर ही सावधगिरीची घंटा आहे.

**शेतकऱ्यांचा श्वास : हमीभावाचा हक्क**

शेतकरी हा अन्नदाता. पण त्याच्या हमीभावासाठी आंदोलन करणं गुन्हा ठरेल? गेल्या काही वर्षांत लाखो शेतकरी आत्महत्या करून गेले. पिकाला भाव नाही, कर्जाचं भार वाढतोय.जर त्याचा मुलगा रडत म्हणाला, माझ्या वडिलांना न्याय द्या, तर तो गुन्हा ठरेल का ?

**शिक्षक आणि नोकरदार :**
**पेन्शन म्हणजे भीक नव्हे**

अनुदानित शिक्षक, शासकीय नोकरदार आज जुनी पेन्शन मागत आहेत. पेन्शन म्हणजे त्यांच्या वृद्धापकाळातील आधार. पण विधेयक आलं की, तुम्ही आंदोलन केलंत, म्हणजे तुम्ही बेकायदेशीर. हा कुठला न्याय ? काम केलं, आयुष्य झिजवलं, आणि शेवटी आवाज उठवलात तर तुरुंग?

**जल-जंगल-जमीन : आदिवासींचा हक्क**

शतकानुशतकं जंगलात राहणाऱ्या आदिवासींच्या पायाखालचं घरचं दगड उखडून नेला जातो.डोंगर खोदले जातात, धरणात गावं बुडतात, पण पुनर्वसनाचा पत्ता नाही. जर त्यांनी आमचा हक्क द्या म्हटलं, तर त्यांना अर्बन नक्षल ठरवणार? जंगल तोडणारा कायदेशीर, पण जंगल वाचवणारा गुन्हेगार?

**शिक्षणाचं व्यापारीकरण :**
**शाळा विकल्या, मुलं वंचित**

गावोगावी मराठी शाळा विकल्या जात आहेत. गरीब विद्यार्थ्यांच्या हातातली पेन तोडली जात आहे. मुलांच्या भवितव्यासाठी आवाज उठवला तर बेकायदेशीर ? म्हणजे शिक्षण विकणं कायदेशीर, पण शिक्षण वाचवणं बेकायदेशीर?

**आरोग्य आणि रस्ते : भ्रष्टाचाराचं साम्राज्य**

आज सरकारी रुग्णालयांत औषधं नाहीत, बेड नाहीत. रस्ते कोसळलेले, खड्ड्यांनी फाटलेले.जर जनता जाब विचारली, तर ती गुन्हेगार ठरेल.भ्रष्टाचार कायदेशीर, पण जाब विचारणं बेकायदेशीर. हा कोणता न्याय?

**सभागृहाचा गळा : प्रश्न विचारणं गुन्हा**

लोकशाहीचा आत्मा म्हणजे प्रश्न विचारणं. पण सभागृहातही जर विरोधकांनी अध्यक्षांच्या परवानगीशिवाय प्रश्न विचारला, तर ते बेकायदेशीर ठरेल. लोकशाहीचा प्राण काढून टाकणं म्हणजेच हुकूमशाही.

उदाहरणं : बाबासाहेब, गांधीजी आणि जनता बाबासाहेब आंबेडकरांनी चव्हाट्यावर पाणी मागितलं, तेव्हा तोही बेकायदेशीरह्य ठरवला गेला होता. पण त्याच बेकायदेशीर सत्याग्रहाने आज लाखो लोकांना पाणी प्यायचं स्वातंत्र्य मिळालं. गांधीजींचं मिठाचं आंदोलनही इंग्रजांच्या कायद्याने गुन्हा ठरलं होतं.

पण त्या मिठामुळे इंग्रजी साम्राज्याचं मीठ चुरगळलं. म्हणजेच, आज जर सरकार कोणत्याही मागणीला बेकायदेशीर म्हणत असेल, तर याचा अर्थ हा लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**उद्याचा धोका**

जर हे विधेयक असंच आलं, तर.सामाजिक कार्यकर्त्यांचे तुरुंग होतील,संघटना कायमचं बंद होतील,नागरिक गप्प राहतील आणि लोकशाही फक्त ग्रंथात उरेल. उद्याच्या पिढ्यांना इतिहास सांगावा लागेल. स्वातंत्र्य आम्हाला होतं, पण आम्ही गप्प राहिलो. म्हणून ते हरवलं.

आज तुम्हाला शांतता वाटते. पण ही शांतता म्हणजे गुलामगिरीची तयारी आहे. जर न्याय मागाल, तर तुम्हाला नक्षल ठरवलं जाईल. जर आवाज उठवाल, तर तुरुंग तुमची वाट पाहत आहे. पण तरीही इतिहास सांगतो, आवाज दाबला, तरी तो फुटतोच. लोकशाही मारली, तरी ती पुन्हा जन्म घेतेच. कारण जनता अमर आहे, आणि तिचा आवाजही अमर आहे.

हक्क मागणं हा गुन्हा नाही. हक्क हिरावून घेणं हाच खरा गुन्हा आहे. आज आपण गप्प बसलो, तर उद्या आपली मुलं गुलाम जन्माला येतील. आज आपण आवाज उठवला, तर उद्या त्यांचं भविष्य सुरक्षित होईल. हक्क मागाल तर अर्बन नक्षल ठरवाल का ? हा प्रश्न केवळ सरकारला नाही, तर प्रत्येक नागरिकाला आहे. उत्तर द्यायचं आहे. लोकशाही वाचवायची की हुकूमशाही स्वीकारायची?

--------------------


(लेखक, साहित्यिक, समाजसेवक, समाजसुधारक, कवी, वक्ता, विश्लेषक, प्रबोधनकार, आंदोलक , प्रचारक, वारकरी व योगाशिक्षक आहेत.)

■ ■ ■

## भ्रष्टाचार संपवण्यासाठी एक व्हर्च्युअल रोबोट झाला केंद्रीय मंत्री



अल्बेनियाने एका व्हर्च्युअल रोबोटची केंद्रीय मंत्री म्हणून नियुक्ती करून इतिहास रचला आहे. हा मंत्री माणूस नसून कोड आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंसपासून बनवलेला व्हर्च्युअल रोबोट आहे.



अल्बेनियाचे पंतप्रधान एडी रामा म्हणाले की, या एआयचे नाव डिला आहे. सार्वजनिक निविदांशी संबंधित सर्व निर्णयांना १००% पारदर्शकतेने मान्यता देणे आणि त्यांचे निरीक्षण करणे हे त्याचे काम आहे.

### एआय मंत्र्यांची गरज का होती?



अल्बेनियामध्ये सार्वजनिक निविदा नेहमीच भ्रष्टाचाराचे एक प्रमुख स्रोत राहिले आहेत. या देशात ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांची तस्करी ही एक मोठी समस्या आहे.

**२०३० पर्यंत**

युरोपियन युनियनमध्ये सामील होण्यासाठी अल्बेनियाला भ्रष्टाचार संपवावा लागेल आणि सरकारी कामकाजात पारदर्शकता आणावी लागेल अशी अट आहे.



हा व्हर्च्युअल रोबोट जानेवारीमध्ये लॉंच करण्यात आला होता.

हे इंटरनेटवर व्हॉइस कमांडद्वारे सरकारी कागदपत्रे जारी करते. आतापर्यंत ३६,६०० डिजिटल कागदपत्रे जारी करण्यात आली आहेत.

# विसर्जनाला झालेल्या विलंबात तर्क वितर्कांचा पाऊस!

कोट्यवधी गणेश भक्तांचे श्रद्धास्थान लालबागच्या राजाचे तब्बल तेहतीस तासानंतर शाही विसर्जन पार पडले. लालबागच्या राजाच्या ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच विसर्जनास एव्हढा विलंब झाल्याने दरम्यानच्या काळात गणेशभक्तांमध्ये नानाविध तर्क वितर्कांचा अक्षरशः पाऊस पडत होता.

ज्यामध्ये गणेशोत्सव काळात चरणस्पर्श करण्यास येणाऱ्या गणेशभक्तांना कार्यकर्त्यांकडून दिली गेलेली हीन वागणूक, उद्योगपती अंबानी कुटुंबीयांचा लालबागचा राजा मंडळावर वाढता प्रभाव, यंदा कोळी बांधवांचा विसर्जनाचा मान हिरावून तराफा बनवणाऱ्या कंपनीला दिलेले कॉन्ट्रॅक्ट असे अनेक मुद्दे दिवसभर चवीने चर्चिले गेले.

प्रत्यक्षात भरती ओहोटीचे चुकलेले गणित, लालबागच्या मंडळाचे कार्यकर्ते तसेच भर पावसात दिवसभर समुद्रात उभे राहून तराफा आणि राजाचा पाट जुळवण्यास धडपड करणारे कोळी बांधव यांविषयी कोणीच काही बोलत नव्हते.

गणेशोत्सव काळात लालबागच्या राजाच्या दर्शनाला दरवर्षी देश विदेशातून दीड कोटीहून अधिक भाविक येतात. मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मंडळ विविध सुविधा पुरवत असते. यंदा महाप्रसादाचीही सोय करण्यात आली होती. तरीही मंडळाचे कार्यकर्ते, सुरक्षा रक्षक आणि भाविक यांच्यामध्ये प्रतिदिन वादाचे प्रसंग दरवर्षी घडत असतात. गणेशभक्तांना अधिक वेळ रांगेत ताटकळत उभे राहावे लागू नये यासाठी दर्शन अधिकाधिक जलद होणे अनिवार्य आहे. गणेशभक्तांनी अधिक वेळ चरणाजवळ घालवू नये यासाठी, त्यांना पुढे नेण्यासाठी राजाच्या चरणाजवळ स्त्री आणि पुरुष कार्यकर्ते नियुक्त केलेले असतात.

या कार्यकर्त्यांमध्ये मात्र गणेशोत्सव काळात भलतेच बळ संचारलेले असते. या बळाचा वापर करून भक्तांचे मस्तक चरणावर टेकताच क्षणी कार्यकर्त्यांकडून त्यांच्या बकोटीला धरून खेचले जाते आणि बाहेर पडणाऱ्यांच्या रांगेत त्यांना ढकलले जाते. त्यामुळे १०-१२ तास रांगेत उभे राहून आलेल्या गणेशभक्ताला नजर वर करून बाप्पाचे मुख पाहण्याचीही संधी मिळत नाही.

यामागे रांगेत ताटकळत राहणाऱ्यांचा विचार करण्यात येत असला तरी कार्यकर्त्यांचे असे मुजोरीने वागणे नक्कीच अशोभनीय आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

आजमितीला राज्यासह देशभरात अनेक पुरातन आणि जागृत मंदिरे आहेत मात्र त्यापैकी कुणीच भक्तांच्या बकोटीला धरून ढकलत नाहीत त्यामुळे या गोष्टीकडे मंडळाने गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. एकीकडे भक्तांना अशी हीन वागणूक दिली जाते तर दुसरीकडे सेलिब्रिटी, राजकीय मंडळी, युट्युबर, शासकीय अधिकारी यांना रांग न लावता थेट राजाच्या चरणापर्यंत जाण्याची व्यवस्था केली जाते. त्यांना राजासोबत छायाचित्र काढण्याची मुभा दिली जाते, मंडळाकडून त्यांचा सत्कार केला जातो. राजाचे डावे चरण खास या विशेष अतिथींसाठी राखीव ठेवण्यात आलेले असते. राजाच्या दरबारात कार्यकर्त्यांकडून केला जाणारा हा भेदभाव गणेश भक्तांना अधिक खटकतो.

यंदा कधी नव्हे ते लालबागच्या राजा मंडळाचे चौपाटीवर येण्याचे गणित चुकले. समुद्रात भरती सुरु झाल्याने राजाचा पाट आणि नवीन तराफा यांची जोडणी करण्यास अडथळे येऊ लागले. तराफ्यावर असलेले तंत्रज्ञ, समुद्रात उतरलेले कोळी बांधव आणि मंडळाचे कार्यकर्ते यांनी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र निसर्गाच्या हट्टापुढे सर्व व्यर्थ होते. भरतीचे पाणी वाढत गेल्याने मूर्ती समुद्रात शिरू लागली आणि तराफा आणि मूर्ती यामधील अंतर वाढू लागले. यादरम्यान मूर्ती अधिक पुढे जाऊ नये यासाठी कित्येक कोळी बांधवांनी भर पावसात १३ तास समुद्रात उभे राहून मूर्तीला धरून ठेवले. त्यांची ही जिद्द नक्कीच वाखाणण्याजोगी होती.

मूर्ती तराफ्याला जोडण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात न घेता अनेकांनी तर्क वितर्काला सुरुवात केली. काही जणांच्या मते नवीन तराफा गुजरातहून मागवून कोळी बांधवांचा नेहमीच तराफा न वापरल्याने असा प्रसंग ओढवला होता. मुळात लालबागचा बाप्पा केवळ महाराष्ट्राचा किंवा कोळी बांधवांचाच आहे का ? खास लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी दरवर्षी हजारो भाविक गुजरातहून येत असतात. त्यांच्यावर बाप्पा कृपा करत नाही का? बाप्पाला असे राज्यांच्या सीमेत वाटणे नक्कीच योग्य नाही. मंडळातील अंबानी कुटुंबाचा सहभाग खटकणाऱ्या लोकांना अंबानी समूहाने देशातील लाखो युवकांना दिलेला रोजगार का दिसत नाही?

राजाचे विसर्जन होण्यामागे झालेल्या विलंबाबद्दल मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी क्षमा मागितली आहे. नेमका उशीर कशामुळे झाला, समुद्राच्या भरतीचा अंदाज का आला नाही. नवीन तराफा आणण्यात आला होता तर असे अनेक प्रश्न निर्माण होतात. लालबागचा राजा मंडळ पुढील वर्षासाठी योग्य ती उपाययोजना नक्कीच काढेल.

■ ■ ■

## अभंग!

प्राणास फुटावा
खोल खोल झरा
इच्छांचा निचरा
रोज व्हावा।

ओसंडून वाहे
देहात पंढरी
पावलांत वारी
घुटमळे।

जन्म गंधाळेल
शांतवेल दिठी
प्राजक्ताची मिठी
सावळ्याची।

कित्येक युगांची
तृप्तता उपाशी
सुटो एकादशी
आता तरी।

**वीणा डोंगरवार**
**नागपूर.**

## ! शेतकरी व्यथा !

किंमत उरली नाही पाय माणसाले मातीची,
कवडीमोल गेली गा गोनी कांद्या टमाट्याची.

लेकरू रोज मागते घेऊन दप्तर शाळेसाठी,
उरलं नाही काहीच देऊन रोजी मजुरांची.

उसनवारी उरात, डोळा बायका पोरांचे हाल,
दिवसा भेव वाटते राजा नाही भीती रात्रीची.

शेतमालाले सोडून आहे सगळं महाग येथी,
परवडत नाही दोस्ता जिंदगी कास्तकाराची.

नावाचा बळीराजा खरा आहो मी भिखारी,
किराण्यापासून कृषी केंद्रात नोंद उधारीची.

ऊन वारा सोसून मी पेरलं बियाणं वावरांत,
यंदा पावसानं केली माती सा ऱ्या पिकाची.

सांग सोबत्या वाहून गेलं पुरात माझं सारं,
ह्या जन्मी तरी उघडल का झोप शासनाची.

**सौ. आश्विनी डकरे**
**चांदुर बाजार, अमरावती.**

## श्रद्धविधीचे नियम

**वाचक लिहितात**

श्राद्धविधीच्या वेळेस यम-नियमांचे पालन केल्यास श्राद्ध विधी परिपूर्ण होतो. यासाठी श्राद्धविधीच्या दिवशी काही गोष्टी टाळणे आवश्यक आहे. त्या म्हणजे, श्राद्धाच्या दिवशी असत्य भाषण करू नये. हिंसा, कलह, भांडण करू नये. श्राद्धाच्या वेळी शंखनाद करू नये. रांगोळी काढू नये, केसांमध्ये फुलांच्या माळा, गजरे घालू नयेत. स्त्रियांनी केस मोकळे सोडणे, हसणे, रडणे, गप्पा मारणे, अमंगल बोलणे इत्यादी करू नये. घरामध्ये जर गाय, बैल, म्हैस अशी जनावरे असतील तर त्या दिवशी त्यांना कामाला लावू नये. पिंडदानापूर्वी स्वतःला चंदनाचा तिलक लावू नये. श्राद्धाच्या वेळी घंटी वाजवू नये. चुकून जर घंटी वाजवली गेली तर पितृदेवता तिथे थांबत नाहीत. याची काळजी घ्यावी. श्राद्धकर्त्याने शुभ्र म्हणजे पांढरे वस्त्र परिधान करावे. करावा.

■ सुरेश पंडीत. सातारा.

# निसर्ग कवी ना. धो. महानोर!

मराठी साहित्यातील अनमोल रत्न , निसर्ग कवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना धो महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेड येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आईवडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असे.

ना धो महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. ना धो हे त्यात सर्वात थोरले. त्यांचे प्राथमिक शाळेत गावातच झाले मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा बारा किलोमीटर अंतरावर होती.

दहा बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करत. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार, निसर्ग यांची आवड होती त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली.

मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगांवला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शकत प्रवेश घेतला.

तिथे त्यांची काव्य प्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्य प्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले.



घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले पण कविता थांबली नाही. ते शेत शिवारात रमून कविता करू लागले.

शेत शिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसगार्ची अमाप उधळण केली. त्यांच्या अदभुत निसर्ग कवितांनी त्यातल्या रंग गंधानी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद - लईनी वाचक रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना धो महानोर सरांच्या कवितेचं केंद्रस्थान होते ते निसर्ग आणि स्त्रिया. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. त्यांची एकूण अकरा कविता संग्रह प्रसिद्ध असून अजिंठा नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्य लेखनही सुरू ठेवले.

गांधारी ही कादंबरी, गपसप व गावाकडच्या गोष्टी या लोककथा संग्रह, यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, शरद पवार आणि मी, आनंदयोगी पु ल. ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्य लेखन विपुल प्रमाणात केले असले तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होतं. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणी देखील लिहिली आहेत.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५


जैत रे जैत चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठावर आजही कायम आहेत.

ना धो महानोर सर सहा वर्ष विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केले. महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले अगदी पद्मश्री देखील मिळाली मात्र निसर्ग कवी ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ मानत.

३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्ग कवी सर्वांना सोडून गेला. ना धो महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्ग कवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्ग कवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. निसर्ग कवी ना धो महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### श्राद्ध पक्ष

**श्राद्ध पक्षात श्रध्देने व्हावे**
**नतमस्तक पुर्वजांपुढे**
**कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा**
**हिंदु संस्कृतीचा संस्कार गडे!**

**शरीराची ठेवण अनुवंशिकता**
**संपत्तीचा ही वारसा**
**त्यांच्याकडूनच मिळाला**
**याला कशाला हवा आरसा..**

**भारतीय संस्कृती पूर्वजांना**
**एवढा देते सन्मान,त्या देशात**
**वृध्दाश्रमांची वाढती संख्या**
**हा संस्कृतीचा**
**नव्हे का अवमान?..**

# इंडिका ईझीने गणेशोत्सव पंडाल ॲक्टिवेशन्समध्ये हजारो भक्तांशी साधला संवाद

**नागपूर, १५ सप्टेंबर :** महाराष्ट्राचा सर्वात मोठा उत्सव यंदा पूर्वीपेक्षा अधिक थाटामाटात साजरा झाला आणि या प्रसंगी केविनकेअरच्या घराण्यातील भारतातील नं.१ शॅम्पू हेअर कलर ब्रँड (स्रोत: नीलसनआईक्यू रिटेल मेजरमेंट रिपोर्ट, एमएटी जुलै २५) इंडिका ईझी थेट सणाच्या केंद्रस्थानी पोहोचला. राज्यातील प्रतिष्ठित गणपती पंडालांमध्ये मोठ्या प्रमाणावर राबवलेल्या ॲक्टिवेशन्समधून ब्रँडने ग्राहकांशी घट्ट नातं जोडले. या दरम्यान इंडिका ईझी शॅम्पू हेअर कलरचे ६०,००० हून अधिक सॅशे वितरित करण्यात आले आणि १० दिवसांच्या या उत्सवात हजारो भक्तांशी थेट संवाद साधला गेला.




पुणे या अनोख्या उपक्रमाचे केंद्रबिंदू ठरले. सुप्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती पंडालात भक्तांना केवळ दर्शनच नव्हे तर इंडिका ईझी हेअर कलर सलूनचा अनुभवही घेता आला. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सुरू झालेला हा १० दिवसांचा ॲक्टिवेशन उत्सवाचा मुख्य आकर्षण ठरला. यात हजारो भक्त सहभागी झाले आणि २५० हून अधिक ग्राहकांनी थेट हेअर कलरिंगचा अनुभव घेतला. येथे उपस्थितांना प्रत्यक्ष पाहता आले की इंडिका ईझी फक्त १० मिनिटांत गडद, नैसर्गिक रंग देतो आणि केसांना सहजपणे व आत्मविश्वासाने बदलतो. याशिवाय, ब्रँडने २०,००० हून अधिक मोफत सॅशे वाटले जेणेकरून ग्राहकांना घरबसल्या हा सोपा उपाय करून पाहता येईल आणि परंपरेसोबत आधुनिक सौंदर्य अनुभवता येईल.

या उपक्रमाच्या यशाबद्दल केविनकेअरच्या पर्सनल केअर डिव्हिजनचे बिझनेस हेड, रजत नंदा म्हणाले: गणेशोत्सवाने आम्हाला उपभोक्त्यांशी कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणावर जोडण्याची संधी दिली. आम्ही महाराष्ट्रातील लाखो लोकांपर्यंत पोहोचलो आणि या मोहिमेदरम्यान ६०,००० हून अधिक सॅशे वितरित केले याचा आम्हाला अभिमान आहे. उपभोक्त्यांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया दर्शवते की इंडिका ईझीचे मूळ वचन सोयीस्करता, परवडणारी किंमत आणि दर्जा आजच्या ग्राहकांना मनापासून भावते. आत्मविश्वास वाटण्यासाठी फक्त १० मिनिटे पुरेशी आहेत आणि हा संदेश या उत्सवात हजारो घरांपर्यंत पोहोचला.

ब्रँड ग्राहकांपर्यंत अप्रतिम सहजता प्रदान करतो. नैसर्गिक ब्लॅक, डार्क ब्राउन, बर्गंडी आणि नैसर्गिक ब्राउन असे चार शेड्स अनुक्रमे १० रुपये, १५ रुपये आणि ३० रुपये या परवडणाऱ्या किंमतींमध्ये उपलब्ध आहेत. उत्सवाच्या हंगामात आकर्षण वाढवण्यासाठी, ब्रँडने नैसर्गिक ब्राउन आणि बर्गंडी हे दोन नवीन शेड्स फक्त १० रुपयांत लॉन्च केले आहेत. परंपरेचा आनंद आणि आधुनिक सौंदर्याची सोय एकत्र आणत, इंडिका ईझीने गणेशोत्सव पंडालांना अशा ठिकाणी रूपांतरित केले जिथे संस्कृती आणि आत्मविश्वास एकत्र येतात. लाखो सॅशे वाटून आणि असंख्य हास्ये पसरवून ब्रँडने सिद्ध केले की फक्त १० मिनिटांत उत्सवाची तयारी कुठेही, कधीही करता येते.

# सॅमसंगने मुंबईमध्ये 'गॅलॅक्सी एम्पॉवर्ड'चा विस्तार केला

**मुंबई, १५ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांचा अद्वितीय समुदाय-केंद्रित उपक्रम गॅलॅक्सी एम्पॉवर्डच्या मुंबई चॅप्टरला लाँच केले. या उपक्रमाचा शिक्षक, मुख्याध्यापक व शालेय प्रशासनाला अत्याधुनिक डिजिटल साधने व आधुनिक अध्यापन पद्धतींसह अधिक कुशल करत वर्गांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा मनसुबा आहे.

नवी दिल्लीमध्ये हा उपक्रम यशस्वी ठरला, जेथे हा उपक्रम २५० हून अधिक शाळांपर्यंत पोहोचला आणि २,७०० हून अधिक शिक्षकांना प्रमाणित केले. या यशानंतर गॅलॅक्सी एम्पॉवर्ड आता देशाच्या शिक्षण परिसंस्थेवर दीर्घकालीन प्रभाव निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षेसह भारताची आर्थिक व शैक्षणिक राजधानी मुंबईमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे. मुंबईतील लाँच कार्यक्रमात महाराष्ट्र आणि शेजारच्या राज्यांतील २५० शाळांमधील ३५० हून अधिक शिक्षक व शाळाप्रमुख एकत्र आले, ज्यामधून या उपक्रमाला मिळत असलेली पसंती आणि शिक्षकांमध्ये व्यावसायिक विकासाची मागणी दिसून आली.




या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, युनेस्को, पॅरिसमधील भारताचे राजदूत (ॲम्बेसेडर) व कायमचे प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा आणि सीबीएसईचे सचिव हिमांशू गुप्ता यांच्यासह सॅमसंग इंडियाचे वरिष्ठ प्रमुख, शिक्षण तज्ज्ञ आणि सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई व राज्य मंडळांचे प्रतिनिधीत्व करणारे शेकडो शिक्षक उपस्थित होते.

''मुंबई भारतीय शिक्षणामधील नाविन्यतेच्या उत्साहाचे प्रतिनिधीत्व करते. गॅलॅक्सी एम्पॉवर्डसह आम्ही देशभरातील शिक्षकांना आवश्यक साधनांसह सुसज्ज करत आहोत, ज्यामुळे ते विद्यार्थ्यांशी अधिक संलग्न होतील, त्यांच्यामध्ये जिज्ञासूवृत्ती निर्माण करतील आणि वर्गामध्ये अर्थपूर्ण परिवर्तन घडवून आणतील. आमचा २०२५ पर्यंत २०,००० शिक्षकांना सक्षम करण्याचा दृष्टिकोन आहे आणि मुंबई त्या प्रवासामधील महत्त्वपूर्ण टप्पा आहे,'' असे सॅमसंग इंडियाचे एमएक्स बिझनेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजू पुल्लन म्हणाले.

''भारत झपाट्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि सॅमसंग गॅलॅक्सी एम्पॉवर्ड सारख्या उपक्रमांमधून कुशल, भविष्यासाठी सुसज्ज देश घडवण्याप्रती आमची संयुक्त कटिबद्धता दिसून येते. प्रत्येक व्यक्तीने आपले सर्वोत्तम दिले तर कोणीही भारताला विश्व गुरू बनण्यापासून थांबवू शकत नाही. सॅमसंग यासंदर्भात प्रेरणदायी दिशा स्थापित करत आहे. शिक्षकांना सक्षम करत आपण एकत्रित समाजाच्या भविष्याला आकार देऊ आणि भारत नव्या उंचीवर पोहोचेल,'' असे महाराष्ट्राचे कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले.

# सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस आपला सहा पट विस्तार करत २०२५ दरम्यान भारतातील २०,००० विद्यार्थ्यांना भावी तंत्रज्ञान क्षेत्रात प्रशिक्षित करणार

**मुंबई, १५ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज आपला प्रमुख सीएसआर उपक्रम 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस (एसआयसी)'च्या विस्तारीकरणाची घोषणा केली, ज्यासह भारतातील तरूणांना भविष्यासाठी सुसज्ज कौशल्यांसह सक्षम करण्यासोबत सरकारच्या डिजिटल इंडिया व स्किल इंडिया दृष्टिकोनाला पाठिंबा देण्याप्रती आपली कटिबद्धता अधिक दृढ केली आहे.

यंदा हा स्किलिंग उपक्रम २०२४ मधील चार राज्यांवरून १० राज्यांपर्यंत विस्तारित होईल. हा उपक्रम २०,००० विद्यार्थ्यांना २०२५ दरम्यान आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), बिग डेटा आणि कोडिंग अँड प्रोग्रामिंग अशा भावी तंत्रज्ञान कौशल्यांमध्ये अधिक कुशल करेल, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या ३,५०० विद्यार्थ्यांच्या तुलनेत सहा पट वाढ होईल. तंत्रज्ञान प्रशिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना कामाच्या ठिकाणी सुसज्जता वाढवण्यासाठी सॉफ्ट स्किल्ससंदर्भात मार्गदर्शन देखील मिळेल, तसेच पात्र उमेदवारांना संबंधित उद्योगांमध्ये प्लेसमेंटसंदर्भात साह्य करण्यात येईल.

''सॅमसंगला भारतातील विकास प्रवासामधील दीर्घकालीन सहयोगी असण्याचा अभिमान वाटतो. भारत सरकारच्या स्किल इंडिया व डिजिटल इंडिया अभियानांशी संलग्न असलेल्या सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमधून तरूणांना संधी देण्यासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा आमचा समान दृष्टिकोन दिसून येतो. सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसच्या माध्यमातून आम्ही भारतातील तरूणांना भविष्यासाठी सुसज्ज कौशल्यांसह सक्षम करत आहोत, त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी आणि देशाच्या प्रगतीला गती देण्यासाठी सुसज्ज होण्यास मदत करत आहोत. आम्ही विशेषत: वंचित समुदायांमधील विद्यार्थ्यांसाठी स्किलिंग उपलब्धता व रोजगार संधी वाढवण्याकरिता, तसेच भारत सरकारच्या डिजिटली सक्षम भारत घडवण्याच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देण्याप्रती कटिबद्ध आहोत,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पार्क म्हणाले.

# अपग्रेड केलेल्या २०२५ मेटिअर ३५० सह क्रूझिंगला एका नवीन पातळीवर घेऊन जा

**मुंबई, १५ सप्टेंबर :** रॉयल एनफिल्ड या मध्यम आकाराच्या मोटरसायकल श्रेणीमधील जागतिक अग्रणी कंपनीने आज भारतात नवीन व उत्साहपूर्ण मेटेअर ३५० श्रेणीच्या लाँचची घोषणा केली. लक्षेवधक सूर्यास्त, तूफानी महामार्ग आणि साहसी प्रवासासाठी डिझाइन करण्यात आलेली मेटेअर ३५० अद्वितीय क्रूझर डिझाइन, विशिष्टता, सर्वोत्तम कार्यक्षमता आणि आरामदायी राइडिंग एर्गोनॉमिक्ससह मध्यम आकाराच्या क्रूझर विभागामध्ये मापदंड स्थापित करत आहे. २०२० मध्ये लाँच करण्यात आलेल्या मेटेअर ३५० ने लांबच्या प्रवासादरम्यान प्रभावी राइडिंग आणि शहरामधील सुलभ प्रवासासाठी सुधारित, सर्वोत्तम मोटरसायकल म्हणून प्रतिष्ठा निर्माण केली आहे. नवीन अवतारामध्ये ही मोटरसायकल फायरबॉल, स्टेल, अरोरा व सुपरनोवा या व्हेरिएण्ट्समध्ये नवीन वैशिष्ट्ये व सुधारणांसह, तसेच सात आकर्षक नवीन रंगांसह येते.



नवीन मेटेअर ३५० बाबत मत व्यक्त करत आयशर मोटर्स लि.चे व्यवस्थापकीय संचालक आणि रॉयल एनफिल्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. गोविंदराजन म्हणाले, ''मेटेअर ३५० नेहमी मोटरसायकल म्हणून अग्रस्थानी राहिली आहे. या मोटरसायकलमध्ये कालातीत डिझाइनसह आधुनिक काळातील आरामदायीपणाचे संयोजन आहे, ज्यामुळे सहज क्रूझिंगचा आनंद घेणाऱ्या राइडर्ससाठी परिपूर्ण सोबती आहे. नवीन व उत्साहपूर्ण श्रेणीसह आम्ही या मोटरसायकलच्या आकर्षकतेला अधिक पुढे नेले आहे, श्रेणीमध्ये आकर्षक नवीन रंगसंगती, सुधारित वैशिष्ट्ये आणि सुधारणा सादर केल्या आहेत, ज्या आरामदायी राइडिंगच्या आनंदाला अधिक उत्साहित करतात. मेटेअर ३५० फक्त मोटरसायकल नाही तर आरामदायी प्रवास आणि खुल्या रस्त्यावर संस्मरणीय अनुभवासाठी जीवनशैली स्टेटमेंट आहे. आम्ही यंदा सणासुदीच्या काळात ग्राहकांसाठी मेटेअर ३५० ची ही नवीन श्रेणी सादर करण्यास अत्यंत उत्सुक आहोत.''

नवीन उत्साहपूर्ण मेटेअर ३५० श्रेणी शहरातील राइडिंगपेक्षा साहसी राइडिंगचा आनंद घेण्याची इच्छा असलेल्या राइडर्सचे लक्ष वेधून घेईल, तसेच राइडर्सना अद्वितीय आकर्षकतेमधून प्रेरित संस्मरणीय प्रवासाचा आनंद देईल. आरामदायी व उत्साहपूर्ण एर्गोनॉमिक्स, बारकाईने एकीकृत केलेले ट्रिपर नेव्हिगेशन, एलईडी हेडलाइट आणि इतर मेकॅनिकल वैशिष्ट्ये, जसे असिस्ट-ॲण्ड-स्लिप क्लच व ॲडजस्टेबल लेव्हर्स यांसह मेटेअर ३५० लांबच्या प्रवासादरम्यान अधिकधिक संस्मरणीय राइडिंगचा आनंद देण्यासाठी परिपूर्ण सोबती आहे.

# अभिनेत्रींनी त्यांच्या बॅगेमध्ये नेहमी असणाऱ्या दैनंदिन आवश्यक वस्तूंबाबत सांगितले!

**मुंबई, १५ सप्टेंबर :** तुमच्या आवडत्या अभिनेत्री त्यांच्या बॅगेमध्ये कोणत्या वस्तू ठेवतात असा विचार करत आहात का? नेहमीचे वॉलेट व फोन व्यतिरिक्त त्यांच्या बॅगेमध्ये विलक्षण, व्यावहारिक आणि कधी-कधी अचंबित करणाऱ्या आवश्यक वस्तू असतात. सौंदर्य प्रसाधनांपासून लकी चार्मपर्यंत एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री नीहारिका रॉय (सावी, 'घरवाली पेडवाली'), गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') आवश्यक वस्तू सोबत घेतल्याशिवाय कधीच घराबाहेर पडत नाहीत. आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील नीहारिका रॉय ऊर्फ सावी म्हणाल्या, ''माझ्या बॅगेमध्ये नेहमी आवश्यक व धमाल वस्तू असतात. पहिली वस्तू म्हणून माझे हेडफोन्स, मी चालता-फिरता संगीताचा आनंद घेतल्याशिवाय राहू शकत नाही. माझ्या बॅगेमध्ये लिप बाम व परफ्यूम देखील असते, कारण मला दिवसभर ताजेतवाने राहायला आवडते. मी सनग्लासेसचा वापर करते, ज्यामुळे ते कधीच विसरू शकत नाही. ऐकल्यानंतर काहीसे विलक्षण वाटेल, पण मी माझ्या बॅगेमध्ये लहान सॉफ्ट टॉय कीचेन देखील ठेवते. यामुळे मला माझ्या बालपणाची आठवण येते आणि कीचेनकडे पाहिल्यानंतर त्वरित मूड उत्साहित होतो.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''माझी बॅग माझ्यासाठी मिनी सर्व्हायवल किट आहे. मी नेहमी माझ्यासोबत वेट वाइप्स आणि लहान सॅनिटायझर बॉटल ठेवते, ते कधीच विसरत नाही. मी ड्रायफ्रूट्सने भरलेला लहान डबा देखील सोबत ठेवते, ज्यामुळे मी शूटिंगदरम्यान त्वरित ऊर्जा मिळण्यासाठी ड्रायफ्रूट्स खाते. आणखी एक विलक्षण वस्तू म्हणजे पॉकेट आकाराचा ब्ल्यूटूथ स्पीकर. संगीत माझे सोबती आहे आणि मला ब्रेकदरम्यान गाणी ऐकायला आवडतात. आणि हो, मी नेहमी माझ्या बॅगेमध्ये आकर्षक लिपस्टिक ठेवते, जे माझ्यासाठी आत्मविश्वास वाढवणारे आहे (हसतात).'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''माझ्या बॅगेमध्ये व्यावहारिक व लहान वस्तू असतात, ज्या मला प्रेरित करतात. मी नेहमी नोटपॅड सोबत घेऊन जाते, ज्यामुळे काही रोचक गोष्टी आढळल्यास त्वरित त्यांची नोंद करता येते. मला वाचन करायला आवडते, तुम्हाला माझ्या बॅगेमध्ये पुस्तक किंवा कांदबरी पाहायला मिळेल, जे मी सध्या वाचत आहे. अर्थातच, मी बॅगेमध्ये काही मेक-अपच्या वस्तू देखील ठेवते, लहान पाऊचमध्ये काजळ व कॉम्पॅक्ट पावडर असते. आणि हो, मी सोबत काही हर्बल ग्रीन टी सॅशे घेऊन जायला कधीच विसरत नाही. ते ब्रेक्सदरम्यान माझे परिपूर्ण सोबती आहेत, जे मला रिफ्रेश करतात. माझी बॅग माझ्यासाठी एक लहानसे विश्व आहे.''

# सॅमसंगकडून भारतात आकर्षक फ्लोरल डिझाइन आणि दीर्घकालीन कार्यक्षमता असलेल्या सिंगल डोअर रेफ्रिजरेटर्सची नवीन श्रेणी लाँच

**मुंबई, १५ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज १८३ लिटर क्षमतेमधील त्यांच्या नवीन सिंगल डोअर रेफ्रिजरेटर श्रेणीच्या लाँचची घोषणा केली, जी किफायतशीर व स्टायलिश रेफ्रिजरेटर्सचा शोध घेत असलेल्या भारतातील कुटुंबांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. दोन फ्लोरल पॅटर्न्स बेगोनिया व वाइल्ड लिलीमधील आठ नवीन मॉडेल्ससह नवीन सिंगल डोअर रेफ्रिजरेटर्स लाल व निळ्या रंगांमध्ये आणि ३ स्टार व ५ स्टार एनर्जी रेटिंग्जमध्ये उपलब्ध आहेत. नवीन श्रेणीमध्ये आकर्षक डिझाइन, प्रगत वैशिष्ट्ये आणि उच्च दर्जाचा टिकाऊपणा आहे, ज्यामुळे ही श्रेणी दैनंदिन राहणीमानामध्ये स्टाइल व विश्वसनीयतेचा शोध घेत असलेल्या कुटुंबांसाठी योग्य निवड आहे.



आकर्षकता लक्षात घेत डिझाइन करण्यात आलेली नवीन सिंगल डोअर श्रेणी भारतातील आधुनिक कुटुंबांसाठी तयार करण्यात आली आहे. बेगोनिया व वाइल्ड लिली फ्लोरल पॅटर्न्स किचनचे लुक अधिक सुशोभित करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. स्लीक ग्रॅण्डे डोअर डिझाइनसह बार हँडल्स प्रीमियम अनुभवासह सोईस्कर वापराची खात्री देतात. आकर्षक रंगसंगती आणि लक्षवेधक पॅटर्न्ससह हे रेफ्रिजरेटर्स फक्त अप्लायन्सेस नाही तर स्टेटमेंट पीसेस आहेत, ज्यामध्ये आकर्षकता व कार्यक्षमतेचे उत्तम संयोजन आहे.

या नवीन श्रेणीमध्ये दैनंदिन उपयुक्तता वाढवण्यासाठी सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत. डिजिटल इन्व्हर्टर कॉम्प्रेसरसह २० वर्षांची वॉरंटी शांतपणे कार्यसंचालन, ऊर्जा कार्यक्षमता आणि काळासह विश्वसनीय कामगिरीची खात्री देते. स्टेबिलायझर-फ्री ऑपरेशनसह रेफ्रिजरेटर विद्युत चढ-उतारादरम्यान स्थिरपणे कार्यरत राहतो, इलेक्ट्रिकल नुकसान होण्यापासून संरक्षण करतो. आतील बाजूस प्रखर एलईडी लॅम्प प्रत्येक कोपऱ्यावर प्रकाश देतो, तसेच कमी प्रमाणात वीजेचा वापर करतो आणि समकालीन बल्बच्या तुलनेत दीर्घकाळापर्यंत टिकतो. शक्तिशाली काचेचे शेल्फ जवळपास १७५ किग्रॅ वजन धरू शकते, यामुळे अवजड भांडी सहजपणे ठेवता येतात. निवडक मॉडेल्समध्ये बास स्टॅण्ड ड्रॉवर येतो, जो ११.८ लिटर अतिरिक्त स्टोरेज देतो आणि कांदे व बटाटे यांसारख्या कोरड्या वस्तू व्यवस्थितपणे आणि कूलिंग जागेपासून वेगळे ठेवण्यासाठी अगदी योग्य आहे.

नवीन सिंगल डोअर रेफ्रिजरेटर श्रेणीची किंमत ३ स्टार मॉडेल्ससाठी १९,९९९ रूपये आणि ५ स्टार मॉडेल्ससाठी २१,९९९ रूपये या किमतींपासून सुरू होते. या लाँचसह सॅमसंगने भारतातील कुटुंबांना आधुनिक आकर्षकता, उच्च दर्जाची कार्यक्षमता आणि अद्वितीय टिकाऊपणाचे संयोजन असलेल्या अप्लायन्सेससह सक्षम करण्याप्रती आपली कटिबद्धता कायम ठेवली आहे, त्यांच्या दैनंदिन राहणीमानाला प्रभावी स्टायलिश अनुभवामध्ये बदलत आहे.


# सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत आपण अन्विताचे मंगेतर असल्याचे सांगून विराट वेळ मारून नेतो, पण त्याचे रहस्य उघड झाले की सगळे काही नष्ट होईल?

**मुंबई, १५ सप्टेंबर :** सोनी सबवर अलीकडेच लॉन्च झालेल्या इत्ती सी खुशी मालिकेचे हृदयस्पर्शी कथानक आणि यथार्थ चित्रण यामुळे लोकांना ही मालिका आवडली आहे. या मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)ची कहाणी आहे, जी एक तरुणी आहे आणि आपले कुटुंब एकत्र आणि सुरक्षित ठेवणे इतकेच तिचे स्वप्न आहे. तिच्या वयाच्या इतर मुलींप्रमाणे मोठ्या आकांक्षा मनात बाळगण्याऐवजी अन्विता कोणतीही कामे करते, कसाबसा घरखर्च चालवते आणि प्रेमाने आणि दृढतेने आपल्या पाच धाकट्या भावंडांचा सांभाळ करते. तिला या परिस्थितीत ढकलणारे तिचे वडीलच आहेत. तिचे वडील सुहास (वरुण बडोला) दारूच्या व्यसनाच्या आहारी गेला आहे आणि या व्यसनातच त्याने आपल्या कुटुंबाला निराधार सोडले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, सुहासचे वागणे अचानक बदललेले दिसले आहे. आपल्याकडे आता फार दिवस नाहीत असे त्याला वाटू लागले आहे. आपण आदर्श पिता आहोत असे भासवून तो आपल्या मुलांचे मन जिंकण्याचा प्रयत्न करत आहे, पण अन्विता त्याच्याबाबत साशंक आहे. दुसरीकडे, विराट (रजत वर्मा) आपल्या गोड वागण्याने अन्विताचे मन जिंकतो, तर संजय (ऋषी सक्सेना) चौकशी करत करत विराटचे रहस्य उलगडण्याच्या अगदी जवळ येऊन पोहोचला आहे.

आगामी भागांमध्ये, सुहास पुन्हा व्यसनाधीन होतो त्यात चिकूच्या पीटीएमला देखील तो उपस्थित रहात नाही. सुहास न गेल्यामुळे अन्विता आणि सिद्धू चिकूच्या पीटीएमला जातात आणि चिकूला आता शाळेतून काढून टाकणार अशी भीती वाटत असतानाच विराट एंट्री घेतो आणि आपले अन्विताशी लग्न ठरले असल्याचे जाहीर करतो. ते ऐकून ती स्तब्ध होते. दरम्यान, विराटचा पार्टनर विजय याला संजय अटक करतो आणि विराटचे रहस्य उलगडण्याच्या जवळ पोहोचतो. संजय विराटचे सत्य शोधून काढण्याच्या जवळ पोहोचत असताना विराटच्या रूपात अन्विताला मिळालेला आनंद टिकणार का? की एक रहस्य तिचे सारे सुख हिरावून नेणार?

इत्ती सी खुशी मालिकेत अन्विताची भूमिका करणारी सुंबुल तौकीर खान म्हणते, अन्विता समोर मोठा कसोटीचा क्षण उभा राहणार आहे. आपल्या वडीलांच्या वागण्यात अचानक झालेला शंकास्पद बदल आणि विराटने लपवलेली गुपितं याची शहानिशा तिला करावी लागणार आहे. एक अभिनेत्री म्हणून माझ्यासाठी हा प्रवास खूप समाधान देणारा आहे, कारण यात दाखवले आहे की, जीवनाच्या अस्ताव्यस्त पसाऱ्यात देखील प्रेम आणि आशा कशी जिवंत राहू शकते. अन्विताच्या व्यक्तिरेखेत खूप कंगोरे आहेत. ती जीवनात सगळे नीटनेटके असलेली स्त्री नाही. ती हळवी आहे, तिला रागही येतो, ती कोसळते पण कुटुंबाबद्दलचे आपले कर्तव्य ती कधीच विसरत नाही.

## शब्दकोडे क्रमांक २२१८



**आडवे शब्द :-**
१) अनावर राग येणे (वा.प्र.)
८) अकरावी रास
९) गर्दभ
१०) पर्ण
११) कत्तल
१३) डोक्यावर हळूच मारलेली चापट
१५) उसनवार
१६) देशाचे नाणे
१७) शरीर
१९) मृत्तिका
२०) हिंदीत शरीर
२१) सर्वस्व
२४) नगण्य किंमत
२५) हरीणाची शिकार
२८) आश्चर्य
३०) मनाची घालमेल, तडफड
३१) कर्णेंद्रिय
३२) एक अधिक एक चतुर्थांश
३३) चलाख, हुषार
३५) आंबट, गोड चवीचे काटेरी फळ
३७) हस्त
३८) रानरेडा
४०) धुंदी, कैफ
४१) घर
४२) फोडणीचे वरण
४३) पुन्हा
४४) छाया
४५) देवाण घेवाण(हिं.)
४६) पायाने अधु असलेली
४७) विद्या
४९) रव्याचा एक गोड पदार्थ
५१) गाजावाजा
५२) एकश्वासरोग
५४) विळखा, मिठी
५५) सिंह
५७) दृष्टीभेट
६०) मनालाटोचणारे दु:ख
६१) पटाईत
६३) पुरुष
६४) वांती
६६) गाय
६७) वारा
६८) दोन मैल
६९) अर्धा शेर

**उभे शब्द :-**
१) झीज सोसण्याची पराकाष्ठा करणे
२) दाट, निबिड, खोल
३) वात्रट
४) लहान बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५) दुर्दशा
६) अतिशय खरडपट्टी काढली (वा.प्र.)
७) वडिलांची बहीण
८) कर्णभुषण
११) निरुपाय
१२) सोन्याचे हरिण
१४) पडणे
१८) वाहन
१९) मनुष्य
२२) नंतर
२३) श्रीमंत
२६) येरझार, जाणे-येणे, हेलपाटा
२७) यज्ञ
२९) वाईट सवय
३२) कांबळी विणणारी जमात
३४) तृषित
३६) सदोदित
३९) अर्धा नारळ, गुडघ्याचे वर्तुळाकार हाड
४१) चुन्याचे पाणी
४२) हुकूमा, आज्ञा
४३) पान
४४) लाकडाची एक उत्कृष्ठ जात
४६) उपकार
४७) अर्धवर्तुळाकार
४८) एक गड्डा भाजी
५०) अरण्य
५१) हत्तींचा राजा
५२) हिंदीत भेग, दुही
५३) मऊ
५४) सत्वांश
५६) ढीग
५८) जन्म
५९) एक गळीत धान्य
६२) बारा वर्षाचा काळ
६५) पुरुष

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# माऊंटन ड्यू ची नवीन ४०० मिली पेट पॅक २० रूपयांत

**अमरावती, १५ सप्टेंबर :** पेप्सिको इंडियाचा धाडसी आणि निर्भय पेय ब्रँड माउंटन ड्यू ने फक्त २० रूपयांत आपला नवीन ४०० मिली पेट पॅक आणण्याची घोषणा केली आहे. या अविस्मरणीय अनावरणासह माउंटन ड्यू ने डर के आगे जीत है या आपल्या प्रतिष्ठित तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहून अधिक मूल्य आणि सुलभता प्रदान करण्यासाठी किमतीचे मूल्य वाढवले आहे. ब्रँडच्या चाहत्यांना प्रत्येक सिपमध्ये धैर्य आणि रोमांच स्वीकारण्यास प्रेरित केले जात आहे.

या मोहिमेबद्दल बोलताना हृतिक रोशन म्हणाले की: भीती ही अशी गोष्ट आहे जी आपण सर्वजण अनुभवतो. परंतु आपले धैर्य आपली ताकद ठरते. नवीन माउंटन ड्यू जाहिरात धैर्य स्वीकारण्याची आणि विश्वासाची झेप घेण्याची शक्ती पुन्हा स्पष्ट करते. मला अशा ब्रँडशी जोडले जाण्याचा अभिमान आहे जो 'डर के आगे जीत है' या तत्वज्ञानाने लाखो लोकांना प्रेरणा देतो. आता, नवीन २० रूपयांत ४०० मिली पॅकसह माउंटन ड्यू हा अनुभव आणखी सुलभ बनवतो.

या नवीन उत्पादनाबाबत बोलताना पेप्सिको इंडियाच्या माउंटन ड्यू श्रेणी प्रमुख आकांक्षा दलाल म्हणाल्या: माउंटन ड्यूबाबत आमचे तत्वज्ञान नेहमीच लोकांना आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रेरित करण्याचे. आमच्या २० रूपयांत ४०० मिलीच्या पेट पॅकचे अनावरण आमच्या धाडसी ओळखीशी खरे राहून ड्यू अनुभव अधिक सुलभ बनवण्याच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे. ग्राहकांकडून आलेल्या माहितीवर आधारित राहून हा नवीन उपक्रम तडजोड न करता जास्त मूल्य देतो आणि हृतिक रोशनसोबतची आमची नवीन जाहिरात माउंटन ड्यूची व्याख्या करणाऱ्या धैर्य आणि विजयाचे सार उत्तम प्रकारे टिपते.


## आज का अंदाज

मंगळवार १६ सप्टेंबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| १३६ | २४५ | २६६ | १२४ | १४८ | ६९० | १७८ | १९९ |
| ३७० | ५६० | ६९९ | २७८ | ३४६ | ७८० | ३५८ | ५७७ |
| ५७८ | ३८० | ७७० | ४६७ | २३८ | ५०० | २७७ | ३६० |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३० | ५० | ६१ | ९१ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३२ | ५२ | ६४ | ९४ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३८ | ५८ | ६७ | ९७ |

**१६ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६० | ९० |
| २४ | ५४ | ६८ | ९८ |
| २३ | ५३ | ६७ | ९७ |
| ३९० | ६९० | २७७ | १९९ |
| ४८० | १५९ | ७९० | २८९ |
| ५७० | २५८ | ४५७ | ३७९ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ २ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. तुमच्याकडे उत्पन्नाचे नवीन स्रोत असतील, तुमची आर्थिक बाजू मजबूत असेल. आज तुम्हाला कला आणि साहित्य क्षेत्रात रस असेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. एखाद्या नातेवाईकाकडून काही चांगली बातमी मिळेल. तुमचा जोडीदार आज तुम्ही जे काही बोलता ते समजून घेण्याचा प्रयत्न करेल, यामुळे नात्यात ताजेपणा येईल.

**मिथुन :** आज अपेक्षित यश मिळेल. नोकरी करणाजयांना प्रमोशन किंवा नवीन जबाबदाजया मिळू शकतात. जमीनतून फायदा होऊ शकतो. तुमचं आरोग्यही उत्तम राहील.

**कर्क :** आज तुम्हाला नवीन कामे करण्यात नशिबाची पूर्ण साथ मिळेल. तुमच्या कारकिर्दीत तुम्ही नवीन आयाम स्थापित कराल. कुटुंबातील सदस्याला सरकारी नोकरी मिळाल्यास वातावरण आनंददायी असेल.

**सिंह :** आरोग्यात सुधारणा होईल. भाऊ-बहिणींना मदत करावी लागेल. नात्यातील अडचणी कमी होतील. नोकरी शोधणाजयांना चांगली बातमी मिळू शकते. परंतु कान, घसा किंवा नाकाची काळजी घ्या.

**कन्या :** आज तुम्ही दैनंदिन कामांमध्ये जास्त वेळ घालवू शकता. व्यवसायात पैसे गुंतवण्यापूर्वी आज तुमच्यासाठी वडीलधाजयांचा सल्ला घेणे चांगले राहील. आज संपत्तीत वाढ होईल.

**तुळ :** मन धार्मिक कामात आणि चांगल्या गोष्टींमध्ये लागेल. शिक्षण किंवा परदेशातून चांगली बातमी मिळेल. वडिलोपार्जित संपत्तीतून फायदा होण्याचे संकेत आहेत. कामाच्या ठिकाणी तुमच्या प्रयत्नांची प्रशंसा होईल.

**वृश्चिक :** आज रागावर नियंत्रण ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. खर्च वाढू शकतो. ज्यामुळे आर्थिक नियोजन बिघडेल. कामाच्या संदर्भात बाहेर जावं लागू शकतं. कोणताही निर्णय घेताना घाई करु नका.

**धनु :** आज कामात यश मिळेल. तुमचे प्रयत्न तुम्हाला यश मिळवून देतील. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या जोडीदारासोबतचे संबंध अधिक दृढ होतील.

**मकर :** थांबलेली कामं आज पूर्ण होतील. आर्थिक स्थिती सुधारेल. शत्रूंवर विजय मिळवता येईल. नोकरीत बढतीची शक्यता आहे. कुटुंबातील सदस्यांकडून पूर्ण सहकार्य मिळेल. धनप्राप्तीचे योगही आहेत.

**कुंभ :** व्यवसायात चांगले परिणाम मिळतील. पण अज्ञात भीतीने अस्वस्थ होईल. घरातील प्रश्न शांतपणे आणि समजूतदारपणे सोडवा. खर्चावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा असणार आहे. तुमचा बॉस तुम्हाला एक नवीन जबाबदारी देऊ शकतो जी तुम्ही पूर्ण समर्पण आणि कठोर परिश्रमाने पार पाडाल, तुमच्या कामाची प्रशंसा होईल.

# ओबीसीचे आरक्षणाच्या रक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १५ :

आरक्षणाच्या मुद्द्यावरून आता ओबीसींतील विविध समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. आरक्षणाला धक्का लागू न देण्यासाठी सकल ओबीसींच्यावतीने अकोल्यात सोमवारपासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. ओबीसींचे आरक्षण वाचवण्यासाठी लोकशाही मार्गाने लढा देणार असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. राज्यात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणावरून मोठा वाद सुरू झाला आहे. मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न गंभीर टप्प्यावर आला असताना या वादामुळे समाजामध्ये असंतोष निर्माण होत असून सामाजिक सलोखा धोक्यात येत आहे. राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटला मंजुरी दिल्यानंतर आता मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळवणे शक्य झाले. मात्र, या कारणामुळे सध्या ओबीसी समाजात आरक्षणावरून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्रामध्ये ओबीसी प्रवर्गामध्ये जवळपास ३४६ जातींचा समावेश आहे. आरक्षणावरून वातावरण चांगलंच तापलेले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार मराठा समाज मागास नाही. शिवाय तो समाज सक्षम असून त्याला आरक्षण देणे योग्य नाही. राज्यात मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करून मराठा समाजाला आरक्षण दिले आहे आणि हा प्रकार ओबीसी समाजावर अन्याय करणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. याला विरोध करण्यासाठी लोकशाही मार्गाने ओबीसी समाजाच्यावतीने सोमवारपासून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. जनार्दन हिरळकर, शंकर परेकर, पुष्पा गुलवाडे, राजेश ढोमणे, अॅड. भाऊसाहेब मेडशिकर या पाच प्रतिनिधींनी आमरण उपोषणाला प्रारंभ केला. यावेळी ओबीसी समाजातील विविध नेते उपस्थित होते.

ओबीसी समाजाचे आरक्षण वाचवण्यासाठी कायदेशीर मार्गाने लढा देण्यासोबतच लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू केले. यामध्ये सर्वपक्षीय ओबीसी राजकीय नेते, डॉक्टर्स, अभियंता, वकील, प्राध्यापक, शिक्षक, शेतकरी, कर्मचारी, विद्यार्थी आदींसह सर्व घटकाने समर्थन दिल्याचे आंदोलकांनी सांगितले.




# विधान परिषद शिक्षक मतदारसंघ निवडणूक

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :

भारत निवडणूक आयोगाने अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल आणि पाच जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना हा कार्यक्रम पाठवण्यात आला आहे.

३० सप्टेंबरपासून निवडणुकीची अधिसूचना जारी होईल. त्याच दिवशी मतदार नोंदणी प्रक्रिया सुरू होईल. मतदार नोंदणीसाठी १ नोव्हेंबर २०२५ ही पात्रता तारीख निश्चित करण्यात आली आहे. १५ ऑक्टोबरला दुसरी अधिसूचना जारी होईल. २५ ऑक्टोबरला तिसरी अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली जाईल. मतदार नोंदणी ६ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहील. २० नोव्हेंबरपर्यंत प्रारूप मतदार यादी तयार होईल. विभागीय आयुक्त २५ नोव्हेंबरला प्रारूप मतदार यादी प्रकाशित करतील. १२ डिसेंबरपर्यंत हरकती आणि सूचना स्वीकारल्या जातील. २५ डिसेंबरपर्यंत सुनावणी होईल. ३० डिसेंबरला अंतिम मतदार यादी जाहीर होईल. या मतदारसंघात अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ हे पाच जिल्हे येतात.

# कंत्राटदार संघटनेच्या अध्यक्षपदी अरबाज खान पठाण यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
महागाव, दि. १५ :

महागाव तालुका कंत्राटदार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी अरबाज खान करीम खान पठाण यांची सवार्नुमते निवड करण्यात आली आहे. महागाव तालुका कंत्राटदार संघटना गेल्या अनेक वर्षांपासून तालुक्यात कार्यरत आहे. संघटनेचे ध्येयधोरणे राबवण्यासाठी संघटनेतील कंत्राटदार नेहमीच तत्पर असतात. स्थानिक विश्रामगृहात रविवारी १४ सप्टेंबर रोजी झालेल्या कंत्राटदाराच्या बैठकीत संघटनेचे अध्यक्षपदी अरबाज खान कयूम खान पठाण यांची सवार्नुमते निवड करण्यात आली तर कार्याध्यक्षपदी प्रणय करे, उपाध्यक्ष गोपाल सुरवसे, कोषाध्यक्ष किशोर आडे, सचिव बबलू मिश्रा, सहसचिव अनिल चव्हाण, सदस्य म्हणून जमीर नवाब सज्जात आली, नितीन राठोड, सदस्य सल्लागार आरिफ सुरैया, अनिकेत वानखेडे, विनोद खोंडे यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील कंत्राटदार ताहेरोदिन सय्यद जमुरोदिन नवाब, धीरज गावंडे, पवन मस्के, गजानन चव्हाण, नितीन राठोड, तारीख खान, कैलास मोहिते आदी उपस्थित होते. या निवडीबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# कुंठलेले वैचारिक जळमट प्रगतीला मारक : प्रा. फडके

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १५ :

जीवनातील कोणत्याही क्षेत्रात उंच भरारी घ्यावयाची असेल तर आधी बुद्धी ही शुद्ध पाण्यासारखी प्रवाही पाहिजे. बुद्धी व मनातील कुंठलेले वैचारिक जळमट नष्ट झालेले असावेत तरच नवीन विचारास त्यात जागा मिळून हे नवविचार नवीन क्रांती घडवून जीवनात यशप्राप्ती करून देण्यास कारणीभूत ठरू शकत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ व्याख्याते प्रा. सतीश फडके यांनी केले. नव उद्योजक व व्यापारी विश्वाच्या विकासासाठी यंग इंडिया बिझनेस क्लबच्या वतीने वायबीसी व्हिजिटर डे सोहळा शनिवारी कृष्णा इम्पेरीअल सभागृहात उत्साहात पार पडला. यात पन्नास नवीन सदस्यांनी सहभाग घेतला. या सभेत प्रा. फडके मार्गदर्शन करत होते.

यावेळी क्लबचे व्यवस्थापकीय संचालक अॅड. देवेंद्र अग्रवाल, क्लब चेअरमन नीलेश बियाणी, सचिव श्रीराम पांडे, कोषाध्यक्ष योगेश तिवारी आदी उपस्थित होते. प्रा. फडके पुढे म्हणाले, जीवनात गती आवश्यक आहे.

जीवन व्यवहाराची गाडी चालवताना ब्रेकवर पाय नकोत, अन्यथा गती मंद होईल. तसेच जीवनातील व्यवहाररुपी गाडी मंद होत असेल तर त्याचे कारण शोधणे अत्यंत गरजेचे आहे. ज्याप्रमाणे गरुड पक्षी हा आपल्या जोमाच्या काळात क्षीण होऊन जातो. आपले आपण पंख छाटतो, नखे पाडतो व चाळीस दिवस अज्ञातवासात जाऊन पुन्हा नवीन बळ, शक्ती, जोम,नवे पंख व नवे नखे प्राप्त करू नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी गगन भरारी घेतो, असा गरुड झेपेचा प्रकार मनुष्याच्या जीवनात घडणे शक्य आहे.

त्यासाठी प्रभावी महत्त्वकांक्षा,प्रबळ इच्छाशक्ती, महत्वाकांक्षा,नव्या कल्पना प्राप्त करण्याची गरज असून, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. अॅड. देवेंद्र अग्रवाल यांनी प्रास्ताविक केले. प्रा. फडके यांना क्लबचे रमाकांत खेतान व डॉ. दीपक केळकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. यावेळी नवीन सदस्यांना क्लबमध्ये समाविष्ट करण्यात आले.

# कचरा डेपोविरुद्ध नागरिकांचा संताप



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :

अमरावतीतील रहाटगाव-लालखडी रिंग रोडवरील आराधना चौकात रविवारी सकाळी नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले. स्वच्छ हवेचा पुरस्कार मिळालेल्या शहरात कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

आराधना चौकातील गजानन कॉलनी, शिवनेरी नगर, महालक्ष्मी अपार्टमेंट सह अनेक भागातील रहिवाशांनी या आंदोलनात सहभाग घेतला. भाजपचे धीरज बारबुद्धे यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. विशेष म्हणजे महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.

मनपाने आराधना चौकात अनधिकृत कचरा डेपो तयार केला होता. गेल्या दोन वर्षांपासून स्थानिक नागरिक हा डेपो हटवण्यासाठी प्रयत्नशील होते. मात्र मनपा प्रशासन दुर्लक्ष करत होते. आंदोलनानंतर अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आणि स्वास्थ्य अधिकारी डॉ. अजय जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन तात्काळ स्वच्छता मोहीम राबवली. मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांनी नागरिकांशी संवाद साधून उद्यापासून तेथे कचरा डेपो नसेल अशी हमी दिली.

शहरातील इतर भागांतही कचरा संकलनाची समस्या गंभीर आहे. कचरा गोळा करणारी वाहने आठवड्यातून एक किंवा दोनदाच येतात. खुल्या जागांमध्ये टाकलेला कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे कुजलेल्या कचऱ्याची दुर्गंधी पसरते.

माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी सभापती विजय वानखडे, गुड्डू धमाळे यांच्यासह अनेक नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला. पावसाचा अडथळा असूनही नागरिकांनी आक्रमक पवित्रा कायम ठेवला. पालिकेचे अधिकारी येईस्तोवर ते याच ठिकाणी ठिय्या देऊन बसले होते. उपाययोजना जाणून घेतल्यानंतरच आंदोलन मागे घेण्यात आले.

# औरंगजेब दुग्धाभिषेकचे शहरात उमटले पडसाद : शिवसेनेकडून जागेचे शुद्धिकरण

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १५ :

औरंगजेबाच्या दुग्धाभिषेकचे रविवारी पडसाद उमटले. शिवसेनेच्या शिंदे गटाकडून त्या जागेचे शुद्धिकरण केले. या वेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले.

ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त काढलेल्या मिरवणुकीत टिळक रोड परिसरातील कापड बाजारजवळ औरंगजेब व इब्राहीम गाझीच्या फोटोला दुग्धाभिषेक केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमावर व्हायरल झाला होता. याप्रकरणी आरोपींविरूद्ध सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.



दरम्यान युवकांनी औरंगजेबाच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून हिंदूंच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न केला, अशी टीका करीत शिवसेनेने आंदोलन केले. या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अश्विन नवले, महानगर प्रमुख योगेश अग्रवाल, शहर प्रमुख, रमेश गायकवाड ,अविनाश मोरे ,शशिकांत चोपडे, पप्पू मोरवाल, सागर पूर्णेय, मधुकर सोनारगन, उपशहर प्रमुख गणेश गोगे, सुमित पानझडे, शिवम पुरोहित, राजेश दांडेकर, भूषण इंदोरीय, सचिन पाचपोर, आकाश दलाल, गोपाल नागपुरे, रवी देशमाने, ममता जैन, संगीता शुक्ला, जयश्री पवार, शितल गिरी, उज्वला इंगळे उपस्थित होत्या. औरंगजेबाने हिंदूंवर अत्याचार केले. हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र छत्रपती संभाजी महाराजांवर अत्याचार करून त्यांची हत्या केली. त्या औरंगजेबाला एवढा सन्मान या महाराष्ट्राच्या भूमीवर देण्यामागे कुठली मानसिकता आहे, असा सवाल शिवसेनेने उपस्थित केला.

# शेतकऱ्यांना पाहता येणार सोयाबीनचे ४४ वाण

## मोर्शी मार्गावरील प्रादेशिक संशोधन केंद्रात मंगळवारी गळीत धान्य कार्यशाळेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गतचे येथील प्रादेशिक संशोधन केंद्र हे प्रमुख सोयाबीन संशोधन केंद्र आहे. शेतकऱ्यांना सोयाबीनच्या विविध वाणांबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती मिळावी, यासाठी आरआरसीच्या वतीने येथील मोर्शी मार्गावरील प्रादेशिक संशोधन केंद्राच्या परिसरात एकाच ठिकाणी सोयाबीनच्या ४४ वाणांचे प्रात्यक्षिक प्लॉट तयार केले आहेत. ते शेतकऱ्यांना १६ सप्टेंबरला पाहता येणार आहे.



शेतकऱ्यांसाठी सोयाबीनचे पीडीकेव्ही-अंबा, पीडीकेव्ही- सुवर्ण सोया, पीडीकेव्ही-यलो गोल्ड, पीडीकेव्ही- पूर्वा असे अनेक वाण आजपर्यंत या संशोधन केंद्राद्वारे प्रसारित करण्यात आलेत. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना अधिक उत्पादनक्षम व त्यांच्याकरिता सुयोग्य वाणाची निवड करणे सोयीचे व्हावे, याकरिता प्रादेशिक संशोधन केंद्राने पुढाकार घेतला आहे. मध्य भारत व महाराष्ट्रासाठी प्रसारित सोयाबीनच्या ४४ वाणांची प्रात्यक्षिक स्वरुपात लागवड एकाच ठिकाणी पहिल्यांदा करण्यात आली आहे. या वाणांच्या गुण वैशिष्ट्यांची माहिती शेतकऱ्यांना व्हावी, त्यांना योग्य वाण निवडता यावे, तसेच लागवडीपूर्वी ते वाण प्रत्यक्ष पाहता यावे, अनुभवता यावे जेणेकरून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधावी, या हेतूने प्रादेशिक संशोधन केंद्र अमरावती आणि विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने सोयाबीन पिकाच्या विविध वाणांच्या पाहणी व विभागीय गळीत धान्य कार्यशाळेचे आयोजन मंगळवार, १६ सप्टेंबरला प्रादेशिक संशोधन केंद्रात केले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख राहणार असून, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पीडीकेव्ही अकोलाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदिरवाडे, संचालक संशोधन डॉ. श्यामसुंदर माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते तसेच प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावतीचे प्रमुख डॉ. सतीश निचळ यांनी केले आहे.


## पंचायत समिती नरखेड,
### जिल्हा परिषद, नागपूर

**जाहीर निविदा क्र. १**

पंचायत समिती नरखेड १५ या वित्त आयोग सन २०२२-२३ अंतर्गत पं. स. सर्कल पिपळा के. अंगणवाडी वॉटरटॅंक वॉश बेसिक पुरविणे खरेदी करण्याकरिता उत्पादन अधिकृत विकेते पुरवठा धारक यांचे कडुन निविदा पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | अंदाजे रुपये | दरपत्रक सादर करण्याचा अतिम दिनांक वेळ व ठिकाण | दरपत्रक उघडण्या-साठी दिनांक वेळ व ठिकाण त्याचदिवशी |
|---|---|---|---|---|
| १ | पं.स. सर्कल पिपळा के. अंगणवाडी वॉटरटॅंक वॉश बेसिक पुरविणे | २८९१८४ | दिनांक २२/०९/२०२५ वेळ 1.00 PM | पंचायत समिती नरखेड दिनाक २२/०९/२०२५ वेळ 4.00 PM |

गटविकास अधिकारी
पंचायत समिती काटोल

## सार्वजनिक जाहीरनामा

हि सर्व सामान्य जनतेस कळविण्यात येते की शकील राशिद शेख यांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मालमत्ता खरेदी केलेली आहे :
प्लॉट क्रमांक ९०४, खसरा क्रमांक १२३/१, सी.टी.एस. क्रमांक १४५४, पत्ता -- बुध नगर, मौजा इंदोरा, नागपूर.
जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक अथवा प्राधिकरणास वरील मालमत्तेबाबत कोणताही हक्क, दावेदारी, स्वामित्व हक्क, तारण हक्क किंवा हरकत असल्यास त्यांनी या जाहीरनाम्याच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत त्यांचे दावे/हरकती आवश्यक original कागदपत्रांसह खाली सही केलेल्या अधिवक्त्यास लेखी स्वरूपात कळवाव्यात.
निर्धारित कालावधीत जर कोणतेही दावे/हरकती प्राप्त झाल्या नाहीत, तर असे समजण्यात येईल की सदर मालमत्तेबाबत कोणाचाही कोणताही दावा/हक्क/हरकत नाही व खरेदी-विक्री व्यवहार वैध, अंतिम व बाध्यकारी राहील.

(शिल्पा एस. श्रीवास)
अधिवक्ता
पत्ता : प्लॉट नं. ३६५, सतराम धाम रोड, जरीपटका, नागपुर - ४४००१४
मो. ९३७२६९३९१५, ८६६८३७३४५३

## महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. [illegible]

क्र.ग.प्र./जन्म (शहर)/कवि-१७४/२०२५ दिनांक १५/०९/२०२५

वाचा : १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. म . उ प . सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. म . जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. गंगोत्री रामचंद्र वाट, रा. पारडी, पुनापूर, भवानी नगर, हनुमान मंदिर जवळ, जुनी वस्ती, पारडी, नागपूर यांच्या अर्ज दिनांक २५/०६/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार गंगोत्री रामचंद्र वाट, रा. पारडी, पुनापूर, भवानी नगर, हनुमान मंदिर जवळ, जुनी वस्ती, पारडी, नागपूर यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू आरोशी वाट यांचा जन्म दिनांक ०९/०६/१९९७ रोजी त्यांच्या राहते घरी पारडी, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

## जाहीर सूचना

मेरे पक्षकार नामे श्रीमती पारसमनी वि. राजेश शाहु, उम्र- ५५ वर्ष, निवासी - ४९७, हनुमान नगर, प्रोफेसर कॉलोनी, नागपूर-४४०००९ इन्होंने दी हुई जानकारी, निर्देश एवं अधिकार अनुसार आम जनता को सूचित किया जाता है की, श्री. स्वप्नील वल्द राजेश शाहु, निवासी-प्लॉट नं. १२, ९ला माला, आगे नेहा बखे, व्यंकटेशन नगर, खामला, नागपुर-४४००२५ (महाष्ट्र) इनको निम्नलिखित मालमत्ता के बारे में जो आममुखत्यारनामा (रजिस्टर्ड) एनजीएन-८३९०१/२०२२ पेज १ से १७ दिनांक २३.०६.२०२२ जो सहाय्यक दुय्यम निबंधक-२, सिटी नं. ८, तहत लिखकर दिया था वह आममुखत्यारनामा पूरी तरह रद्द करने हेतु दिनांक २१.०८.२०२५ को अधिवक्ता शिल्पा एस. श्रीवास इनकी तरफ से रजिस्टर्ड ए.डी. नोटीस दिया था जिसका अभी तक कोई भी जवाब न देने के कारण यह जाहीर सूचना दी जाती है की, उपरोक्त संदर्भीत आममुखत्यारनामा दिनांक २३.०६.२०२२ उसमें लिखी हुयी शर्तों के पालन न करने से तथा उस संदर्भ में मेरे पक्षकार से कोई भी संपर्क न होने से पूरी तरह रद्द किया जाता है तथा उसके तहत मालमत्ता गट क्रं. ११२/४, आराजी-२.०१ हे.आर., मौजा-नांदा, तह. कामठी, जिल्हा-नागपुर पूर्णतः रद्द करने के लिए जाहीर सूचना दी जाती है। जिस किसी को इस बारे में जो भी हरकत, आक्षेप है वह इस जाहीर सूचना प्रसिद्ध होने के बाद १० दिन के अंदर निम्नलिखित अधोहस्ताक्षरीत को लिखीत स्वरुप में जानकारी सह संपर्क करें। १० दिन के मोहलत के बाद किया हुआ आक्षेप, हरकत, उजर बाह्य नहीं होगा।
नागपुर
दिनांक : १५/०९/२०२५

(शिल्पा एस. श्रीवास)
अधिवक्ता
पत्ता : प्लॉट नं. ३६५, सतराम धाम रोड, जरीपटका, नागपुर - ४४००१४
मो. ९३७२६९३९१५, ८६६८३७३४५३

## कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर
### सायटेशन नोटीस

एम.जे.सी. केस नं. ७८/२०२५ — पे.ता. २७/१०/२०२५ प्रोसेस नं. ११८६/२०२५ दि. ०५/०९/२०२५

अर्जदार : १) मानीक बाजीराव येंडे, २) राजु मानीकराव येंडे, दोन्ही रा. घर नं. ९९, नागोबा मंदिर जवळ, वार्ड नं. १, भोवरी, पो. गुमथाळा, जि. नागपूर. ३) कल्पना शेषरावजी कुथे रा. सार्वजनिक विहीर जवळ, वार्ड नं.३, कुणबी पुरा, दुर्गा चौक, येरखेडा, ता. कामठी, जि. नागपूर.
विरुद्ध
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : जिवन मानीक येंडे, मयत दि. १५/०३/२०20

सदरहू अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे १८२७ कम ८ प्रमाणे या न्यायालयात मयतदार जिवन मानीक येंडे, दि. १५/०३/२०20, रा. भोवरी, ता. कामठी, जि. नागपूर यांचे वारसान सर्टीफिकेट मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार मयताचे वारसान नव्हे, असा कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्याने त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर सदरहु मुदतीत सर्व संबंधित नातेवाईकांना व आमन जनतेकडून योग्य ती हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास सदरहु न्यायालय अर्जदार यांचा सदरहु मयतदार जिवन मानीक येंडे, मयत दि. १५/०३/२०20, रा. भोवरी, ता. कामठी, जि. नागपूर ह्यांचे त्यांना वारसान प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कामठी यांचे न्यायालयात कामठी, जि. नागपूर
### जाहिरनामा/सायटेशन नोटीस

Succ. No. 02/2025 — पे.ता. ०६/१०/२०२५ प्रोसेस नं. ११/७५/२०२५ दिनांक : १०/०९/२०२५

Applicants : 1) Smt. Asha W/o. Milind Chaware Age 62, R/o, Near Kochar Banglow, Navin Khalashi Line, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. 2) Shri Sunil S/o Madhukar Ramteke, Age 58, R/o New Khalashi Line, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. 3) Smt. Usha W/o Anand Meshram Age 56, Kumbhare Colony, Qtr. No. EWS-91, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. 4) Smt. Manish W/o. Dhiraj Thule Age 50, R/o. Near Railwayy Cabin, J.N. Road, New Khalashi Line, Kamptee. 5) Himanshu S/o Arvind Ramteke Age 23, R/o, Near Kochar Banglow, New Khalashi Line, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. 6) Smt. Meena Wd/o Girish Ramteke Age 32, R/o, Near Choudhary Hospital, New Khalashi Line, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. 7) Mast. Aditya S/o Girish Ramteke Age 12. 8) Ku. Aalia D/o Girish Ramteke Age 8 years. Petitioner Nos. 7 and 8 are minors Through their na€tural guardian mother Meena Girish Ramteke.
Both Petitioner No.6 and 7 R/o Near Choudhary Hospital, New Khalashi Line, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. ..V/s.. Non Applicant : NIL

मयत : **Madhukar Pancham Ramteke** मयत दि. १८/१०/२000. व मयत **Girjabai Madhukar Ramteke** मयत दि. १८/०४/२०२२ R/o Near Kochar Banglow, Navin Khalashi Line, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.

सदरहु अर्जदारांनी सक्शेशन सर्टीफिकेट मिळण्याकरिता कलम ३७२ इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ अन्वये मयत Madhukar Pancham Ramteke मयत दि. १८/१०/२००० व मयत Girjabai Madhukar Ramteke मयत दि. १८/०४/२०२२ याचे सक्शेशन सर्टीफिकेट मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. ०६/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर पेशी तारखेवर ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला Madhukar Pancham Ramteke तसेच Girjabai Madhukar Ramteke यांचे सक्शेशन सर्टीफिकेट मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक १०/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## Change Of Name

MY OLD NAME WAS **AMITA BHARAT PATEL**. NOW MY NEW NAME IS **ANITA BHARAT PATEL.**
**ADD** : P. NO. 20, AABHA COLONY, BHARATWARA ROAD, NAGPUR - 440035

MY OLD NAME WAS **KARAN SINGH SURESH KUMAR PANGHAL / KARN SINGH.** NOW MY NEW NAME IS **KARAN SURESH SINGH PANGHAL.**
**ADD** : PLOT NO 84 KALAMNA ROAD NEAR WATER TANK OM NAGAR RANALA KAMPTEE NAGPUR 441002

MY OLD NAME WAS **JYOTI INDRAJIT BHADANG.** NOW MY NEW NAME IS **MINAKSHI INDRAJIT BHADANG .**
**ADD** : WARD NO.2, BAILWADA NAGPUR - 441111

MY OLD NAME WAS **MIRZA ZEESHAN ASHRAF.** NOW MY NEW NAME IS **ZEESHAN IMTIYAZ MIRZA.**
**ADD** : PLOT NO.35, BHILGAON ROAD BHAGYA LAXMI LAYOUT AMAN NAGAR WANJRA NAGPUR

MY OLD NAME WAS **AARTI CHANDRASHEKHAR KHADE.** NOW MY NEW NAME IS **TRUPTI CHANDRASHEKHAR KHADE .**
**ADD** : PLOT NO. 2, GALLI NO.6, RAJKAMAL CHOWK VISHWAKARMA NAGAR NAGPUR

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **N2562074.** MY OLD NAME WAS **VINEET KULKARNI.** NOW MY NEW NAME IS **VINEET PRAKASH KULKARNI.**
**ADD** : 12, SAHASTRA BUDDHE LAYOUT, BHARAT NAGAR, NAGPUR 440033

MY OLD NAME WAS **SHE SALIM SHE BASIR SAUDAGAR.** NOW MY NEW NAME IS **MAHOMMAD SALIM SHEIKH BASHIR.**
**ADD** : KAWITHA CHANDUR BAZAR AMRAVATI 444723

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **L4449643.** MY OLD NAME WAS **JYOTIBEN SACHIN DESHMUKH.** NOW MY NEW NAME IS **JYOTI SACHIN DESHMUKH.**
**ADD** : ASHIRWAD NIWAS MOTHI UMARI AKOLA 444005

MY OLD NAME WAS **SHAHNAJ.** NOW MY NEW NAME IS **SHAHANAZ PARVEEN SHEIKH GAFAR.**
**ADD** : MAIN ROAD HASANBAGH NAGPUR 444009

MY OLD NAME WAS **MOHSIN KHAN SHARIF KHAN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD MOHSIN KHAN.**
**ADD** : BEHIND SEVA SADAN BUILDING KHADAN NAGPUR 440018
PASSPORT NO. **L9315307**


RNINo-20789/71 महासागर नागपूर — मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# लज्जत कॉर्न मेथी पुलावची

झटपट रेसिपी

मित्रांनो, रात्रीच्या जेवणासाठी झटपट काहीतरी बनवायचं असेल आणि फार कष्टही घ्यायचे नसतील तर कॉर्न मेथी पुलाव हा बेस्ट ऑप्शन आहे. नेहमीच्या व्हेज पुलावला पर्याय म्हणून हा पुलाव करता येईल.

**सामग्री:** दीड कप बासमती तांदूळ, थोडी मेथीची पानं, अर्धा चमचा जीरं, दोन वेलच्या, तीन लवंग, दालचिनीचे दोन तुकडे, एक तमालपत्र, चार हिरव्या मिरच्या, दोन कांदे, दोन चमचे आलं-लसूण पेस्ट, १०० ग्रॅम उकडलेले स्वीटकॉर्न, एक चमचा लबाचा रस, चार चमचे तूप, मीठ

**कृती:** सर्वात आधी तांदूळ धुवून साधारण पंधरा मिनिटं बाजूला ठेवा. मेथीची पानं धुवून घ्या. आता कढईत तूप घाला. वितळल्यावर जीरं, लवंग, दालचिनी, तमालपत्र घाला. परतून घ्या. त्यात चिरलेला कांदा आणि दोन मिरच्या घालून परता.



कांद्याचा रंग सोनेरी झाल्यावर त्यात आलं-लसूण पेस्ट घाला. यानंतर मेथीची पानं आणि मक्याचे दाणे घालून परता. आता तांदूळ घालून परता. यानंतर त्यात प्रमाणात पाणी घाला, चवीनुसार मीठ घालून तांदूळ शिजू द्या. कढईवर ताटली ठेवा. पाच ते दहा मिनिटांनी पुलाव झालेला असेल.

# डिलिव्हरी बॉय झाला उपजिल्हाधिकारी

अचिव्हर

स्पर्धा परीक्षेतील यशासाठी प्रचंड मेहनत आणि इच्छा शक्तीची आवश्यकता असते. झारखंडमधील गिरिडीह येथील सूरज यादवने प्रचंड मेहनत आणि जबरदस्त इच्छाशक्तीच्या जोरावर यश मिळवत तरुणांसमोर नवा आदर्श ठेवला आहे. सूरज झारखंड लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. आता तो उपजिल्हाधिकारी बनला आहे. विशेष म्हणजे सूरज हा स्विगीमध्ये डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत अभ्यास करायचा. त्याने रॅपिडो बाईकदेखील चालवलेली आहे. झारखंड लोकसेवा आयोगाने काही दिवसांपूर्वी संयुक्त नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर केला. मुख्य परीक्षा २२ ते २४ जून २०२४ दरम्यान झाली होती. त्यानंतर पात्र उमेदवारांनी मुलाखत दिली होती. तब्बल दहा महिन्यांच्या विलंबानंतर आता निकाल जाहीर झाला आहे. यात सूरजने घवघवीत यश मिळवले आहे.

सूरज एका साध्या कुटुंबामध्ये जन्मला. त्याचे वडील गवंडी काम करतात. त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही. अडचणी असूनही सूरजने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले होते. तो रांचीमध्ये राहून परीक्षेची तयारी करत होता. त्याला घरून पैसेही मिळत नव्हते, त्यामुळे त्याने अभ्यासाचा खर्च भागवण्यासाठी डिलिव्हरी बॉय म्हणून काम केले.



**मित्रांनी केली मदत** सूरजकडे पुस्तकांसाठी पैसे नव्हते. त्यामुळे तो स्विगी आणि रॅपिडोमध्ये 'डिलिव्हरी बॉय' म्हणून काम करायचा. सुरुवातीला त्याच्याकडे बाईक नव्हती. त्या वेळी त्याचे मित्र राजेश नायक आणि संदीप मंडल यांनी त्याला आर्थिक मदत केली. या दोघांनी शिष्यवृत्तीच्या पैशातून सूरजला एक जुनी बाईक खरेदी करुन दिली होती. या बाईकच्या मदतीने सूरज रोज पाच तास डिलिव्हरीचे काम करायचा आणि त्यानंतर अभ्यास करायचा.

**पत्नीने दिली साथ**

सूरजच्या यशात त्याच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्याच्या पालकांनी त्याला नेहमी प्रेरित केले. बहिणीने सूरजच्या अभ्यासात अडथळा येऊ नये म्हणून सर्व कामे केली. सूरजच्या पत्नीनेही त्याला साथ दिली. कुटुंबाचा सामूहिक संघर्ष आणि सहकार्यामुळे सूरज या परीक्षेत यश मिळवू शकला आहे. सूरजने 'जेपीएससी' परीक्षेत ११० वा क्रमांक मिळवला. तो गेल्या काही वर्षांपासून परीक्षेची तयारी करत होता. हा त्याचा दुसरा प्रयत्न होता, यात घवघवीत यश मिळवल्यामुळे सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.




## शेर की जुबानी

ना जाने इतनी मोहब्बत
कहां से आई है उसके लिए।
की मेरा दिल भी
उसकी खातिर
मुझसे रूठ जाता है।

है कुबुल शिकायते
हमें आपकी सारी,
लेकिन कहना
तो थोडा
मुस्कुराकर कहना

बहुत खुबसूरत होते
हैं ऐसे रिश्ते
जिन पर कोई
हक भी ना हो
और शक भी ना हो।


# सीए व्हायचं, की सीएफए?

करीअरवेध

जागतिकीकरण आणि आर्थिक स्पर्धेच्या युगात वित्तीय क्षेत्रात करिअर करण्याची संधी तरुणांना आकर्षित करते. लेखापरीक्षण, करसल्ला, वित्तीय विश्लेषण आणि गुंतवणूक व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये दोन महत्त्वाच्या व्यावसायिक पदवी चर्चेत असतात. त्या म्हणजे चार्टर्ड अकाउंटंट (सीए) आणि चार्टर्ड फायनान्शिअल ॲनालिस्ट (सीएफए). दोन्ही पदव्यांमुळे करिअरच्या उत्तम संधी मिळतात, मात्र अभ्यासक्रम, स्वरूप आणि कार्यक्षेत्र यात दोघांमध्ये फरक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी यापैकी एक निवडताना आपल्या आवडी, कौशल्ये आणि ध्येय लक्षात घेऊन निर्णय घेणे महत्त्वाचे ठरते.

**चार्टर्ड अकाउंटंट बनण्यासाठी...**

चार्टर्ड अकाउंटंट ही भारतातील प्रतिष्ठित व्यावसायिक पदव्यांपैकी एक आहे. लेखापरीक्षण, करसल्ला, कंपनी कायदे, लेखा पद्धती आणि वित्तीय व्यवस्थापन या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम अनेक टप्प्यांतून पूर्ण करावा लागतो.




फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल या टप्प्यांबरोबरच प्रशिक्षण म्हणून ठरावीक कालावधीची आर्टिकलशिप आवश्यक असते. त्यामुळे अभ्यासक्रमाचा कालावधी तुलनेने अधिक असतो; परंतु हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी लेखापरीक्षण, करसल्ला, कंपनी वित्तीय व्यवस्थापन, बँकग आणि सल्लागार क्षेत्रात उत्तम संधी मिळवू शकतो.

**'चार्टर्ड फायनान्शिअल ॲनालिस्ट' म्हणजे काय?**

'चार्टर्ड फायनान्शिअल ॲनालिस्ट' ही अमेरिकेतील जागतिक स्तरावर मान्यता असलेली पदवी आहे. ती 'सीएफए इन्स्टिट्यूट'कडून दिली जाते. अभ्यासक्रमाचा मुख्य भर गुंतवणूक व्यवस्थापन, भांडवली बाजार, पोर्टफोलिओ विश्लेषण आणि वित्तीय धोरणांवर असतो. या पदवीसाठी तीन स्तरांच्या परीक्षा द्याव्या लागतात. पहिल्या स्तरामध्ये गुंतवणुकीसाठी आवश्यक साधने, नीतिशास्त्र आणि गणितीय पद्धतींचा अभ्यास होतो.

दुसऱ्या स्तरामध्ये मालमत्ता मूल्यांकन व वित्तीय साधनांचे विश्लेषण शिकवले जाते. तिसऱ्या स्तरामध्ये पोर्टफोलिओ व्यवस्थापन आणि संपत्ती नियोजनावर भर असतो.

हा अभ्यासक्रम कठीण आणि वेळखाऊ आहे. त्यासाठी भरपूर तयारीची गरज असते. सीएफए चार्टर मिळवला की जागतिक वित्तीय उद्योगात उमेदवाराला उच्च मान्यता प्राप्त होते. या पदवीधारकांना गुंतवणूक बँकग, इक्विटी रिसर्च, मालमत्ता व्यवस्थापन कंपन्या, हेज फंड्स आणि आंतरराष्ट्रीय सल्लागार क्षेत्रात संधी मिळतात.

**सीए आणि सीएफए यातील फरक**

सीए प्रामुख्याने लेखापरीक्षण, करसल्ला आणि लेखा प्रणालींमध्ये तज्ज्ञ असतो, तर सीएफए वित्तीय बाजार, गुंतवणूक आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापनात विशेषज्ञ असतो. सीएला भारतात उत्तम मागणी असते, तर सीएफएला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी असतात. सीएसाठी तपशीलवार काम करण्याची क्षमता, कायदेशीर बाबींचे ज्ञान आणि लेखा पद्धतींमध्ये बारकाईने लक्ष देण्याची कौशल्ये महत्त्वाची असतात. तर सीएफएसाठी विलेषणात्मक विचारसरणी, जागतिक बाजारातील चढउतारांचे आकलन आणि आर्थिक नियोजनाचे कौशल्य आवश्यक असते.

# एथनिक्सचे बदलते ट्रेंड्स

फॅशन पॅशन

दोस्तांनो, पुढचा काळ सणांचा, उत्सवांचा आणि अर्थातच उत्साहाचा. नवरात्र, दसरा, दिवाळी आणि त्यानंतर सुरू होणारी लग्नसराई म्हणजे फॅशनप्रेमींसाठी सुवर्णसंधी. या दिवसात नेहमीच्या जीन्स, टी शर्ट, शर्ट, ट्राउझर अशा कपड्यांऐवजी पारंपरिक पेहराव करता येतात. मुलांच्या एथनिक्समध्येही प्रचंड व्हरायटी बघायला मिळते. सणासुदीच्या निमित्ताने खरेदीचा विचार करत असाल तर या टिप्स तुम्हाला उपयोगी पडतील.



* मुलं फॅशनच्या बाबतीत फारसे प्रयोग करताना दिसत नाहीत. नेहमीचे रंग, टिपिकल प्रट्स यांनाच मुलं प्राधान्य देतात. पण आता जुना काळ राहिलेला नाही. त्यामुळे हटके प्रट्स आणि गडद रंगांना तुम्ही प्राधान्य देऊ शकता. गडद रंगाचा कुर्ता आणि पांढरा पायजमा कवा पारंपरिक बॉटमचा कोणताही प्रकार तुम्ही ट्राय करू शकता.
* नेहमीच्या वापरातले बूट बाजूला ठेवा. त्याऐवजी जुती, कोल्हापुरीसारख्या एथनिक पादत्राणांची निवड करा. मुलांच्या पारंपरिक पादत्राणांची मोठी व्हरायटी पहायला मिळते. त्यामुळे न घाबरता नवे प्रयोग करा.
* कुर्ता-पायजमा हा एव्हरग्रीन पेहराव असला तरी एथनिक्सच्या खरेदीसाठी बाजारात थोडं हडा. नेहरू जॅकेट, बंदगळा, जोधपुरी जॅकेट, पलाझो पँट्स अशा कपड्यांचा सध्या बराच ट्रेंड आहे. यापैकी काहीतरी नक्की ट्राय करा. स्कार्फ कवा स्टोल कॅरी करून पारंपरिक लूकला हटके ट्विस्टही देता येईल.

## ॲप वर्ल्ड



### व्हॉट्स ॲपवर आता कागदपत्रे मिळण्याची सोय

ड्रायव्हिंग लायसन्स मिळवणे असो कवा लग्नाचे प्रमाणपत्र; आता कुठेही जाण्याची गरज नाही. ही सर्व कामे व्हॉट्स अपद्वारे घरबसल्या करता येतात. दिल्ली सरकार यासाठी एका योजनेवर काम करत आहे. त्याअंतर्गत लोक घरबसल्या विवाह प्रमाणपत्र आणि सरकारी सेवांशी संबंधित सर्व कागदपत्रांसाठी अर्ज करू शकतील. या उपक्रमाचे नाव 'व्हॉट्स ॲप गव्हर्नन्स' असे ठेवण्यात आले आहे.

ही सेवा सुरू झाल्यानंतर, लोकांना सरकारी कामासाठी कोणताही त्रास सहन करावा लागणार नाही कवा लांब रांगेत थांबावे लागणार नाही. ही कागदपत्रे व्हॉट्स अपवर बनवली जातील. विवाह प्रमाणपत्र, जातीचा दाखला, जन्म प्रमाणपत्र आणि ड्रायव्हिंग लायसन्ससह अनेक सरकारी कामे 'व्हॉट्स अप गव्हर्नन्स'अंतर्गत आणली जातील. लोक या कागदपत्रांसाठी अर्ज करू शकतील, त्यांची कागदपत्रे व्हॉट्स अपद्वारे पडताळू शकतील आणि डाउनलोड करू शकतील. ही संपूर्ण प्रक्रिया जलद होईल आणि लोकांना सरकारी विभागांमध्ये धावपळ करावी लागणार नाही. यासोबतच भ्रष्टाचारालाही आळा बसण्याची अपेक्षा आहे.

**ही सेवा कशी काम करेल?**

'व्हॉट्स अप गव्हर्नन्स' प्लॅटफॉर्मवर 'एआय'संचालित चॅटबॉट असेल. ते हदी आणि इंग्रजी भाषांमध्ये काम करेल. वापरकर्त्यांना मदत करण्यासोबतच, ते संपूर्ण सेवा स्वयंचलित करेल आणि वापरकर्त्यांना सर्व विभागांशी संबंधित माहिती प्रदान करेल. सुरुवातीला या प्लॅटफॉर्मवर २५-३० सेवा एकत्रित केल्या जातील. नंतर इतर विभागदेखील त्यात सामील होतील.

## टिप्स ॲंड ट्रिक्स



### व्हॉट्स ॲपवर 'एआय' लिहील मेसेज

व्हॉट्स अपने आपल्या लाखो वापरकर्त्यांसाठी एक जबरदस्त फीचर लाँच केले आहे. त्यामुळे मेसेज लिहिणे आता आणखी सोपे आणि मजेदार होणार आहे. 'मेटा एआय रायटग हेल्प' या नव्या फीचरच्या मदतीने तुम्ही आपले मेसेज व्यावसायिक, मजेशीर कवा भावनिक शैलीत सहज लिहू शकता.

**हे फीचर काम करसं करतं?**

मेसेज टाइप करताना चॅट बॉक्समध्ये दिसणाऱ्या पेन्सिल आयकॉनवर टॅप करा. 'मेटा एआय' तुम्हाला ३-४ पर्याय सुचवेल. जे प्रोफेशनल, फनी, सपोर्टिव्ह कवा प्रूफरीड अशा विविध शैलींमध्ये असतील. तुम्हाला हवा तो पर्याय निवडा आणि पाठवा. विशेष म्हणजे व्हॉट्स अपने गोपनीयतेची पूर्ण काळजी घेतली आहे. तुमचे मेसेज संग्रहित कवा वाचले जाणार नाहीत. फक्त सूचना मिळतील.

**या फीचरचा फायदा कोणाला होईल?**

विद्यार्थ्यांना प्राध्यापकांना असाइनमेंट्स पाठवताना, व्यावसायिकांना बॉस कवा क्लायंटशी संवाद साधताना आणि मित्र-कुटुंबासोबत गप्पा मारताना हे फीचर उपयुक्त ठरेल.

## टेक्नो टॉक



### इंटरनेटशिवायही कॉल करता येणार

'गुगल'ने तंत्रज्ञानविश्वात धमाका केला आहे. नव्याने लाँच झालेल्या पिक्सेल १० सिरीजमधील एका अनोख्या फीचरने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. आता वापरकर्ते इंटरनेट कवा मोबाईल नेटवर्कशिवायही व्हॉट्स अपवर ऑडिओ आणि व्हिडीओ कॉल करू शकतील. सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध होणार असून आपत्कालीन परिस्थितीत हे फीचर वरदान ठरणार आहे.

'गुगल'ने भारतासह जागतिक बाजारपेठेत पिक्सेल १० सिरिज लाँच केली आहे. कंपनीच्या दाव्यानुसार सॅटेलाइट तंत्रज्ञानाद्वारे व्हॉट्स अप कॉलग ऑफर करणारी ही जगातील पहिली स्मार्टफोन सिरिज आहे. यामुळे नेटवर्क नसलेल्या दुर्गम भागातही संवाद साधणे शक्य होईल.

'गुगल'ने आपल्या 'एक्स' पोस्टमध्ये एक टीझर शेअर केला आहे. त्यात सॅटेलाइटद्वारे कॉलगची झलक दिसते. हे फीचर विशेषतः अशा ठिकाणी उपयुक्त ठरेल जिथे मोबाइल नेटवर्क कवा वायफाय उपलब्ध नसते.

# तो लग्नाला घाबरतोय...

मॅच मेकींग



मी २७ वर्षांची तरुणी असून पाच वर्षांपासून एका मुलासोबत रिलेशनशीपमध्ये आहे. आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. पण लग्नाचा विषय तो शिताफीने टाळतो. त्याने त्याच्या आईवडिलांना आमच्याबद्दल काहीच सांगितलेलं नाही. तिकडे माझ्या आईवडिलांनी माझ्यामागे लग्नाचा तगादा लावला आहे. त्यांनी माझ्यासाठी स्थळं शोधायला सुरुवात केली आहे. माझा पियकर त्याच्या आईवडिलांना घाबरतोय. पण गेल्या पाच वर्षांत आमचं नातं बहरलं, फुललं. आमचे स्वभावही जुळतात. मात्र मी सध्या कोंडीत सापडले आहे. मी काय करू?

उत्तर : आपलं नातं लग्नापर्यंत नेणं बरेचदा आव्हानात्मक असू शकतं. पालकांची भीती, जबाबदारीचं दडपण, लग्नाच्या कल्पनेमुळे येणारी अस्वस्थता अशी बरीच कारणं यासाठी देता येतील. आता तुझ्या पियकराच्या मनात कसली भीती आहे हे जाणून घे. तुमचं नातं पालकांसमोर उघड न करण्यामागच्या कारणांचा शोध घे. प्रियकराशी बोल. नेमकी कारणं जाणून घेतल्यानंतर काही निष्कर्ष काढ. नात्याबद्दलची त्याची मतं जाणून घे. हा गुंता सोडवण्यासाठी समुपदेशकांची मदतही घेता येईल. तू तुझ्या पालकांशी मोकळेपणाने बोल. थोडा वेळ मागून घे. सरतेशेवटी आपण कोणावरही नातं लादू शकत नाही. त्यामुळे या मुलाच्या मनातलं ओळखून मगच पुढे जा.

# तंत्र पुश अप्सचं

फिटनेस फंडा

पुश अप्स केल्यामुळे संपूर्ण शरीराला व्यायाम मिळतो. शरीराच्या वरच्या भागाच्या स्नायूंच्या बळकटीसाठी पुश अप्स खूप उपयुक्त ठरतात. पुश अप्ससाठी कोणत्याही उपकरणाची गरज नसते. त्यामुळे हा व्यायाम अगदी कुठेही करता येतो. तंदुरुस्तीसाठी कोणत्याही एका व्यायामाची निवड करायची असेल तर पुश अप्स हा सर्वोत्तम व्यायामप्रकार ठरतो. मात्र बरेच जण योग्य पद्धतीने पुश अप्स करतच नाहीत. काही जण कमी तर काही जण आवश्यकतेपेक्षा जास्त पुश अप्स करतात. उत्तम आरोग्यासाठी नेमक्या किती पुश अप्स करायला हव्यात याबाबतचं मार्गदर्शन...



पुश अप हा तुलनेने बराच कठीण व्यायामप्रकार आहे. नियमित सरावानेच तो जमू शकतो. सुरूवातीला पुश अप्स करताना त्रास होऊ शकतो. शिवाय स्थूल लोकांना पुश अप्स बऱ्याच अवघडही पडतात. पण काळजी करू नका. सुरूवातीला दोन पुश अप्स जमल्या तरी तिथून सुरूवात करा. हळूहळू संख्या वाढवा. एका दिवसात किती पुश अप्स करायच्या यावर कोणतंही बंधन नाही. काही लोक ३०० पेक्षा जास्त पुश अप्सही करतात. पण दिवसाला ५० ते १०० पुश अप्स केल्याने तुम्हाला सगळे लाभ मिळू शकतात.

२० पुश अप्सने सुरूवात करा. पण या आकड्यावर थांबू नका. पुश अप्सची संख्या वाढवत रहा.

# युवकांत जॉगर्स जीन्सची क्रेझ

स्टाईल स्टेटमेंट

फॅशन वेगाने बदलते. आजकाल जीन्स पुन्हा बदलत आहेत. आजची तरुणाई फॅशनमध्ये आरामही शोधते. यामुळेच आजकाल तरुणांमध्ये जॉगर्स जीन्स आणि ट्राउझर्सची मागणी वाढू लागली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जॉगर्स जीन्स तरुणांमध्ये मोठी लोकप्रियता मिळवत आहेत. तज्ज्ञांच्या मते जॉगर्स जीन्स तरुणांना एक नवा आणि अनोखा लूक देत असून आरामाच्या बाबतीतही खास आहेत. त्यामुळे तरुणांना हा लूक खूप आवडू लागला आहे. विशेष म्हणजे जॉगर्स जीन्स आणि ट्राउझर्स पुरुष आणि महिला दोघांनाही आकर्षित करण्यात यशस्वी ठरत आहेत.



**जॉगर्स जीन्स म्हणजे काय?**

खरं तर जॉगर्स जीन्स हे जॉगग ट्राउझर्सचे रूपांतर आहे. ते जॉगग ट्राउझर्ससारखे दिसते. तसेच, ते अरुंद तळामुळे एक खास लूक देते. अक्षय कुमार, रणवीर सग, रणबीर कपूर, आयुष्मान खुराना, सैफ अली खान आणि जॉन अब्राहमसारखे अनेक स्टारदेखील या प्रकारच्या फॅशनमध्ये दिसले आहेत. तरुणाई ते टेक्स्चर्ड टी-शर्टसह घालणे पसंत करते, तर स्लोगन टी-शर्टसह ते खूप ट्रेंडगमध्ये आहे. तज्ज्ञांच्या मते या जीन्सच्या वाढत्या क्रेझचे मुख्य कारण म्हणजे त्याचा फंकी लूक. तरुणांमध्ये वाढत्या जिमग क्रेझमुळे हा लूकही लोकप्रिय ठरत आहे. प्रत्येक लूक आणि पॅटर्नमध्ये उपलब्ध जॉगर जीन्स विशेषतः ऑथेंटिक डेनिम रंगात पसंत केली जात आहे. यासोबतच लोक त्याच्या झिरो बॉटमबद्दलही वेडे आहेत.

डेनिम फॅब्रिक्सव्यतिरिक्त कॉटन, कॉटन पॉलिस्टर, लिनेन फॅब्रिक्सच्या जॉगर पँटस ट्रेंडमध्ये आहेत. ऑथेंटिक डेनिम पँटनंतर, कॅमोफ्लॉज (मिलिटरी) जॉगर पँटदेखील लोकांना खूप आकर्षित करत आहेत.

# ही ठिकाणे पाडतील मोहात

भन्नाट भटकंती

बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर भारतात भेट देण्यासाठी अनेक ठिकाणे आहेत. काही लोकांना हिल स्टेशनवर जायला आवडते तर काहींना समुद्रकिनारी जायला आवडते.

**कॅलिम्पाँग, पश्चिम बंगाल**

हे एक असे हिल स्टेशन आहे, जिथे तुम्ही पूर्णपणे तणावमुक्त होऊ शकता. हे हिल स्टेशन पश्चिम बंगालमधील हिमालयाच्या पायथ्याशी आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिने येथे भेट देण्यासाठी सर्वोत्तम आहेत. आजूबाजूला हिरवळ आणि तेथील हिरवेगार चहाच्या बागा पाहायला मिळतील. या ठिकाणाचे सौंदर्य तुमचे मन मोहून टाकेल.

**मुन्नार, केरळ**

केरळ हे भारतातील सर्वात सुंदर राज्य आहे. मुन्नारमधील चहा आणि कॉफीच्या बागांचे सौंदर्य पाहण्यासारखे आहे. येथील शांत वातावरण तुम्हाला एका वेगळ्याच जगात घेऊन जाईल. तुम्ही मुन्नार येथील काही ठिकाणं एक्सप्लोर केल्यावर तणावमुक्त व्हाल.

**गंगटोक, सिक्कीम**

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात गंगटोकला भेट देण्याचा एक चांगला पर्याय असू शकतो. येथील निसर्गसौंदर्यात तुम्ही हरवून जाल. ईशान्येकडील या हिल स्टेशनमध्ये तुम्हाला धुक्यांनी झाकलेल्या उंच पर्वतांचे आणि हिरव्यागार निसर्गाचे विहंगम दृश्य पाहता येईल. तुम्ही जगातील तिसऱ्या क्रमांकाचा उंच पर्वत असलेल्या कांचनजंगालादेखील भेट देऊ शकता. येथील सौंदर्य पाहण्यासारखे आहे.



**चक्राता, उत्तराखंड**

उत्तराखंडमधील चक्राता हेदेखील एक अतिशय सुंदर हिल स्टेशन आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून २००० मीटर आहे. तुम्हाला येथील नैसर्गिक सौंदर्य आणि शांत वातावरण तणावमुक्त करेल. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये येथील पर्वत धुक्यांनी वेढलेले असते. त्यामुळे त्याचे सौंदर्य आणखी मनमोहक दिसते.

**ताजमहाल, आग्रा**

ताजमहाल पाहण्यासाठी कधीही जाऊ शकता; परंतु उन्हाळ्यात या ठिकाणी जाण्याचे टाळा. कारण येथील कडक उन्हामुळे तुमचा प्रवास खराब होऊ शकतो; अर्थात ऑक्टोबरमध्ये ताजमहाल एक्सप्लोर करणे उत्तम राहील. ताजमहाल व्यतिरिक्त, तुम्ही आग्रा किल्ला, मेहताब बाग, जामा मशीद आणि अकबराचा मकबरादेखील पाहू शकता.

# मुंबईनंतर दुसरी चित्रनगरी रामटेक परिसरात

## सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्याकडून जागेची पाहणी



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक / नागपूर, दि. १५ :

चित्रपट निर्मिती आणि विदर्भात रोजगाराची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रामटेक येथे उभारण्यात येणाऱ्या चित्रनगरीसाठी येत्या १५ दिवसात ६० एकर जमीन हस्तांतरित करण्याचा तसेच चित्रनगरी निर्मितीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आल्याची माहिती, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सोमवारी येथे दिली. रामटेक परिसरातील संरक्षित स्मारकासंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

रामटेक शेजारील नवरगाव येथे प्रस्तावित चित्रनगरीच्या जागेची पाहणी शेलार यांनी सोमवारी केली व त्यानंतर रामटेक येथील शासकीय विश्रामगृहात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीनंतर त्यांनी ही माहिती दिली. वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यावेळी उपस्थित होते.

ॲड. शेलार म्हणाले, स्थानिक कलाकारांना योग्य मंच उपलब्ध करून देत विदर्भात चित्रपट निर्मिती आणि या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण होण्याच्यादृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात रामटेक येथे चित्रनगरी उभारण्यात येत आहे. या कामाला गती देण्याच्या दिशेने आज महत्त्वाचे दोन निर्णय झाले असून याअंतर्गत महसूल विभागाच्या मालकीची ६० एकर जागा चित्रनगरीसाठी हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांशी चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूरचे जिल्हाधिकारी यांना जमीन हस्तांतरणासंदर्भात अर्ज करून नियोजित वेळेत ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल असे, त्यांनी सांगितले. रामटेक चित्रनगरी उभारण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याचा निर्णयही आज घेण्यात आला असून या संदर्भातही लवकरच कार्यवाही करण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

**रामटेक गड मंदिर परिसरात सोयीसुविधा करणार**

रामटेक गड मंदिर परिसरात सुविधा संदर्भात भाविकांसाठी स्वच्छतागृह, दुकाने, गाडे आदींचा समावेश असणाऱ्या अद्ययावत सोयी-सुविधा उभारण्यासंदर्भात सांस्कृतिक कार्य विभागाकडे प्राप्त प्रस्तावास येत्या १० दिवसात राज्य पुरातत्त्व विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा व त्याचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, प्राचीन गड मंदिर परिसराचे ऐतिहासिक मूल्य जपले जाणार आहे, त्यासाठी तडजोड नाही, असेही ते म्हणाले.

# नागपूरसह पूर्व विदर्भाला मुसळधार पावसाचा तडाखा



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

सोमवारी पहाटे वीजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह मुसळधार पावसाने नागपूरसह भंडारा आणि पूर्व विदर्भातील अनेक जिल्ह्यांना झोडपून काढले.

गेल्या काही दिवसांपासून पावसाचा कहर सुरूच असून, नागपूर शहर, जिल्ह्याचा अनेक भाग तसेच पूर्व आणि पश्चिम विदर्भाला मोठा तडाखा बसतो आहे. आज सोमवारी पहाटे ५ च्या सुमारास भंडारा शहर आणि जिल्ह्याच्या काही भागाच प्रचंड मेघर्जनेसह पावसाला सुरूवात झाली .जवळपास दीड तास या पावसाने अक्षरशः झोडपून काढले. परिणामी, शहराच्या सखल भागात पाणी साचले . सकाळची वेळ असल्याने रहदारी फारशी अधिक नव्हती. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम जाणवला नाही.

दुसरीकडे, नागपूर शहरात, दुपारी २ च्या सुमारास पावसाला सुरूवात झाली. जवळपास तासभर या पावसाचा तडाखा बसला. धुंवाधार पावसामुळे शहरातील अनेक अंडर पास मार्गाच्या खाली पाणी साचल्याने वाहनधारकांना मोठीच कसरत करावी लागल्याचे दिसून आले . पावसामुळे, वाहनधारक तसेच पादचारी रस्त्याच्या कडेला मिळेल तेथे आश्रय घेत होते.

नागपूरसह पूर्व विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांनाही या पावसाचा तडाखा बसला असून, फळबागा तसेच भाजिपाल्याचे नुकसान झाले आहे.

# जिल्हा परिषदेच्या शून्य आरक्षणाविरोधात याचिका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

जिल्हा परिषदेच्या शून्य आरक्षणाच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर शुक्रवारी आणि सोमवारी सुमारे दोन तास युक्तीवाद झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निकाल राखून ठेवला. त्यामुळे सर्वांची धडधड वाढली आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्याने यावर लवकर निकाल द्यावा अशी विनंती करण्यात आली आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू केली आहे.

या करिता नव्याने सर्कल रचना करण्यात आली. सोबतच चक्राकार पद्धतीने सुरू असलेल्या सर्कल आरक्षणाला स्थगिती दिली. शून्य आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला आहे. यावर राष्ट्रपाल पाटील यांच्यासह एकूण चार जणांनी आक्षेप घेत याचिका दाखल केली आहे.

चक्राकार पद्धतीने टप्प्याटप्प्याने जिल्हा परिषद सर्कल अनुसूचित जाती जमातीसाठी आरक्षित केले जात होते. मात्र मध्येच ही पद्धत थांबवण्यात आली. त्यामुळे अनेक सर्कलला आरक्षणाचा लाभ मिळाला नसल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.यावर सुनावणीत सर्कल रचनेत यंदा बरेच बदल झाले आहेत. इतकेच नाही तर सर्कलच्या संख्येमध्ये देखील बदल झाला आहे.

लोकसंख्या, गावांच्या सीमा, गावांचा शहरामध्ये झालेला समावेश आणि सर्कल संख्या यात झालेले बदल बघता नव्याने आरक्षण काढणे आवश्यक असल्याची भूमिका राज्याचे महाधिवक्ते डॉ. बिरेंद्र सराफ यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात मांडली.

या प्रकरणावर न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. पाच वर्षांनी निवडणुका होत असताना गावातील बदललेली लोकसंख्या, गावांच्या बदलेल्या सीमा लक्षात घ्याव्या लागल्या. त्यामुळे सर्कल रचना नव्याने झाली, त्यात सर्कल संख्याही बदलली, अलीकडेच वर्धा व वाशीम जिल्ह्यांमधील सर्कल रचनेला आव्हान देण्यात आले होते. मात्र, उच्चन्यायालयाने ते फेटाळले.

आता खुद्द उच्च न्यायालयानेच मंजूर केलेल्या नव्या रचनेनुसार आरक्षणसुद्धा नव्याने काढणे आवश्यक असल्याचे बिरेंद्र सराफ यांनी सांगितले. यापूर्वी उच्च न्यायालयाने ग्रामविकास विभाग तसेच निवडणूक आयोगाला नोटीस बजावल्या होत्या.

शासनातर्फे महाधिवक्ते व वरिष्ठ अधिवक्ते डॉ. बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. बुलढाणा येथील एका इच्छुक उमेदवाराने मध्यस्थी अर्ज दाखल केला. वरिष्ठ अधिवक्ते आर. एल. खापरे यांनी मध्यस्थाची तर ॲड. महेश धात्रक यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली.

# बंजारा समाजाला एसटी आरक्षण द्या



■ वृत्तसंस्था
बीड, दि. १५ :

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारावर बंजारा समाजाला एसटी अर्थात अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी केली आहे.

इतर जातींना हैदराबाद गॅझेटमधील नोंदींनुसार न्याय मिळत असेल, तर आमच्या बंजारा समाजालाही एसटीचे आरक्षण देण्याचा राज्य सरकारला विचार करावा लागेल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी वंजारा व बंजारा एकच असल्याचा दावाही केला. दरम्यान, सत्ताधारी पक्षानेच बंजारा समाजाला एसटीचे आरक्षण देण्याची मागणी केली आहे.

राज्य सरकारने नुकताच मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारावर कुणबी अर्थात ओबीसी आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. या गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे बंजारा समाजानेही आपल्याला एसटीचे आरक्षण देण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी समाजाने आज बीडमध्ये मोर्चा काढला.

यावेळी सभेत बोलताना धनंजय मुंडे यांनी इतर जातींना हैदराबाद गॅझेटनुसार न्याय मिळत असेल तर आमच्या बंजारा समाजाला सुद्धा एसटीचे आरक्षण देण्याबाबत राज्य सरकारला विचार करावा लागेल. काहीही करा, समिती स्थापन करा. समिती निर्माण करून या मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट प्रमाणे आरक्षण देण्यासाठी सरकारही प्रयत्न करेल हाही मी आपल्याला विश्वास देतो, आरक्षण देण्यास आम्ही सरकारला भाग पाडू, समाजाला न्याय देवू, असे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले.

# कच्च्या चिवड्याचा विक्रम



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

नागपूरमधील प्रसिद्ध मास्टर शेफ आणि कॅन्सर वॉरियर नीता अंजनकर यांनी नवा विक्रम केला आहे. त्यांनी ५६४ किलो कच्चा चिवडा बनवून एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये आपले नाव नोंदवले आहे.

विशेष म्हणजे या विक्रमाच्या आठवडाभर आधीच त्यांची कॅन्सरची शस्त्रक्रिया झाली होती. तरीही त्यांनी हा आव्हानात्मक विक्रम पूर्ण केला. यापूर्वी त्यांनी १००० किलो आंबील बनवून विक्रम केला होता.

वर्धा रोडवरील संचेती स्कूलच्या प्रांगणात हा चिवडा बनवण्यात आला. या चिवड्यात मुरमुरे, पोहे, शेंगदाणे, दाळ, सेव, कांदा, कोथिंबीर, हिरवी मिरची, लाल तिखट, मीठ, हळद, साखर आणि तेल यांचा वापर करण्यात आला.

स्थानिक वृत्तवाहिनी शंखनादने कॅन्सर वॉरियर्सना प्रेरणा देण्यासाठी हा उपक्रम आयोजित केला होता. नीता अंजनकर यांनी कॅन्सरशी तीन वेळा यशस्वी लढा दिला आहे. त्यांनी कॅन्सरपासून घाबरायचं नाही, कॅन्सरलाच घाबरवायचं आहे असा स्पष्ट संदेश दिला. एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नावाची नोंद झाल्यानंतर नीता अंजनकर यांनी आनंद व्यक्त केला. त्यांची ही कामगिरी संकटांना सामोरे जात जीवन जगण्याची प्रेरणा देणारी ठरली आहे.







निसर्गाने मानवाला जी शरीरसंपदा बहाल केलेली आहे,त्याबरोबरच या शरीराचे प्रकृतीच्या नियमाप्रमाणे काही नियम आहेत. या नियमांचं काटेकोर पालन केलं तर मनुष्य सुदृढ राहतो. मात्र अनेकांना प्रकृतीच्या नियमांच्या अगदी विरुद्ध वागण्याची सवय असते. उदाहरणार्थ भूक हा निसगार्चा नियम आहे परंतु त्यासाठी प्रमाणात आणि वेळेत खाणे हा साधा नियम आहे. मात्र अनेकजण वेळीअवेळी आणि घरच्या आहारापेक्षा बाहेरचे अरबट चरबट खातात त्याचे प्रमाण इतके असते कि मग पोटात गॅस जमा होणे, शौचास साफ न होणे, मूळव्याध असे आजार उद्भवतात.

खाण्यापिण्याच्या वाईट सवयीमुळे जडणारा एक सर्वसामान्य आजार म्हणजेच बद्धकोष्ठता. बद्धकोष्ठता म्हणजे नेमका कोणता आजार? त्याची लक्षण काय असतात? हा आजार उदभवण्याची कारण काय असतात?आणि या आजारावर उपचार काय आहेत?हेच जाणून घेण्यासाठी गॅस्ट्रोइन्ट्रोलॉजिस्ट डॉ. रेवण शहा यांच्याशी बातचीत.

**बद्धकोष्ठता नेमका काय आजार आहे?**

■ आपला रोजचा शरीर आणि मनाचा क्रम सुरळीत राहण्यासाठी पोट साफ होणं,भूक लागणे,पुरेशी झोप घेणे,या सर्व क्रिया अत्यंत महत्वाच्या आहेत. हा क्रम अनियमित झाला कि बद्धकोष्ठता उदभवते. बद्धकोष्ठता हा त्रास बहुतेक सर्व वयोगटातील लोकांना होतो. बद्धकोष्ठता म्हणजेच आपल्या पचनसंस्थेत बिघाड होणे. सतत खाल्याने आणि शारीरिक हालचाल न केल्याने आपल्या पोटातील आतड्यात मल साठून राहतो. हा मल कठीण झाल्याने बाहेर येत नाही. मग मोठ्या प्रमाणात गॅस चा त्रास होतो,आणि पोटदुखी देखील जाणवते,यालाच बद्धकोष्ठता म्हणतात.

**बद्धकोष्ठता होण्याची कारण काय आहेत?**

आपल्या पचनसंस्थेतील आतड्यात जो मल जमा होऊन गुद्वाराद्वारे बाहेर पडत्तो हि प्रक्रिया नैसर्गिक असते. परंतु अनेकदा हा मल आतड्यात अडकून कडक बनतो आणि बाहेर पडणे अशक्य होते त्यामुळे बद्धकोष्ठता आजार होतो.

या आजाराची कारण म्हणजे ज्या फळ आणि भाजा धान्यामध्ये फायबरचा अभाव आहे असे अन्न खाणे, खाण्यापिण्याच्या सवयी मध्ये बदल होणे, पुरेसे पाणी न पिणे, लोह पूरक औषधांचा दुष्परिणाम,आळशी जीवनशैली आणि व्याव्यामाचा अभाव, लठपणा, याबरोबरच आतड्याचा कर्करोग, क्रोहंस रोग, हाडांचे आजार यामुळे बद्धकोष्ठता उद्भवते.

**बद्धकोष्ठता आजाराची लक्षण काय?**

वारंवार पॉट फुगणे हे प्रमुख लक्षण आहे. त्याचबरोबर खाल्यानंतर शॉचास जाण्याची इच्छा होत नाही. पोटातील आतड्यात मलावरोध झाल्याने प्रचंड प्रमाणात गॅस निर्माण होतो आणि त्याची दुगंर्धी देखील खूप असते. आतड्यातील विष्ठा घट्ट आणि कडक झाल्याने कधीकधी विष्ठा बाहेर पडताना रक्तस्त्राव होतो. शौचास गेल्यानंतर खूप जोर लावून होते. खाण्याची इच्छा देखील मारते. कधीकधी मळमळ होऊन उलट्या देखील होतात.

**बद्धकोष्ठता या आजारावर उपचार काय ?**

बद्धकोष्ठता या आजरावर मात करण्यासाठी सर्वात महत्वाचं म्हणजे आपल्या रोजच्या आहारात ज्या धान्याचा, फळांचा आणि भाज्यांचा आपण वापर करतो त्यामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असेल असे पदार्थ घ्यावेत. शिवाय रोज भरपूर प्रमाणात पाणी प्यायला हवं.

आहार हा रोज वेळेवर आणि पौष्टिक असायला हवा . मद्यपान आणि धूम्रपान टाळायला हवे. ताणतणाव कमी करावा आणि जेवताना मन प्रसंन्न असावं. बद्धकोष्ठता वाढल्यानंतर शस्त्रक्रिया करण्यापेक्षा औषध, उत्तम आहार, फिजिओथेरपी आणि आयुर्वेदाचा आधार हे एक यशस्वी उपचार तंत्र आहे. औषधांमध्ये प्रो बायोटिक्स औषध दिली जातात. आयुर्वेदिक बस्ती थेरपीचा वापर केला जातो. अगदीच गरज भासली तर स्टार सर्जरीचा आधार घेतला जातो.

■ ■ ■



## केअर हॉस्पिटल्सचे टेक महिंद्राच्या भागीदारीत २४७७ पेशंट कॉल सेंटर सुरू

भारतातील आघाडीच्या आरोग्य सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या केअर हॉस्पिटल्सने जागतिक तंत्रज्ञान सेवा कंपनी टेक महिंद्रा यांच्या भागीदारीत विकसित केलेल्या त्यांच्या नवीन अत्याधुनिक २४७७ बहुभाषिक कॉल सेंटरच्या लाँचची घोषणा केली.

रुग्णांची उपलब्धता सुधारण्यासाठी, सेवा मानके मजबूत करण्यासाठी आणि व्यापक, किफायतशीर आणि सुलभ दजेर्दार आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या केअरच्या मुख्य नीतिमत्तेला पाठिंबा देण्यासाठी ही सुविधा डिझाइन केली आहे.

या लाँच कार्यक्रमाला केअर हॉस्पिटल्सचे वरिष्ठ नेतृत्व उपस्थित होते, मान्यवरांमध्ये श्री. शलभ डांग, मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी; विनोद रमण, गट मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, आयटी (क्यूसीआयएल); विजय सेठी, मुख्य आदरातिथ्य आणि रुग्ण अनुभव अधिकारी; श्री. राजीव चौरे, आणि कॉल सेंटर ऑपरेशन्स प्रमुख सुश्री सिमरन कौर सेठी. टेक महिंद्राचे प्रतिनिधी संजय घुरा, प्रादेशिक प्रकल्प प्रमुख; आणि व्यवसाय विकास आणि संक्रमण संघांचे सदस्य होते.

टेक महिंद्राशी भागीदारीमुळे प्रगत ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणाली, निर्बाध रिअल-टाइम अपॉइंटमेंट शेड्यूलिंग आणि प्रशिक्षित कॉल सेंटर व्यावसायिक येतील.

या संयोजनामुळे सर्व केअर रुग्णालयांमध्ये जलद प्रतिसाद वेळ, रुग्णांच्या विनंत्या कार्यक्षमतेने हाताळणे आणि सातत्यपूर्ण, रुग्ण-प्रथम अनुभव मिळण्याची अपेक्षा आहे. टेक महिंद्रा कॉल सेंटर सुविधा, कर्मचारी आणि प्रक्रिया व्यवस्थापित करेल, जागतिक आरोग्य सेवा मॉडेल्समधील सर्वोत्तम पद्धती अंमलात आणल्या जातील याची खात्री करेल. भविष्यातील विस्ताराला सामावून घेण्यासाठी हे केंद्र स्केलेबल सिस्टीमसह बांधले गेले आहे. यामुळे केअर हॉस्पिटल्सना काळजी आणि संवादाचे सातत्यपूर्ण मानक राखून जास्त कॉल व्हॉल्यूम हाताळता येतील. ■ ■

## जर्दाळूचे आरोग्यदाई फायदे

जर्दाळू, त्यांची मखमली त्वचा आणि गोड, किंचित तिखट चव असलेले, हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर ते पोषक तत्वांचे पॉवरहाऊस देखील आहे.चांगल्या दृष्टीला चालना देण्यापासून ते हृदयाच्या आरोग्यास समर्थन देण्यापर्यंत, जर्दाळू आपल्या आहारात एक योग्य जोड आहे. जर्दाळू विविध प्रकारचे आरोग्य फायदे देते .

जर्दाळूमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते, जे चांगली दृष्टी राखण्यासाठी आवश्यक असते. बीटा-कॅरोटीन हे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे डोळ्यांना मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करते जर्दाळूच्या बियापासून काढलेले जर्दाळू तेल बहुतेक वेळा त्याच्या हायड्रेटिंग गुणधर्मांसाठी स्किनकेअर उत्पादनांमध्ये वापरले जाते. व्हिटॅमिन ई आणि के समृद्ध, जर्दाळू कर्नल तेल त्वचेचे पोषण आणि मॉइश्चरायझेशन करण्यास मदत करते, जर्दाळूमधील आहारातील फायबर पचनास मदत करते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते. जर्दाळूचे नियमित सेवन केल्याने निरोगी पचनसंस्थेला हातभार लागतो आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल विकारांचा धोका कमी होतो.जर्दाळूमध्ये पोटॅशियम असते, एक खनिज जे शरीरातील सोडियमच्या प्रभावांना संतुलित करून रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# आमदार राजेश बकाने यांची पूरग्रस्त गावात भेट

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १५ :

गत दहा दिवसापासून जिल्ह्यास पावसाने अक्षरशः झोडपून काढणे सूरू केले असून देवळी तालुक्यास याचा सर्वाधिक फटका बसल्याचे चित्र आहे.

देवळीचे आमदार राजेश बकाने यांनी पूरग्रस्त गावात भेटी देणे सूरू केले आहे. या भेटीत शेतकऱ्यांच्या व्यथा डोळ्यात पाणी आणून सोडत असल्याचे आमदार बकाने म्हणतात. तांभा गावात भेटी देतांना आ. बकाने यांनी शेतात जाऊन पाहणी केली.

त्यावेळी उपस्थित एका वृद्ध शेतकऱ्याशी त्यांनी संवाद साधला. तेव्हा त्या शेतकऱ्याने हंबरडाच फोडला. शेतात यावेळी चांगले पिक आले होते.

दसरा दिवाळीत बऱ्यापैकी पैसे हाती पडतील. कर्ज फेडता येईल, अशी आस ठेवली होती. पण तीन दिवसातील पावसाने होत्याचे नव्हते केले. धुऱ्यापर्यंत पाणी साचले. शेतात पाय ठेवता येत नाही. पिक कुठून येणार म्हणत हा शेतकरी ओक्साबोक्सी रडला. त्याच्या पाठीवरून बकाने यांनी हात फिरवीत धीर दिला. वाऱ्यावर सोडणार नाही, अशी हमी दिली.

देवळीच नव्हे तर जिल्ह्याच्या अनेक भागातील शेतकऱ्यांची अशीच व्यथा असून, संकटात सापडलेले शेतकरी शासनाकडून मदतीची याचना करीत आहेत.

# माजी नगरसेवकाची शरणागती

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १५ :

नाशिक शहरातील नांदूर नाका येथे २२ ऑगस्ट रोजी राहुल धोत्रे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. या हल्लयानंतर २९ ऑगस्ट रोजी उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी भाजपचे माजी नगरसेवक उद्धव निमसे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता, तेव्हापासून उद्धव निमसे फरार होते.

गेले २० दिवस पोलिसांची चार पथके त्यांचा शोध घेत असतानाही ते सापडत नव्हते. मात्र, आज सोमवारी अखेर त्यांनी स्वतः आडगाव पोलिस ठाण्यात पोलिसां समोर शरणागती पत्करली. न्यायालयाचा दबाव वाढल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतल्याचे समजते.

# हलबा समाजाच्या राजाचे उत्साहपूर्ण १८ वे वर्ष



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

जुनी मंगळवारी, चुनाखाये टेकडा, नागपूर येथील मस्कऱ्या गणेश उत्सव मंडळाने २००८ साली स्थापित केलेल्या हलबा समाजाचा राजाचे यंदा १८ वे वर्ष मोठ्या हर्ष उल्हासात साजरे होत आहे. यावर्षी एका हातात कुऱ्हाड व एका हातात त्रिशूल आणि दागिन्यांनी सजवलेला मुकूट परिधान केलेल्या आठ फूट उंच मस्कऱ्या गणेशाची मूर्ती स्थापित करण्यात आली आहे.

मस्कऱ्या गणेश मूर्तीच्या स्थापनेचा इतिहास असा आहे की, नागपूरचे राजे मुधोजी भोसले यांचे वडील खंडोजी महाराज भोसले उर्फ चिमण बापू १७५५ मध्ये बंगालच्या युद्धावरून परतले तेव्हा अनंतचतुर्थ दशीच्या दिवशी पारंपारिक गणेश उत्सवाची सांगता झाली होती. त्यामुळे राजाच्या स्वागतासाठी व गणेश उत्सव परंपरा सुरू ठेवण्यासाठी मस्कऱ्या गणपतीची पितृपक्षात स्थापना करण्यात आली. तेव्हापासून मस्कऱ्या गणपतीची परंपरा नागपुरात जोपासतात. या गणपतीचे वैशिष्ट्य हे की या गणपतीचे सोंड उलटे असते.

या मस्कऱ्या गणपतीची परंपरा जोपासत मस्कऱ्या गणेश उत्सव मंडळ 'हलबा समाजाचा राजा'चे १८ वे वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करत आहे. यावर्षी ९ सप्टेंबरला सकाळी ८ वाजता गणेशाची स्थापना करण्यात आली. १८ सप्टेंबरला सायंकाळी ७ वाजता महाप्रसाद वितरण असून २० सप्टेंबरला मस्कऱ्या गणेशाचे विसर्जन होणार आहे.

रामचंद्र जनकल्याण बहुउद्देशीय संस्था यांच्या सौजन्याने आणि अध्यक्ष विवेक चांदेकर, उपाध्यक्ष स्वप्निल नंदनवार, सचिव करण चांदेकर, कोषाध्यक्ष मिथिलेश नंदनकर, महासचिव अंकित उमरेडकर, कार्याध्यक्ष मनीष चांदेकर, सल्लागार वैभव चांदेकर आणि यश बटाणी, संयोजक हार्दिक पौनीकर, नमित बटाणी यांच्या यशस्वी आयोजनात मस्कऱ्या गणेशोत्सवाची आखणी होत आहे.

या यशस्वी आयोजनात शुभम नंदनवार, अंकुश चांदेकर, कुणाल बटाणी, अक्षय निनावे, चंद्रशेखर उमरेडकर, प्रशांत पौनिकर, मुकेश चांदेकर, ऋषीत नंदनकर, विलास बेमारकर, चेतन बेमारकर, रोहित बेमारकर, प्रणित पौनिकर, अक्षय नंदनकर, आयुष चांदेकर, केतु चांदेकर, दिवेश पराते, राजा खान, विशाल उमरेडकर, आयुष पौनिकर, पंकज खडगी, निकेश ठवरे, प्रज्वल चांदेकर, शुभम चांदेकर, ओम दुध पचारे, रोशन पौनिकर, अनुप पौनिकर त्यांचे सहकार्य लाभत आहे.

# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ मंगळवार, दि. १६, सप्टेंबर २०२५ ■


## तोतया पोलिसाने डिक्कीतून रक्कम उडवली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

पोलिस असल्याची बतावणी करून ठकबाजाने एका व्यक्तीला गंडा घातला. झडतीच्या बहाण्याने डिक्कीतील २८ हजारांची रोकड लंपास केली. पीडितला पोलिस ठाण्यात पोहोचण्यास सांगून फरार झाला. ही घटना शांतीनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. तक्रार मिळताच पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून काही तासातच त्याच्या मुसक्या आवळल्या. सुधीर बाबाराव लोखंडे (५४) रा. रेणुका सरस्वती अपार्टमेंट, गांधीनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फियादी करण पांडुरंग पखाले (४९) रा. पंचवटीनगर, बिनाकी लेआऊट हे शनिवारी दुपारी दुचाकी वाहनाने लालगंजच्या झाडे चौकातून जात होते. या दरम्यान दुचाकी वाहन क्र. एमएच-४९/एव्ही-४६२२ वर असलेला आरोपी सुधीर त्यांच्याजवळ आला आणि वाहन थांबविण्यास सांगितले. करण यांनी वाहन थांबविल्याचे कारण विचारले असता सुधीरने पोलिस असल्याची बतावणी केली. त्यानंतर त्याने वाहनाची झडती घेत डिक्कीत ठेवलेली २८ हजारांची रोकड काढून घेतली. वाहनावर मोठ्या प्रमाणात दंड थकित असून तत्काळ लकडगंज पोलिस ठाण्यात पोहोचून दंड भरण्यास सांगितले. स्वतःही त्यांच्या मागे येत असल्याचे सांगितले आणि रस्त्यातूनच फरार झाला. काही वेळाने करण यांना फसवणूक झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. शांतीनगर पोलिस आणि गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी पोहोचले. जबरी चोरी आणि फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपीच्या वाहनाचा नंबर मिळाला.

# मुसळधार पावसानंतर पुन्हा वाहन कोंडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

थोडसा जरी पाऊस झाला तरी नागपुरातील भुयारी पुलाखाली पाणी साचते व वाहने खोळंबतात. सोमवारी दुपारी तर नागपुरात मुसळधार पाऊस पडला. सुमारे तासभर पडलेल्या पाण्यामुळे रस्त्यावर तर पाणी साचलेच. शिवाय बर्डी, धंतोली, नरेंद्रनगर, मनीषनगर भागातील भुयारी मार्ग पाण्याने तुडुंब भरले. त्यामुळे येथील वाहतूक खोळंबली. ऐन वर्दळीच्या वेळी तेथे लांबच लांब वाहनाच्या रांगा लागलेल्या होत्या.

सोमवारी सकाळपासूनच नागपुरात आकाशात ढगांनी गर्दी केली होती, त्यामुळे पावसाचा अंदाज होताच. दुपारी दोनचच्या सुमारास जोरदार पावसाला सुरूवात झाली. संपूर्ण शहरात पाऊस झाला. सलग तासभर पडलेल्या पावसामुळे नागपुरात दाणादाण उडाली. रस्त्यावर पाणी साचले. खोलगट भागातील चौक पाण्याने भरले. दुपारची वेळ असल्याने आणि पाऊस अधिक असल्याने जेथे जागा मिळेल तेथे नागरिक आडोसा घेऊन उभे होते.

पाऊस कमी झाल्यावर एकाच वेळी सर्वजण पुन्हा मार्गस्थ होण्यासाठी निघाले. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची एकच गर्दी वाढली. धंतोली येथील रेल्वे अंडरब्रीज खाली मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यातून वाहने काढणे धोक्याचे असल्याने पुलाच्या दोन्ही बाजूंनी वाहने खोळंबली.

त्यामुळे तेथे वाहनांची एकच गर्दी झाली. त्याचा परिणाम इतर मार्गावर झाला. नरेंद्रनगर रेल्व अंडर ब्रीजची हीच अवस्था होती. बर्डीवर मेट्रोने बांधलेल्या पुलाखाली. लोखंडी पुलाखाली, मनीषनगरमधील मेट्रोच्याच भुयारी मार्गात पाणीच पाणी साचले होते. त्यामुळे तेथून वाहने काढणे अशक्य झाले होते.

भुयारी मार्गावर साचलेले पाणी काढण्यासाठी उपाययोजनाच नाही, त्यामुळे प्रत्येक वेळी पाऊस झाला की वाहन कोंडी हे चित्र नागपुरातील आहे. सोमवारी पुन्हा त्याचा प्रत्यय आला आहे. बर्डीचे मेट्रो स्थानकलाही गळती लागल्याचे दिसून आले.



## कामठी मार्गावर साकारतेय रेल्वेची अत्याधुनिक इमारत

**मोतीबाग वर्कशॉपचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

उपराजधानीच्या नागपूर शहरात दीडशे वर्षांपूर्वी रेल्वे आली. वाफेवर चालणाऱ्या इंजिनपासून तर विजेवर चालणाऱ्या इंजिनपर्यंतचा रेल्वेचा हा प्रवास अव्याहतपणे सुरू आहे. बदलत्या काळानुसार रेल्वेने तंत्रज्ञानाची कास धरली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने रेल्वेचा चेहरामोहराच बदलला असला तरी त्या काळातील इमारतीत प्रशासकीय कामे करणे शक्य नव्हते. मोतीबाग वर्कशॉपची जीर्ण इमारत पाडून त्याच ठिकाणी अत्याधुनिक, पर्यावरणपूक आणि ऊर्जा कार्यक्षम अशा इमारतीचे बांधकाम सुरू झाले आहे. वर्षभऱ्यात ही इमारत पूर्ण होईल, शहराच्या सौंदर्यात भर घालणारी ही इमारत आधुनिक विकासाचे प्रतिक असेल.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे मोतीबाग वर्कशॉप कामठी मार्गावर आहे. याठीकाणी आधी नॅरोगेज इंजिनची देखभाल दुरूस्ती व्हायची. नॅरोगेज बंद झाल्यामुळे येथील कर्मचाऱ्यांची चिंता वाढली होती. मोतीबाग कारखाना गुंडाळला तर जाणार नाही, अशी कर्मचाऱ्यांत भीती होती. मात्र, केंद्रीयमंत्री, रेल्वे मंत्री यांच्या प्रयत्नाने या ठिकाणी ब्रॉडगेजची कामे मोठ्या प्रमाणात व्हायला लागली. कामाचा व्याप वाढत असला तरी जीर्ण इमारतीत कार्यालयीन कामे सुरू होती. मोतीबाग वर्कशॉप प्रशासनाने २०२३ मध्ये नवीन प्रशासकीय इमारतीसाठी मुख्यालयाला प्रस्ताव पाठविला. रेल्वे मंत्रालयाकडून अलिकडेच प्रस्तावाला मंजुरी मिळाली. जिर्ण इमारत पाडून त्याच ठिकाणी मार्च २०२५ पासून नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला सुरूवात झाली. ग्राउंड फ्लोअर आणि फर्स्ट फ्लोअरची इमारत आकार घेत आहे. मात्र, या इमारतीचे फाउंडेशन जी प्लस टू असा आहे. याठिकाणी अधिकाऱ्यांचे कॅबीन, मोठे कॉन्फरन्स सभागृह, वाचनालय, ग्रीन जीम, बसण्याची उत्तम व्यवस्था असेल.

या नवीन इमारतीचे डिझाईन इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल (आयजीबीसी) च्या कडक नियमांनुसार तयार केले गेले आहे. त्यामुळे ही इमारत पर्यावरणाची काळजी घेणारी आणि ऊर्जा कार्यक्षम असेल. ही इमारत शहराची ओळख ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रेल्वेत सुरू असलेले विविध प्रकल्प (बांधकाम) जलदगतीने आणि वेळेत पूर्ण व्हावेत. त्या कामाची गुणवत्ता असावी. यासाठी रेल्वेने सिव्हील इंजिनिअरींग विभागाचे एक युनिट सुरू केले आहे. या गतीशक्ती युनिटमध्ये प्रत्येक विभागातील एक तज्ज्ञ कर्मचारी आहे. त्यांच्याकडून मुख्यालयाला अहवाल पाठविला जातो आणि मुख्यालय थेट पीएमओ कार्यालयाला माहिती देते. त्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पीएमओ कार्यालयाचे रेल्वेच्या प्रकल्पावर लक्ष असते.

## जुन्या वैमनस्यातून तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

जुन्या वैमनस्यातून एका तरुणाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. ही थरारक घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. अभिषेक राजकुमार पिंपळीकर (२५) रा. सूरजनगर, भांडेवाडी असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून मृताच्या वस्तीतच राहणारा आरोपी प्रकाश संतोष गायकवाड (२३) याला अटक केली आहे.

अभिषेक हा कचरा संकलन करणाऱ्या वाहनावर चालक होता. प्रकाश हा कचऱ्यातून प्लॅस्टिक आणि भंगार गोळा करून विकतो. यातून मिळालेल्या पैशांवर त्याचा उदरनिर्वाह चालतो. पूर्वी अभिषेक आणि प्रकाश सोबत मिळून हे काम करीत होते. या दरम्यान पैशांवरून त्यांच्यात वाद झाला होता. तेव्हापासून त्यांच्यात वैमनस्य होते.

रविवारी अभिषेकच्या वडिलांची श्राद्ध पूजा होती. त्यामुळे दिवसभर तो घरीच होता. सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास त्याने आईला बाहेरून फिरून येतो असे सांगितले आणि घरून निघाला. काही वेळानंतर आईने फोन केला असता जवळच मित्रांसोबत गप्पागोष्टी करीत असल्याची माहिती दिली. रात्री ९.४५ वाजताच्या सुमारास घराजवळच अभिषेक आणि प्रकाश यांच्यात पुन्हा भांडण झाले. या दरम्यान प्रकाशने चाकू काढत अभिषेकवर हल्ला केला. सपासप वार करून रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. स्थानिक नागरिकांनी अभिषेकची आई मीना पिंपळीकर यांना घटनेची माहिती दिली. तत्काळ मित्र त्याला वाहनात टाकून मेडिकल रुग्णालयात घेऊन गेले.

तेथे उपचारादरम्यान अभिषेकचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वाठोडाचे ठाणेदार हरीश बोराडे आणि डीबी पथक घटनास्थळी पोहोचले. अध्यार्तासात पोलिसांनी प्रकाशला शोधून अटक केली.

**न्यायालयाने सुनावली पोलिस कोठडी**

सोमवारी दुपारी प्रकाशला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तरुण मुलगा गेल्याने मीना यांना मोठा धक्का बसला आहे. मीना लोकांच्या घरी स्वयंपाक बनविण्याचे काम करतात. पतीच्या मृत्यूनंतर अभिषेकच त्यांचा आधार होता. त्यांना प्रकाशसोबत असलेल्या त्याच्या वादाबाबत कोणतीही माहिती नव्हती.

## ३.६९ लाखांच्या दागिन्यांवर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

कुटुंब अंत्यविधीसाठी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने फ्लॅटचे कुलूप तोडले. कपाटातील ३ लाख ६९ हजार ४०१ रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरी करून पसार झाला. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी सुभाष सुरेश धारकर (४५) रा. जैन अपार्टमेंट, रेवतीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. धारकर यांच्या नातेवाईकाचे निधन झाले होते. रविवारी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास संपूर्ण धारकर कुटुंब त्यांच्या अंत्यविधीसाठी बिनासंगम येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने फ्लॅटच्या मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेले ३,६९,४०१ रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. अंत्यविधी आटोपून सायंकाळी ४ च्या सुमारास धारकर कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले.

## नवरात्र आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन: महावितरणच्या सुलभ वीज जोडणीने उत्सव करा सुरक्षित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये नवरात्रोत्सव आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन या दोन्ही उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. लाखो भाविक आणि धम्म बांधव या उत्सवांमध्ये सहभागी होतात आणि संपूर्ण वातावरण उत्साह, श्रद्धा आणि आनंदाने भारलेलं असतं. याच आनंदाला कोणतीही बाधा येऊ नये, यासाठी महावितरणने सार्वजनिक उत्सव मंडळांसाठी तात्पुरती वीज जोडणी केवळ घरगुती दरात उपलब्ध करून दिली

उत्सवातील रोषणाई, आकर्षक देखावे, मंडप, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था फक्त अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेतली पाहिजे. बेकायदेशीर आणि अनधिकृत वीज जोडण्यांमुळे शॉर्ट सर्किट किंवा इतर गंभीर अपघात होण्याचा धोका असतो. म्हणूनच, सुरक्षेशी कोणतीही तडजोड न करता अर्ज करताच मंडळांना तात्पुरती वीज जोडणी दिली जाईल. असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मंडपातील विजेचे वायरिंग अत्यंत व्यवस्थित आणि प्रमाणित असावे. मीटर केबिनमध्ये जाण्याची परवानगी केवळ अधिकृत आणि प्रशिक्षित व्यक्तीलाच द्या. वीज जोडण्यांसाठी नेहमी दर्जेदार वायर आणि स्विच वापरा. आपत्कालीन परिस्थितीत संपूर्ण मंडपाचा वीजपुरवठा एकाच स्विचने खंडित करण्याची सोय असावी. तुटलेल्या वायर जोडण्यासाठी केवळ दर्जेदार इन्सुलेशन टेपचाच वापर करा. मीटर आणि स्विच जवळचा रस्ता नेहमी मोकळा ठेवावा, जेणेकरून गरज पडल्यास त्वरित पोहोचता येईल. मंजूर झालेल्या भारापेक्षा मंडपातील विजेचा वापर जास्त होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

आणीबाणीच्या परिस्थितीत त्वरित मदतीसाठी महावितरणने 24 तास उपलब्ध असलेले टोल-फ्री क्रमांक दिले आहेत, 1912, 1800-233-3435. 1800-212-3435 किंवा 022-50897100 या क्रमांकावर मिस कॉल देऊनही संपर्क साधू शकता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक महावितरण अभियंता आणि जनमित्रांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावे, असं आवाहनही करण्यात आलं आहे. तात्पुरत्या वीज जोडणीसाठी मंडळांना त्यांच्या मंजूर वीजभाराप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास, उत्सव संपल्यानंतर वीजबिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम विनाविलंब परत केली जाईल. यामुळे रक्कम परत मिळवण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही आणि मंडळाची प्रक्रिया अधिक सुलभ होईल. महावितरणच्या या पुढाकाराने यंदाचा उत्सव सुरक्षित आणि आनंददायी करण्यासाठी सर्व मिळून सुरक्षिततेचा संकल्प करण्याचे आवाहन देखील महावितरणने केले आहे.

## मनोरंजनपर उपक्रमात बाल गणेश उत्सव मंडळाचे चौथे वर्ष

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

संगीत खुर्ची, मटका फोड स्पर्धा, लिंबू चमचा, नृत्य स्पर्धा, जागरण या खेळ व मनोरंजनपर उपक्रमांतून बालगणेश उत्सव मंडळ आपले चौथे वर्ष मोठ्या जल्लोषात साजरे करीत आहे.

अध्यक्ष कुणाल डेकाटे आणि रितिक सोरपे यांच्या मार्गदर्शनात व कार्यकारिणी सदस्यांच्या सहकार्यात 19 सप्टेंबरला भव्य महाप्रसादाचे आयोजन व 20 सप्टेंबरला विसर्जन होणार आहे.



## गाडीवरून पडल्याने वृद्धेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नातवाच्या गाडीवर बसून जात असताना खाली पडल्याने एका वृद्धेचा डोक्याला गंभीर मार लागला. ट्रॉमा सेंटरमध्ये उपचारादरम्यान चौथ्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला. पार्वता मोहन डोंगरे (७७) रा. साकोरे कॉम्प्लेक्स, रमना मारोती रोड, नंदनवन असे मृत वृद्धेचे नाव आहे. गत १० सप्टेंबरच्या रात्री ९.३० वाजताच्या सुमारास पार्वता ह्या त्यांचा नातू सिद्धार्थ डोंगरे याच्या एमएच-४९/एजी-९४३६ क्रमांकाच्या मोटारसायकलवर मागे बसून खरबी चौकातून घरी जात होत्या. डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांना उपचारार्थ मेडिकलच्या ट्रॉमा सेंटरमध्ये भरती करण्यात आले.



**नागपूर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी नागपूर येथे लक्षावधी नागरिकांना बौद्ध धर्माची दिक्षा दिली होती . ही जागा पुढे दीक्षाभूमी म्हणून प्रसिद्ध झाली. धम्मचक्रप्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमिवर दरवर्षी विजयादशमी आणि १४ ऑक्टोबर रोजी येथे लक्षावधी बौद्ध बांधव नतमस्तक होतात. हा दिवस जवळ येत असल्याने आयोजन समितीच्यावतिने येथे साफसफाई, रंगरंगोटी आणि अन्य कामास सुरूवात झाली आहे.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानचा बुधवारी शुभारंभ

## शहरातील १६ आरोग्य केंद्रांमध्ये महिला व बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. नागपूर महानगरपालिकेतर्फे देखील संपूर्ण शहरात विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महिला व बालकांसाठी तसेच मनपाच्या सफाई कर्मचारी महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ इंदौर, मध्य प्रदेश येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरातील प्रमुख ठिकाणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील राज्यस्तरीय शुभारंभ सोहळा १७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर होणार असून राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, रंगस्वर सभागृह नरिमन पॉईंट येथे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. आरोग्यमंत्री, मा. राज्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. बुधवारी १७ सप्टेंबर रोजी नागपूर महानगरपालिकेच्या नंदनवन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधून या अभियानाचा शुभारंभ होईल.

स्वस्थ नारी, सशक्त परिवार या विशेष राष्ट्रीय अभियानाची नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नागपूर शहरात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, श्रीमती वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या नेतृत्वात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये मनपाच्या १६ विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महिला व बालकांसाठी विशेष आरोग्य तपासणी आणि जनजागृती शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करणे असा आहे. या मोहिमेत देशभरातली आरोग्य केंद्राप्रमाणे मनपाच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पॉलिक्लिनिक मधील विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरे घेतली जाणार आहेत. या शिबिरांसाठी मनपाला आयएमए, भारतीय प्रसूती आणि स्त्रीरोग संस्था महासंघ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, माधव नेत्रालय यासह इतर हॉस्पिटल्स आणि वैद्यकीय संस्थांचे सहकार्य आहे. नागपूर महानगरपालिकेच्या विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये १५ दिवस मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जाणार आहेत. यामध्ये महिलांचे उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी केली जाणार आहे. जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग तपासणी, किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन केले जाणार आहे. गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी तपासणी व समुपदेशन, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन आणि बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण केले जाईल. आयुष सेवा च्या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इत्यादी पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे आयोजित केली जातील. महिला बचत गट च्या माध्यमातून खाद्यतेल आणि साखरेचा वापर कमी करण्यावर समुपदेशन व पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन देखील केले जाईल.

१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिन असून त्याअनुषंगाने राष्ट्रीय महास्वेच्छा रक्तदान या अभियानात राबविण्यात येईल. आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड, पंतप्रधान जन आरोग्य योजना अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

# भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये लवकरच भूमी ग्रीन कंपनीद्वारे पाचशे टन कचऱ्यावर प्रक्रिया

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नागपूर महानगरपालिकेद्वारा भांडेवाडी डम्पिंग यार्ड परिसरातील दहा एकर जागेवर भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीद्वारे नवीन घनकचरा कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यात येत आहे. या केंद्रासाठी देण्यात आलेल्या जागेची मनपा आयुक्त कथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी शनिवारी(ता.१३) पाहणी केली.



या प्रकल्पाद्वारे दररोज ५०० हून अधिक मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. शहरात दररोज १३०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. यापैकी सध्या सुसबिडीच्या मध्यातून ८०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असून, भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीद्वारे ५०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. परिणामी भांडेवाडी परिसरात दिसणारे कचऱ्याचे ढिगारे कमी होऊन जागा मोकळी होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीला येत्या पाच वर्षांत करारबद्ध करण्यात आले असून, याद्वारे प्रक्रिया केल्या जाणाऱ्या कचऱ्यातून सेंद्रिय खत निर्मिती व आरडीएफ तयार केले जाणार आहे.

पाहणी दरम्यान मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसूमना पंत,सहाय्यक आयुक्त विकास रायबोले, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ.गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे, कार्यकारी अभियंतानरेश सिंघमझोडे, सल्लागार जगताप यांच्यासह सस्टेनेबल बिझनेस डेव्हलपमेंट कंपनीच्या प्रकल्पाचे प्रतिनिधी, भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीचे प्रतिनिधी, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे रोहिदास राठोड, उपद्रप शोध पथकाचे जवान यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पुणे येथील भूमी ग्रीन प्रा.लि. कंपनीच्या माध्यमातून डम्पिंग यार्ड परिसरातील पाचशे टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. येत्या डिसेंबर महिन्यापासून प्रक्रिया केंद्रात पूर्ण क्षमतेने कार्य सुरू केली जाणार आहे. त्यामुळे सुसबिडी आणि भूमी ग्रीन प्रा.लि. द्वारे जवळपास तेराशे टन कचऱ्यावर दररोज प्रक्रिया केली जाणार आहे. आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सर्वप्रथम एकीकृत शहरी घनकचरा प्रकल्प (सुसबिडी ) येथील प्रकल्पाला भेट देत माहिती जाणून घेतली.

विशेष म्हणजे, या ठिकाणी दररोज ८०० टन कचरा संकलित केला जातो. त्यांनी प्रकल्पातील कचऱ्याचे ढिगारे लवकरात लवकर कमी करून, कचऱ्यावर करण्यात येणाऱ्या प्रक्रियेची गती वाढविण्याचे निर्देश दिले. भांडेवाडी डम्पिंग यार्ड परिसरातील जागेवर मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना महावितरणचे अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

कष्ट करा, फळ मिळवा या मंत्राचा उच्चार करत आपल्या अभियांत्रिकी प्रतिभेने देशाला विकासाच्या मार्गावर नेणारे महान कर्मयोगी, भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना त्यांच्या 165 व्या जयंतीनिमित्त महावितरणने त्यांना विनम्र अभिवादन केले.

महावितरणच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन या मुख्यालयात आयोजित या कार्यक्रमात, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी, कार्यकारी अभियंता विजय तिवारी, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, प्रणाली विश्लेषक प्रवीण काटोले, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश बिटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक सुशील विखार यांच्यासह संघटना प्रतिनिधी, अधिकारी, अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी सर विश्वेश्वरय्या यांना अभिवादन केले.

## १२ तासांचा पाणीपुरवठा बंद राहणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नागपूर महानगरपालिकेने किल्ला फीडरवरील १२ तासांचा पाणीपुरवठा बंद करण्याची योजना आखली ही बंदी १५ सप्टेंबर २०२५ रोजी सायं. ४ ते १६ सप्टेंबर रोजी सकाळी ४ पर्यंत राहणार आहे. या कालावधीत मेयो हॉस्पिटलसमोरील किल्ला महाल फीडर आणि नवीन अमृत फीडर यामधील इंटरकनेक्शन कामे करण्यात येणार आहेत.

पाणीपुरवठा प्रभावित होणार असलेल्या परिसरात प्रामुख्याने बोरियापुरा, खदान ईएसआर सीए, रेड स्टोन्स, चुना मशीद, शारदा मंदिर, कोसारकर मोहल्ला, नंद बाजी डोब, चापरे मोहल्ला, खरबिकर मोहल्ला, देवघर मोहल्ला, बाजीराव गल्ली, गोलिबार चौक, हेडाऊ मोहल्ला, कुरडकर मोहल्ला, तर किल्ला महाल सीए परिसरातील बापू महाजन गल्ली, गजानन महाराज गेट, झेंडा चौक, मातृसेवा सम्म, किल्ला गेट सम्म, गायत्री कॉम्प्लेक्स, कल्याणेश्वर मंदिर, उपाध्ये गल्ली, तुळशीबाग रोड, भोसला कॉलनी, अळीखांब, नगर, शिवाजी नगर, नंदाजी नगर, नवाबपुरा, संघ बिल्डिंग (पी), कोठी रोड, दसरा रोड, राहटेकर वाडी, गायत्री कॉन्व्हेंटचा समावेश आहे. याशिवाय वरील भागातील नागरिकांनी आवश्यकतेनुसार आधीच पुरेसे पाणी साठवून ठेवावे आणि जलपुरवठा बंद असताना ते सुज्ञपणे वापरावे.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

महाबोधी महाविहार, बोधगया मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ आणि महान धम्मप्रचारक अनागरिक धम्मपाल यांच्या जयंतीनिमित्त संविधान चौक, नागपूर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया बुध्दिस्ट फोरम, समता सैनिक दल, दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, महिला सशक्तीकरण संघ, राष्ट्रीय बौद्ध महासभा तसेच देशभरातील विविध बौद्ध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या आंदोलनामागील मुख्य मागण्या:बौद्ध गया टेंपल ॲक्ट 1949 ला रद्द करण्यात यावे.महाबोधी महाविहाराचे संपूर्ण नियंत्रण व व्यवस्थापन बौद्धांच्या हाती सोपवावे.या ऐतिहासिक आंदोलनाचे नेतृत्व भंते प्रज्ञाशील करत असून, त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून महाबोधी महाविहार मुक्तीसाठी अहिंसक संघर्ष केला आहे. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून आ. कमलताई गवई (अमरावती) उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमास भदन्त सुरेई ससाई, मान. डॉ. आकाश लामा, भदन्त डॉ. चंद्र कित्ती, डॉ. चंद्रबोधी पाटील, मान. भिमराव आंबेडकर, भदन्त करुणाकर, भदन्त सुमितपाल, श्रामनेर विनाचार्य व सुनिल सारीपुत्त यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. भदन्त धम्मशिखर, प्रकाश दार्शनिक, शंकर डेंगरे, भदन्त धम्मतप, भदन्त प्रियदर्शी, भदन्त नागदिपंकर, भदन्त श्रध्दमित्र यांचा समावेश आहे.

भदन्त शीलवंस, भंते प्रज्ञाशील, भदन्त ज्ञानबोधी, गणवीर वानखेडे, ए. के. जिभकाटे, पदमाकर गणवीर, भिक्षु नागधम्मरक्खि, अशोक जांभुळकर, निर्भय बागडे, उषा बौद्ध, सरोज राजवर्धन, डॉ. सरोज आगलावे, पुष्पा बौद्ध, तक्षशिला वाघधरे, छाया खोब्रागडे, सुनिता मेश्राम इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रम १७ सप्टेंबर २०२५ रोजी, दुपारी २ वाजता, संविधान चौक, नागपूर येथे होणार आहे. सर्व बौद्ध भिक्षु व अनुयायांना या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे, जेणेकरून महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन अधिक व्यापक व प्रभावीपणे पुढे नेले जाऊ शकेल.

# उमियाशंकर शाळेत कार्टून नेटवर्क तर्फे गेम सेमिनारचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

भारतातील लोकप्रिय कार्टून चॅनलपैकी एक असलेल्या "कार्टून नेटवर्क" टीमने क्वेटा कॉलनी, लकडगंज येथील उमियाशंकर नारायणजी हायस्कूलमध्ये गेम सेमिनार आयोजित केला. या सेमिनारमध्ये तीन फेऱ्यांमध्ये गेम आयोजित केले गेले. कार्टून नेटवर्क चॅनेल मालिकेशी संबंधित प्रश्न विचारले गेले. गेमच्या विजेत्यांना कार्टून नेटवर्क बॅज, स्टिकर्स, डेटॉल हँड वॉश, पॉपकॉर्न आणि चॉकलेट बक्षीस म्हणून देण्यात आले. शाळेतील मुलांना हा कार्यक्रम खूप आवडला.

## 'ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त' विविध कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नागपूर जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय व सनियंत्रण समितीद्वारा नागपूर महानगरपालिका आणि मनपा ज्येष्ठ नागरिक कक्ष संयुक्त विद्यमाने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या अनुषंगाने 1 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 2 वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात दोन अंकी नाटकाची मेजवानी आयोजित करण्यात आली आहे.

"जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधुन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात ज्येष्ठ नागरिक व कुटुंबातील सदस्यांकरिता विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. कविवर्य सुरेश भट सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात स्विप अंतर्गत जनजागृतीसाठी कार्य केलेल्या ज्येष्ठांचा सन्मान, डॉ. रमेश थोरात यांची "शेतकरी आत्महत्या रोखण्यावर" आव्हानात्मक एकपात्री प्रयोग, संजय भाकरे फाऊंडेशनद्वारे निर्मित ज्येष्ठांच्या जीवनावर भाष्य करणारी व वेदना अधोरेखित करणारी दोन अंकी कलाकृती "बाकी शून्य" सादर करण्यात येणार येणार आहे. या सर्व कलाकृतीचा लाभ घेण्याचे आवाहन हुकूमचंद मिश्रीकोटकर, फेस्कॉम चे अध्यक्ष सुधीर भगत, सचिव डॉ. शेंडेकर, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठाणचे सचिव डॉ. राजू मिश्रा, ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ चे अध्यक्ष प्रा. प्रभुजी देशपांडे, सचिव ॲड.अविनाश तेलंग, सिनीयर सिटीजन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्टचे अध्यक्ष मनोहरराव खर्चे, डॉ. तांबुलकर, वसंत पाटील, मनोहर तुपकरी, वासुदेव वाकोडीकर, प्रमिला राऊत, गीता महाकाळकर, आणि सचिव व मनपा ज्येष्ठ नागरिक कक्षाचे समन्वयक यांनी केले आहे.

# आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

तहसील पोलिस ठाण्यात दाखल खंडणीप्रकरणी आरोपी विनायक उर्फ तुषार इस्कापे याला नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने काही अटींसह अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. जिल्हा न्यायाधीश-९ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. पी. गोंधळेकर हा निर्णय दिला. व्यवसायिक मेहुल उर्फ अडवाणी यांचे अडवाणी नावाने हॉटेल गांधीपुतळा चौकात आहे. 16 जुलै 2025 रोजी रात्री 10.30 वाजता चार युवक कारमधून हॉटेलवर आले. त्यातील आरोपी गोट्या मोहिते याने व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी 30 लाख रुपयांची खंडणी मागितली, खंडणी न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतरही त्याने वारंवार फोन करून खंडणी मागितली. या प्रकरणी 23 जुलै 2025 रोजी मेहुलने तक्रार तहसील पोलिस ठाण्यात दिली होती.

या प्रकरणात पोलिसांनी रोशन मोहितेला अटक केली होती. चौकशीत त्याच्यासोबत विनायक इस्कापे, पप्पा बैरीकर आणि श्रेयस उर्फ शेऱ्या मेश्राम यांची नावे समोर आली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमधून हे सर्व आरोपी ढाब्यावर आल्याचे आणि शिवीगाळ करत धमक्या दिल्याचे नमूद केले. न्यायालयात ॲड.पवन ढेंगे यांनी आरोपी विनायक इस्कापे याची बाजू मांडली.

## घरफोडी करणाऱ्या कुख्यात टोळीला अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

शहरातील विविध परिसरातील पाच घरांमध्ये चोरी करणाऱ्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींमध्ये एका अल्पवयीन आरोपीचादेखील समावेश आहे. चोरट्यांकडून पोलिसांनी साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली.

नितीन रविंद्र रामटेके (30, चिमुरकर ले आऊट, न्यू नरसाळा) हे मध्यप्रदेशातील सागर येथे नोकरीनिमित्त राहतात. त्यांचा भाचा दीपक गेडाम हा कधीकधी येऊन घराकडे लक्ष ठेवत होता. 17 जून रोजी त्याला घराचे कुलूप तुटलेले दिसले. घरातून अज्ञात चोरट्यांनी 3.82 लाखांचा मुद्देमाल लंपास केला होता. रामटेके यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हुडकेश्वर पोलिस ठाण्याच्या पथकातून तांत्रिक तपास सुरू होता.

# श्री बिंझाणी सिटी कॉलेजच्या अंतरंग वार्षिकांकाचे प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नागपूर शिक्षण मंडळाच्या श्री बिंझाणी सिटी कॉलेज(स्वायत्त) तर्फे स्वर्णिम भारत मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित 'अंतरंग २०२४-२५' या वार्षिकांकाचे प्रकाशन पत्रकार मंजुषा जोशी व माध्यमतज्ज्ञ सोनाली नक्षीणे यांच्या हस्ते करण्यात आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुजीत मेत्रे होते तर उपप्राचार्य डॉ.संदीप तुंडुरवार व डॉ. प्रांजली काणे, वार्षिकांकाचे संपादक-समन्वयक डॉ.राजेंद्र नाईकवाडे यांची मंचावर उपस्थित होती. सोनाली नक्षिणे यांनी विद्यार्थ्यांना विधायक आणि समाजाभिमुख साहित्य निर्माण करण्याचे आवाहन केले.मंजुषा जोशी यांनी संपादकीय टीमचे अभिनंदन केले व पत्रकारितेतील स्वतःच्या प्रवासाबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अध्यक्षीय भाषणातून



प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचे, भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचे, कृतज्ञता जोपासण्याचे तसेच मोबाईलचा वापर मर्यादित ठेवून डिजिटल डिटॉक्सचा प्रयत्न करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक विद्यार्थी संपादक मंडळाचा सदस्य साजन शेंडे याने केले तर अतिथींचा परिचय डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी करून दिला.डॉ.अनिल शेंडे यांनी संपादकीय भूमिका मांडली. आस्था सोनटक्के हिने आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन राधिका तिवारी हिने केले.

आभार प्रदर्शन रुचिका चांभारे हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.सुधा जांगीड व डॉ.पल्लवी राजनकर यांचे सहकार्य लाभले. नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मोहित शाह, उपाध्यक्ष विकास बिंझाणी व सचिव राजीव देव यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# १५९ भूखंडधारकांचीही केली फसवणूक
# दिलीप ग्वालबंशीला अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

कोट्यवधी रुपयांची जमीन अत्यंत कमी किमतीत हडप करण्याच्या प्रकरणात अडकलेल्या भूमाफिया दिलीप ग्वालबंशीने केवळ एका जमीन मालकाचीच नाही तर १५९ भूखंडधारकांचीही फसवणूक केली आहे. या प्रकरणात नासुप्र अधिकाऱ्यांचीही चौकशी करावी अशी मागणी या प्रकरणातील तक्रारदार प्रमिला किशोर गायकवाड यांनी केली आहे. गुरूवारी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने दिलीप ग्वालबंशी याला अटक केली आहे, परंतु इतर आरोपी पोलिसांच्या अटके बाहेर आहेत.

प्रमिला यांनी सांगितले की, फक्त २० रुपयांच्या बनावट स्टॅम्प पेपरवर पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी बनवण्यात आली होती. हा कागदही नोंदविलेला नव्हता. या आधारावर, नेताजी हाऊसिंग सोसायटीचे अधिकारी दिनेश दुबे यांना जमीन विकण्यात आली. संपूर्ण कागदपत्रे बनावट असूनही, एनआयटी अधिकाऱ्यांनी चौकशी केली नाही आणि जमिनीवरील लेआउट मंजूर केला.

ग्वालबंशी आणि त्याच्या साथीदारांनी मिळून लोकांना भूखंड विकण्यास सुरुवात केली. २०१८ पासून आतापर्यंत १५९ लोकांना भूखंड विकले गेले आहेत. केवळ प्रमिलाच्या कुटुंबाचीच फसवणूक झालेले नाहीतर एक-एक पैसा जोडून ग्वालबंशी टोळीकडून भूखंड खरेदी करणाऱ्या सामान्य नागरिकांचीही फसवणूक झाली आहे. एसआयटी स्थापन करण्यासोबतच, भूखंड प्रकरणांत तज्ज्ञांचीही चौकशीत मदत घेतली पाहिजे.

कारण ग्वालबंशी जमीन हडप करण्यात तज्ज्ञ आहे. आरोपींनी स्थापन केलेल्या नेताजी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीसह आतापर्यंत केलेल्या भूखंडांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित व्यवहारांचीही चौकशी झाली पाहिजे. कारण दोन्ही संस्थांची नोंदणी एका वर्षाच्या आत झाली आहे आणि दोघांचेही आकडेही सारखेच आहेत. या प्रकरणाच्या तळाशी गेल्यास आणखी भूमाफिया समोर येतील. नेताजी गृहनिर्माण संस्थेच्या अधिकाऱ्यांविरुद्धही अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर राजकीय दबावामुळे तपास पुढे सरकत नाही आणि आरोपींना न्यायालयात जाण्याची संधी मिळते.

# दीक्षाभूमीवरील कार्यक्रमासाठी शासन प्रशासनाने विनाविलंब पुढाकार घ्यावा : बसपा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

2 ऑक्टोंबर रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी देश विदेशातून येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी सुविधा, सुव्यवस्था आणि सुरक्षितते संदर्भात तत्काळ कार्यवाही सुरू करावी या मागणीसाठी बसपाच्या शिष्टमंडळाने नागपूर जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना व संबंधितांना एक निवेदन दिले. शिष्टमंडळात प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, नागपुर जिला प्रभारी राजकुमार बोरकर, जिला महासचिव चंद्रशेखर कांबले, रोहित ईलपाची, पश्चिम नागपुर विधानसभा अध्यक्ष अंकित थूल, उत्तर नागपूरचे राजेश नंदेश्वर, अविनाश गेडाम, हिंगणा चे स्वप्निल ढवळे उपस्थित होते.

धम्मचक्र प्रवर्तन दिन निमित्ताने नागपुर च्या दीक्षाभूमीवर दरवर्षी देशाच्या कानाकोपऱ्यातून व विदेशातून सुद्धा लाखो अनुयायी येतात. दीक्षाभूमीवर होणाऱ्या ह्या वैचारिक व सांस्कृतिक महोत्सवाला दरवर्षी मनपा प्रशासन एक हजार तात्पुरते शौचालय व स्नानगृहे उभारते. ही सुविधा दरवर्षी कमीच पडते. तरीही ह्यावेळी या संख्येत भर न घालता, उलट घट होण्याची चिन्हे



दिसत आहेत. कारण जेल परिसरात शौचालय असतांना जेल प्रशासनाने जाणीवपूर्वक पक्की कंपाऊंड वॉल उभारली असून अनुयायांची शौचाबाबतची गैरसोय निर्माण केली आहे.

त्याच धर्तीवर आयटीआय परिसरात देखील तात्पुरत्या शौचालयाच्या त्याच जागेवर सुरु असलेल्या बांधकामांमुळे अनुयायांची गैरसोय होणार आहे. याकडे बसपा नेत्यांनी शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले.

दिक्षाभूमी परिसरात गर्दीमुळे आधीच जागा कमी पडते. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपातील शौचालये व स्नानगृहांची संख्या ह्यावेळी किमान दीड हजार (1,500) इतकी असणे अत्यावश्यक आहे. मात्र, त्यासाठी पर्यायी जागांच्या पूर्वतयारी बाबत प्रशासनाने आत्तापर्यंत कोणतीही सूचना किंवा निर्देश जाहीर केलेले नाहीत. सदर विषयावर शासन, प्रशासन, स्मारक समितीद्वारे आतापर्यंत काहीही निश्चित ठरवण्यात आलेले नाही.

# आ. समीर मेघे यांच्या हस्ते तालुक्यात विविध विकास कामांचे भुमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १५ :

हिंगणा मतदार संघातील मोहगाव (झिल्पी), डिगडोह (पांडे), उमरी (वाघ), सुकळी (कलार), माथनी, कन्होलीबारा, खडकी, भिमनगर, गोंडवाना येथे विवीध विकास कामांचे भुमिपूजन व लोकार्पण कार्यक्रम आमदार समीर मेघे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी मोहगाव येथे नविन तलाठी कार्यालय बांधकामाचे लोकार्पण ही करण्यात आले. तसेच मोहगांव (झील्पी) गावातील साहिल रमेश जाधव कंपनी सेक्रेटरी (उ.र) व सूरज अंकुश कोल्हे रेल्वे प्रशासन हे दोघेही केंद्रीय शासकीय सेवेत रुजू झाल्याबद्दल त्यांचा व त्यांच्या




कुटुंबियांचा सन्मान करण्यात आला आनी त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसिलदार सचिन कुमावत, उज्वला बापू बोढारे, आतिश उमरे, नरेंद्र वाघ, हरिश्चन्द्र अवचट, विकास दाभेकर, विशाल भोसले, गजेंद्र खोबे, प्रविण खाडे, रमेश ढोक, नाना शिंगारे, दिलीप काळबांडे, सरपंच प्रमोद डाखळे, पल्लवी कुकडकर, अशोकराव सोमणकर, उपसरपंच निशांत बोटरे, सरपंच मीनाक्षी भलावी, उपसरपंच हन्सराज राठोड, सरपंच निकीता बागडे, उपसरपंच विलास वाघ, सरपंच सिताराम उईके, सरपंच सौ सविताताई करनाके, माजी सरपंच श्रावण जुनघरे, रमेश ठवळे, प्रभाकर कडू, अजय घवघवे, पंकज गजबे, मयुर वाघ, मयुर हागवने, छत्रपाल राऊत, भक्तराज भोयर, संजय बाजनघाटे, रवी खंडाते, रामाजी मारबते,अरुण गव्हाळे, उमेश कावळे, शरद परतेकी, पंकज लोखंडे, मोहन कावळे, राजू ठेलकर, उमेश कुकडकर,अरुण कोहळे, रमेश झाडे, राहुल आदमने, रविंद्र काटवे, बबलू वानखेडे, अरुण कुनघाटकर, तुषार लोखंडे, सतिश खैरकार, आदी प्रमुख व ग्रा पं सदस्य तसेच गावातील नागरीक कार्यक्रमाला उपस्थित होते.

## डॉ. पुसदकर यांच्या संशोधन साहित्याला भारत सरकारकडून कॉपीराइट मान्यता

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १५ :

दत्ता मेघे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, वानाडोंगरी येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष पुसदकर यांच्या संशोधन साहित्याला भारत सरकारकडून कॉपीराइट मान्यता देण्यात आली आहे. डॉ. पुसदकर यांनी आयुर्वेद शास्त्र संशोधन क्षेत्राशी संबंधित सहा वेगवेगळ्या विषयांवर सखोल अभ्यास करून साहित्य निर्मिती केली असून, त्या विषयांना भारत सरकारच्या कॉपीराइट विभागाकडून अधिकृत कॉपीराइट प्राप्त झाला आहे. डॉ. पुसदकर यांचे यापूर्वीही विविध लेख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांमध्ये संशोधन प्रबंध



प्रकाशित झाले आहेत. तसेच ते विश्वकुंभ आयुर्वेद चिकित्सालय यांच्या उपक्रमातही सक्रिय योगदान देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत विदर्भ रणजी ट्रॉफी क्रिकेटपटू आयपीएलमधील मुंबई इंडियन्स संघाचा खेळाडू अक्षय वखरे यांनी डॉ. पुसदकर यांचे अभिनंदन केले.

## १.४८ लाखाच्या मालावर डल्ला

**नागपूर :** कुटुंब शहराबाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड आणि दागिन्यांसह एकूण १ लाख ४८ हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी शशांक शैलेंद्रसिंग चव्हाण (३२) रा. काशीनगर, शताब्दी चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत ६ सप्टेंबर रोजी शशांक घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. बेडरूमच्या कपाटातून रोख २० हजार आणि ३२ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण १,४८,००० रुपयांचा माल चोरी करून पसार झाला.

# लोक न्यायालय हे न्याय पदरात पाडून घेण्याचे व्यासपीठ : न्यायाधीश कुरैशी

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १५ :



कोणतेही कार्य हे अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करतात त्यांनाच यश प्राप्त होते. अगदी हाच मंत्र प्रलंबित खटल्यांचा संदर्भात लागू केला तर नक्कीच तोडगा निघू शकतो, असा विचार सर्वोच्च न्यायालयाने केला आणि लोकन्यायालयाच्या माध्यमाने तोडगा काढण्यावर भर दिला. याचा सकारात्मक परिणाम काटोल येथे शनिवार 13 सप्टेंबर, 2025 रोजी पार पडलेल्या काटोल वरिष्ठ स्तर लोक न्यायालयाच्या वेळी समोर आला. अवघ्या आठ तासात 645 प्रकरणाचा झटपट निपटारा झाला.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई, नागपूर यांच्या नेतृत्वात विधी सेवा समिती काटोल तालुका आणि वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायाधीश एम.झेड.ए.ए. क्यू. कुरैशी यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनाखाली पार पडले. सह दिवाणी न्यायाधीश विक्रम ए जाधव, सह दिवाणी न्यायाधीश स्नेहा राजेंद्र जाधव, काटोल तालुका वकील संघ अध्यक्ष एडवोकेट दीपक केणे, एडवोकेट आनंद देशमुख, एडवोकेट उपेंद्र खंते, एडवोकेट सुजित लाडसे, एडवोकेट रुणुजा गायकवाड, एडवोकेट वंदना चौधरी, हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी प्रलंबित 47 व वाद पूर्व प्रकरणे 598 एकूण 645 प्रकरणाचा निपटारा करण्यात आला. निपटारा झाल्यानंतर एकूण 55 लक्ष, 87 हजार ,373 रुपयांची वसुली झाली. एवढा पैसा शासकीय तिजोरीत जमा करून या प्रकरणातील सर्वांनीच सर्वोच्च न्यायालयाने दिलेला मार्ग अनुसरला. परिणामी पुढील काळात त्यांना आता कोर्टात न येता, आपल्या व्यवसायावर कामावर अधिक लक्ष देता येईल. अशाही प्रकारचा लाभ दोन्ही पक्षातील लोकांना होईल आणि वादच संपुष्टात आल्याने अर्जदार आणि गैरहर्जदारांमधील संबंधही सुधारतील. एडवोकेट संजय देशमुख, एडवोकेट निलेश बेलसरे, एडवोकेट मंगेश पवार, एडवोकेट प्रवीण लव्हाळे, एडवोकेट मुकुंद दुधकवडे, एडवोकेट संजय धवड, एडवोकेट रीना राऊत, एडवोकेट रितेश बनसोड, एडवोकेट मोहन जोशी, नाझर राजेश दंडारे, आशिष गावंडे, रमेश येवले, उन्नती शेळके, प्रमोद गायकवाड , धीरज महाजन, प्रिती .एल. चव्हाण, श्रीहर्ष फुलझेले, रविंद्र विंदाने, सचिन पाणबुडे, अनिरुद्ध देशमुख, लीलाधर इंगोले, काटोल दिवाणी वरिष्ठ स्तर न्यायालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी यशस्वी करिता सहकार्य केले.

# तालुक्यात मसकऱ्या गणपतीची धूम
## शहरात १३ तर तालुक्यात ३३ ठिकाणी स्थापना

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १५ :



धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल. गणेश चतुर्थीला घरोघरी व सार्वजनिक मंडळातून स्थापन केलेल्या लाडक्या गणरायाला 6 सप्टेंबर अनंत चतुर्थीला निरोप देण्यात आला. तर पुन्हा आता 10 सप्टेंबर संकष्ट चतुर्थीला कळमेश्वर शहरासह तालुक्यात 46 ठिकाणी. मसकऱ्या गणपतीची स्थापना करण्यात आली आहे. कळमेश्वर तालुक्यात गणेश चतुर्थीला स्थापन होणाऱ्या गणपती पेक्षा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून दहा दिवसाचा मस्कऱ्या गणपती उत्सव विविध धार्मिक सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाने मोठा उत्साहात साजरा करण्यात येतो यावर्षी कळमेश्वर कळमेश्वर शहरासह तालुक्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने. 46 ठिकाणी मसकऱ्या गणपतीची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये कळमेश्वर शहरात 13 ठिकाणी तर तालुक्यात 33 ठिकाणी गणपतीची स्थापना करण्यात आली आहे.

त्यामध्ये गोंडखैरी, खडगाव, कळंबी, खापरी, सेलू उपरवाही खैरी हरजी लिंगा. लाडई, सोनेगाव निंबोळी, सावळी उबाळी वाढोणा खुर्द मोहपा तेलगाव. येरला पारडी घटाटे खंडाळा गोवरी. वलनी चिचोली आष्टी कला व अन्य गावाचा समावेश आहे. गणेश उत्सवा दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज काळबांडे यांनी दिलेल्या सूचनेत डीजे व लेझर लाईट चा वापर करण्यात सक्त मनाई करण्यात आली आहे .

यंदाच्या गणेशोत्सवात पारंपारिक वाद्याच्या गजरात बाप्पाचे स्वागत विसर्जन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गणेश मंडळाची सुरक्षा जबाबदारी मंडळावर राहील प्रत्येक मंडळांनी दिवसा व रात्री किमान पाच कार्यकर्ते सुरक्षा साठी नेमावेत. मंडपाजवळ कोणीही दारू पिऊ नये अथवा जुगार खेळू नये सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत लाऊड स्पीकर बंद ठेवावा. लाऊड स्पीकरवर भक्ती गीते लावावी आक्षेपार्य देखावे तयार करू नये वाहतुकीस अडथळा निर्माण होईल यासाठी रस्त्यावर पेंडल टाकू नये सुरक्षा कार्यकर्त्यांनी नावे व स्वाक्षऱ्या असलेले विजिटर्स बुक दररोज तयार करणे आवश्यक आहे. रात्री 10 नंतर कोणतेही साऊंड सिस्टम सुरू ठेवता येणार नाही गणेश मंडळांनी नियमाचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कळमेश्वर बाजार चौकातील सिद्धिविनायक गणेशोत्सव मंडळाचे वतीने गणेशोत्सव विविध धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमासह. आरोग्य तपासणी शिबिर स्वच्छता अभियान व महाप्रसाद अन्य कार्यक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. फोटोमध्ये सिद्धिविनायक गणेश उत्सव मंडळ बाजार चौक येथील आकर्षक गणेश मूर्ती माता पार्वती चें पाय चेपत असताना गणेश भगवान व पंख्याने हवा घालत असताना कार्तिक भगवान दिसत आहे.

# केंद्रीय पोलीस दलातील स्वयंसेवी निवृत्त हवालदार सैन्य आणि पोलिसांचे मोफत प्रशिक्षण देणार

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १५ :



केंद्रीय पोलिस दलातील स्वयंसेवी निवृत्त हवालदार चंद्रशेखर अगुर्लेवार यांनी भारतमातेसाठी देशभक्तीची भावना जिवंत ठेवण्याचा एक अनोखा मार्ग शोधला आहे. कामठीतील शास्त्री चौक मच्छीपुल येथील रहिवासी केंद्रीय पोलिस दलाचे माजी हवालदार चंद्रशेखर अरगुलेवार सध्या तेजस बहुउद्देशीय संस्थाद्वारे चालवल्या जाणाऱ्या तेजस प्रशिक्षणाद्वारे शहर आणि ग्रामीण भागातील तरुणांना सैन्य आणि पोलिसात सामील होण्यासाठी मोफत प्रशिक्षण देत आहेत.

तेजस संस्थाचे संस्थापक/अध्यक्ष आणि प्रशिक्षक म्हणून त्यांनी १० हजार तरुणांना सैन्य आणि पोलिसांसाठी तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे आणि तेजस प्रशिक्षणाच्या नावाने प्रशिक्षण सुरू आहे जिथे ते तरुणांना सैन्य आणि पोलिसात सामील होण्यासाठी प्रशिक्षण देतात.

तेजस प्रशिक्षणाद्वारे, परिसरातील तरुणांना सीआरपीएफ सीआयएसएफ, बीएसएफ, पोलिस, नेव्ही, आर्मी आणि एअर फोर्स परीक्षांसाठी मोफत शारीरिक आणि लेखी परीक्षेचे प्रशिक्षण दिले जात आहे. ते त्यांच्या देशातील अनेक राज्यांमध्ये मोफत भरतीपूर्व प्रशिक्षण देत आहेत. या प्रतिभेला लक्षात घेऊन ते महाराष्ट्रातील चिखलदरा येथील आदिवासी तरुणांना प्रशिक्षण देतील.

महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील (चिखलदरा) रहिवासी आणि मेळघाट योद्धा विद्रोही विचार मंचचे संस्थापक/अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते सचिनभाऊ गोरले यांनी पत्रव्यवहार आणि दूरध्वनीद्वारे चंद्रशेखर अरगुलेवार यांच्याशी संपर्क साधला आहे आणि चिखलदरा अमरावती जिल्ह्यातील तरुणांना सैन्य आणि पोलिस प्रशिक्षण देण्याचे आवाहन केले आहे. ज्यावर सचिन गोरले यांच्या विनंतीला स्वीकारून चंद्रशेखर अरगुलेवार १३ तारखेला कामठी येथून १४ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ दरम्यान चिखलदरा येथील ६०० तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी रवाना होत आहेत.

## उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १५ :

येथील डॉ. आंबेडकर नगर, पंचशील चौक निवासी सुरज मधुकर शेंडे ( वय ३२) या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवार १३ सप्टेंबर रोजी घडली. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, सुरज शंकर नगर येथील ह्युसेगमेंट ग्लोबल सोल्युशनह्न या कंपनीत कार्यरत होता. शनिवारी संध्याकाळी ६.३० वाजता तो अचानक चक्कर येऊन कोसळला. सहका?्यांनी त्याला प्रथम जवळच्या दवाखान्यात नेले. येथील डॉक्टरांनी हृदयविकार व डोक्याशी संबंधित समस्या असल्याचे सांगत त्याला इतरत्र हलविण्याचा सल्ला दिला. त्यानंतर नातेवाईकांनी तातडीने त्याला किंग्सवे रुग्णालयात दाखल केले.

रुग्णालयात सुरज शुद्धीवर होता व नातेवाईकांशी बोलत होता. तपासणीत डोक्यातील नसात रक्ताची गुठळी आढळल्याचे डॉक्टरांनी सांगत इंजेक्शन देण्याचा सल्ला दिला. मात्र इंजेक्शन दिल्यानंतर काही वेळातच सुरज बेशुद्ध झाला व अखेर रात्री १.२० वाजता मृत घोषित करण्यात आला. या घटनेनंतर नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणावर आक्षेप घेत आक्रोश केला. मृदू स्वभावी, संयमी व घरचा आधारवड ठरलेला सुरज अचानक गेल्याने परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातील नागरिकांनीही या घटनेवर शोक व्यक्त केला. रविवारी आंबेडकर नगर येथील घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कॅप्टन सतीश बेलसरे यांचा शहर विकास मंचद्वारे सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १५ :

कन्हान शहरात पहिल्यांदाच कन्हान यूथ फाउंडेशन आणि आनंदधाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने युवकासाठी आणि परिवारासाठी आईये धन्यवाद करे माता - पिता का ...! या विशेष कार्यक्रमाचे आयोजन शनिवार ला कुलदीप मंगल कार्यालय येथे करण्यात आले होते.

अंतरराष्ट्रीय व्याख्याते भाविन जे. शहा यांनी आपल्या व्याख्यानातुन आई वडिलांबाबत योग्य मार्गदर्शन करुन उपस्थित युवकांना, पालकांना अलिंगण घालुन अश्रुच्या धारांनी भावनात्मक भावविभुर करुन आई वडिलांचे अतुट नाते असल्याचे प्रगटन केले. शहरात पहिल्यांदा झालेल्या या कार्यक्रमाची सर्वत्र कौतुक होत आहे. कन्हान शहर विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी या समाजिक उपक्रमाचे नियोजन केल्याबद्दल रविवारला संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर यांचा प्रमुख उपस्थिती मध्ये कॅप्टन सतीश बेलसरे यांच्या निवास्थानी जाऊन शॉल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन अभिनंदन केले. या प्रसंगी कन्हान शहर विकास मंच संस्थापक अध्यक्ष ऋषभ बावनकर, मार्गदर्शक भरत सावळे, माजी मुख्याध्यापिका विशाखा ठमके, लोकेश दमाहे, अभिषेक साखरे, मुकुल शिवरकर, निखिल मेश्राम, साहिल सैय्यद, शुभम बावनकर, आयुष संतापे, अभय ऊके, रुजल मेश्राम सह आदि सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

## शिक्षक सन्मान कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १५ :

गायत्री परिवार नागपूर आणि भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा, जिल्हा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त आयोजित शिक्षक सन्मान समारोह मौदा येथील वृंदावन लॉन येथे नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात शिक्षकांचा सन्मान करण्यात आला तसेच भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षेच्या महत्त्वावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक दिनेशर ढोबळे होते, तर मुख्य अतिथी म्हणून माजी नगराध्यक्षा भारती सोमनाथे, मॉडर्न हायस्कूल कोराडीच्या सीमा बत्रा, गायत्री शक्तीपीठ नागपूरचे व्यवस्थापक प्रेमसिंह बैस, भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा प्रमुख. वासुदेव चंदनखेडे आणि जयश्री काळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वासुदेव चंदनखेडे यांनी केले. त्यांनी भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत कशी वाढ होते आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी पूर्वतयारी कशी होते, यावर मार्गदर्शन केले. सीमा बत्रा यांनी राष्ट्रीय शिक्षण नीतीवर सविस्तर मार्गदर्शन केले.

## ८८३ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. १५ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ८८३ वाहन चालकांवर कारवाई करून १८,६२,३०० रुपयांचा दंड वसूल केला.

त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये १८ व एनडीपीएस अन्वये १ अशा १९ प्रकरणात १९ आरोपींवर कारवाई करून १,१३,४५० रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ४ प्रकरणात ५ आरोपींना अटक करून ४,३१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# रामटेक शहर युवासेना, महिला आघाडी कार्यकारिणी घोषित

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १५ :



दि.१३ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या मार्गदर्शनात युवासेना व शिवसेना महिला आघाडी कार्यकरणीची घोषणा करण्यात आली. यांत नवीन पदभार स्वीकारणाऱ्या शिवसेना पदाधिकारी यांना आशिष जयस्वाल यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

यात अमित आकरे, प्रफुल शेंद्रे,वृषभ महाजन, शिवराम नागपुरे,आकाश अहिरकर, सागर जथरे, राजेश येणूरकर, रोहन जनबंधू, सौरभ थोटे, कुणाल महाजन, जितेंद्र कछवाह, विक्की महाजन, आशा राऊत, खुशबू इनवाते, अर्चना मेश्राम, दिक्षा शेंद्रे, सुरेखा सायरे, शुभांगी महाजन, सविता शेंडे, दिक्षा मोहनकर, अनिता बैस,चेतना महाजन, कोमल कुल्लरकर, स्विटी महाजन, सीमा राजगिरे, पूनम कांबळे, विजेता खंडारे, निशा वाढकर, सोनाली कोहळे, सह अनेकांना शिवसेना व युवासेना चे नियुक्ती पत्र देण्यात आले.

अंशी टक्के समाजकारण, वीस टक्के राजकारण या तत्त्वाला अनुसरुन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या कार्याने प्रभावित होऊन युवासेनेत व शिवसेनेत मोठ्या संख्येने युवक व महिला प्रवेश करत आहेत. ना. आशिष जयस्वाल यांनी रामटेक शहरात व विधानसभा क्षेत्रात केलेले कार्य लोकांपर्यंत काम करण्याचे आव्हान बिकेंद्र महाजन यांनी सर्व नवनियुक्त युवासेना व शिवसेना महिला आघाडी पदाधिकाऱ्यांना केले असून दोन्ही शहर प्रमुखांनी दिलेल्या माहितीनुसार ज्यांना जी जबाबदारी दिली आहे. त्यानुसार रामटेक शहरातील शाखेचे फलक १७ वॉर्डांत लवकरात लवकर लावण्याचे आदेश दिले.

येत्या काही दिवसांत युवासेना व शिवसेना महिला आघाडीचा मेळावा घेण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

याप्रसंगी शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, शिवसेना महिला आघाडी रामटेक तालुका प्रमुख रश्मीताई काठीकर, शहर आघाडी प्रमुख लक्ष्मी म्हात्रे, माजी नगराध्यक्षा नलिनीताई चौधरी, माजी न. प. सभापती बिकेंद्र महाजन, युवासेना शहर प्रमुख सौरभ सिंगनजुडे, मेघा निरुडवार, शारदा इंदोरकर, मेघा वंजारी, ज्योती पडोळे उपस्थित होते.

## निधन

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १५ :



शहरातील गोयल टॉकीजचे संस्थापक आणि संचालक श्री भवानी शंकर गोयल जी यांचे आज १५ सप्टेंबर रोजी निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या मागे एक मोठा परिवार आहे. उद्या १६ सप्टेंबर रोजी, अंत्ययात्रा त्यांचे निवासस्थान गोयल टॉकीज येथून सकाळी १० वाजता निघेल आणि अजनी येथील मोक्षधाम येथे नेण्यात येईल.

# सोयाबीन पिकावर येलो मोझालमूळे पिके उध्वस्त

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १५ :



भिवापूर तालुक्यातील उभे सोयाबीन पिक येलो मोझाकमुळे खराब झाले असून याबाबत भगवानपूर, तिडलेपार, खुसार्पार, पोळगाव, सायगाव येथील शेतकऱ्यांनी आज दि. १५ सप्टेंबरला दुपारी तहसिलदार बाळासाहेब टेंडे यांना निवेदन सादर करून तातडीने नुकसान भरपाई ची मागणी लावून धरली आहे. तालुक्या तील नांद, कारगाव व मालेवाडा सर्कल मधील शेतकऱ्याच्या शेतात उभ्या सोयाबीन पिकावर येलो मोझाक मुळे पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी चांगलांच आर्थीक अडचणीत सापडला आहे. यावेळी शेतकऱ्यांनी एकत्र येत असून यावेळी निवेदन सादर करतेवेळी नक्षी सरपंच अनिकेत वराडे, भगवानपूर सरपंच हरीचंद चौधरी, बेसूर सरपंच रविंद्र राऊत, विजय हेमराज भुसारी, रुपेश धरत, सुनिल सवाई, मारोती मेश्राम, रोशन चौधरी, जगदीश आत्राम, संजय उमक, प्रकाश धरत, दिलीप सवाई, शेषराव टोनपे, अशोक वाघ व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कधी आवरणार या पॉलिथिन नावाच्या राक्षसाला?



रोजच्या विविध गावे व शहरे यांच्या पूरग्रस्त, पाण्याने वेढलेल्या अवस्थेतील छायाचित्रे व बातम्या ऐकून आधीच दडपून गेलेल्या मनाने जेव्हा आपल्या नागपूर शहरातून फेरफटका मारत असताना माज्या व समस्त लोकांच्या डोळ्यांना जे दिसून येते ते प्रशासनास दिसत नाही की त्यांनी स्वतः च्या डोळ्यांवर झापडे बांधून घेतलीत? शहरात, विशेषतः बेसा, मानेवाडा रोड, वानाडोंगरी, हिंगणा बाहदुरा आणि त्यांच्या आसपासच्या परिसरात पोलिथिनच्या पिशव्यांवर बंदी असताना, पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांची विक्री, साठा,आणि उपयोग धडल्ल्याने सुरू असल्याचे आढळते. पोलिथिनबंदीच्या सुरवातीच्या काळात पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांच्या साठा,गोदामे, यांच्यावर अगदी जोमाने धाडी टाकणे, दुकानदारांच्या कडून दंड वसूली करणे वगैरे बाबी सुरू होत्या. या कारणामुळे काही दिवस त्याचा परिणाम दिसून येत होता. पण आज बघता, पुन्हा येरे माज्या मागल्या म्हणायची वेळ आलेली आहे. या परिसरातीलच नव्हे तर आजू बाजूच्या छोट्या छोट्या गाव खेड्यांत देखील दुकानांच्या, रोड वरील भाजीपाला विकणाऱ्या ढकलगाड्या यांचे कडून पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांची सरेआम आणि खुलेआम विक्री व वापर होताना दिसतो. दुकानदार बेधडक अप्रमाणित जाडीच्या पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांची विक्री करतात तसेच ग्राहकांना त्यात वस्तु आणि भाज्या बांधून देतात. एव्हढेच नव्हे तर नुकत्याच पार पडलेल्या श्रीगणेशोत्सवातील महाप्रसाद, घरगुती वाढदिवस, वगैरे समारंभातील भोजन, पाट्यां ह्यात थमाकोल व प्लास्टिकचे ग्लास खुल्ले खुल्ले वापरले जात असताना आढळले. सुरवातीला गुपचुप, लपुनछापून पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांची विक्री किंवा उपयोग होत असे, आजकाल तर ह्याच धाडी टाकणाऱ्या खात्यांतील कर्मचारी आणि अधिकारी स्वतः च असल्या पोलिथिन पिशव्यांच्या मधून भाज्या आणताना दिसतात.

मोठी आणि धडा शिकविणारी कारवाही होत नसल्याने उपयोग करणारे निर्ढावले आहेत. या पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांच्या उपयोगानंतर लोक त्यांना इकडे तिकडे फेकून देतात. त्याने जागोजागी प्ल्यास्टिक कचरा पडलेला, वाऱ्याने उडतांना दिसतो. हाच कचरा नंतर नाल्या तुंबणे, गटारे चोकप होणे , पावसाचे पाणी वाहून न जाणे , परिणामी समस्त गाव किंवा शहर पाणी पाणी पूरग्रस्त होणे अश्या भीषण परिणामांना करणीभूत ठरु शकतो.

गावातील भटकी जनावरे, कुत्री, गायी, बकऱ्या वगैरे उकिर्ड्यांवरील पदार्थ शोधून खात असतात. त्यांच्या पोटात आजाणते पणे जाणारा हा प्लॅस्टिक कचरा, त्या मुक्या प्राण्यांच्या जीवाशी खेळच म्हटला पाहिजे. ह्याच पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्या वाऱ्याने उडून आझु बाजूच्या शेती, जंगल परिसरांतही पसरून वन्यपशुपक्षांच्या देखील हानी साठी कारणीभूत ठरतो. दररोज शहरात जमा होणाऱ्या शेकडो टन कचऱ्यातील जवळ जवळ तीस टक्के कचरा हा प्लॅस्टिक कचरा असतो असे समजते.



वार्तापत्र
राजेंद्र सांभारे
हिंगणा बेसा

पोलिथिन हे कोठल्याही स्वरुपात हानिकारकच असते हे सर्वज्ञात आहे. ते जळाले तर विषारी वायु, धूर वातावरणात पसरतो. जमिनीत गाडले गेल्यास जमिनीची सुपीकता नष्ट करते. पाणी प्रदूषण, वायु प्रदूषण, ड्रेनेज सिस्टिम तुंबविणे, मानवाच्या प्रकृतीवर होणारे प्रचंड दुष्परिणाम, श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ, चक्कर येणे, यकृत व किडणी वरील प्लास्टिकचा धोका दायक परिणाम यांच्या बदल तर आपल्याला समाजमाध्यमांच्या द्वारे नित्य माहिती मिळताच असते. तर या पोलिथिन नावाच्या राक्षसाला कोण, कधी, आणि कसे आवरणार? हाच प्रश्न आहे. ज्यांनी ह्यास आवर घालायचा त्याच खात्यांतील कर्मचारी, अधिकारी, हे या पोलिथिनच्या अत्यंत पातळ पिशव्यांच्या दुकानदार आणि उपयोगकर्ते यांना कारवाईची भीती दाखवत त्यांच्याशी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करतात असेही काही दुकानदारांनी सांगितले.

# वाडीत रक्तदानाने कमल कनोजे यांचा वाढदिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १५ :



रक्तदान, श्रेष्ठदान, वाचवी लाख मोलाचे प्राण या उक्तीने प्रेरीत होऊन सार्वजनिक शिवमंदीर ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा वाडी मंडळाचे उपाध्यक्ष कमल कनोजे यांच्या वाढदिवसानिमीत्य सार्वजनिक शिवमंदीर ट्रस्ट, शिवमेडीकल व शिव कन्या हेल्थ सेंटर यांच्या सयुंक्त सहकार्याने रविवार१४ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी रक्तदान शिबीरात ५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर ३०० नागरीकांची निशुःल्क आरोग्य तपासणी करुन औषधोपचार करण्यात आला.

यावेळी नरेश चरडे, सरपंच देवराव कडू,आनंदबाबू कदम, कैलाश मंथापूरवार, जितेंद्र रहांगडाले, विक्रम तिजारे, सुजित नितनवरे, सरपंच ज्योत्सना नितनवरे, राकेश मिश्रा, गोविंदराव रोडे, श्याम मंडपे, जतिन कनोजे, डॉ.स्वप्नील चौरे, सुबोध शर्मा, योगेश शेंडे, ईशांत राऊत, अक्षय तिडके, सुधिर सिंग, अभिजित जोशी, कांचन माने, आकाश पवार, विशाल डोंगरे, अनिल घागरे, जैन वैद्य, राहूल तायडे, अशोक गायकवाड, बाप्पूसाहेब लिमकर, राजेंद्र बिसेन, चंदु वैद्य, राकेश शिवणकर, ज्ञानेश्वर चोपडे, सुनील कुबडे, चंद्रशेखर देशभ्रतार,सतिश नांदनकर, सुरेश बिलोणकर, देवा खाटीक, राजु गोरे, महेंद्र कडू, खुशाल सोरते, धर्मेंद्र कनोजे, शुभम चंदनकर, नितीन सावरकर, अमोल कनोजे, अंकीत भोंडेकर, आर्यन शर्मा, उत्कर्ष नांदनकर, अनिकेत पटले, रामु कावडे, कुनाल पिरोडिया, शैलेश माहूलकर, अंकीत कासार उपस्थित होते.

## जीएसटी सुधारणांमुळे राष्ट्रीय विकासाच्या चक्राला चालना : सीए मिलिंद कानडे

# जीएसटी सुधारणा हा विकसित भारताचे स्वप्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :



जीएसटी सुधारणांमुळे राष्ट्रीय विकासाच्या चक्राला प्रचंड चालना मिळेल. ही सुधारणा मूलभूतपणे प्रत्येक नागरिकावरील कराचा भार कमी करण्याबद्दल आहे. कमी केलेल्या करांमुळे, आपल्या लोकांच्या हातात अधिक पैसे येईल. याचा विशेष फायदा सामान्य माणूस, शेतकरी, लघु उद्योग मालक, कामगार आणि विशेषतः घराचे बजेट व्यवस्थापित करणाऱ्या फायदा होईल.

'सर्वत्र जीएसटी दर कमी केले आहेत!' १२% ब्रेकेटमधील ९९% आणि २८% ब्रेकेटमधील ९०% वस्तूंवर जीएसटी दर कपात लागू करण्यात आली आहे. यामुळे देशांतर्गत वापरात सुमारे २ लाख कोटी रुपयांची वाढ होईल, जो पीएमएवाय वाटपाच्या ४ पट आणि पीएलआय योजनेच्या १० पट आहे, ज्यामुळे भारताची अर्थव्यवस्था मजबूत होईल.

ट्रॅक्टर, ठिबक सिंचन प्रणाली, स्प्रिंकलर, ट्रॅक्टर टायर आणि सुटे भागांवरील जीएसटी ५% पर्यंत कमी करण्यात आला आहे.जीएसटीमुळे राज्यांच्या सीमावर्ती चेकपोस्ट काढून टाकण्यात आल्यामुळे, जीएसटीमुळे ट्रक प्रवासाचा वेळ ३०% पर्यंत कमी झाला आहे.

१ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू झाला तेव्हा १७ वर्षांची दीर्घ प्रतीक्षा संपली.या सर्व कारणांमुळे २५ कोटी लोक बहुआयामी गरिबीतून बाहेर पडले आहेत आणि आपला देश जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे.

दर कपातींचा फायदा प्रत्येक नागरिकाला, प्रत्येक कुटुंबाला, शेतकरी, गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना, लहान आणि मोठे उद्योगांना, व्यापार्यांना आणि व्यावसायिकांनाही होईल. विरोधकांनी, विशेषतः कॉंग्रेस पक्षाने, कितीही नकारात्मक राजकारण केले तरी, मोदी सरकार विकासाचे राजकारण करण्यास वचनबद्ध आहे

असे मत पत्रकार परिषदेत भाजपा प्रदेश प्रवक्ते सीए समीर बाकरे आणि सीए मिलिंद कानडे यांनी व्यक्त केले. त्यावेळी उपस्थित सीए संदिप सुराना, महासचिव सीए यश वर्मा, सीए.संदिप ज्ञोतवानी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत नागपूर ग्रामीण संघ ठरला अव्वल

## १४ वर्षाखालील मुली व मुलांचे दोन्ही संघ विजयी

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १५ :

नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या मार्फत स्थानिक बनारसीदास रुईया हायस्कूलच्या मैदानावर आयोजित जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत 14 वर्षाखालील मुली व मुलांच्या गटात नागपूर ग्रामीणच्या माऊंटफोर्ट शाळेच्या दोन्ही संघाने बाजी मारली.

काटोल तालुक्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बनारसीदास रुईया हायस्कूलच्या मुली व मुलांच्या दोन्ही संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन बनारसीदास रुईया हायस्कूल कमिटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश अग्रवाल, सहसचिव संकेत चांडक, बी. आर. कॉन्व्हेंटच्या प्राचार्या श्रीमती अरुणा पवार, काटोल तालुका क्रीडा समितीचे सहसचिव परेश देशमुख आदींची उपस्थिती होती.

तर बक्षीस वितरण बनारसीदास रुईया हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती वंदना काळे व पर्यवेक्षक हिरामण सोमकुवर यांच्या हस्ते पार पडले. पंच म्हणून राहुल नोरोलिया, वेदांत देव्हारे, चिराग वानखेडे, कुणाल वंजारी, यश लोही, नयन गाढवे, हिमांशू चरडे, रौनक खेडकर, अंकित खोब्रागडे यांनी कार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक धीरज ढोले यांनी केले तर आभार प्रतीक सावरकर यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता क्रीडा शिक्षक महेंद्र खडसे, सागर ढोके, पराग करांडे, अमित कोट्टेवार, कौस्तुभ पवार आदींनी सहकार्य केले.



**खेळा आणि शिका : डॉ. दिलीप चांडक**
जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना बनारसीदास रुईया हायस्कूल कमिटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक यांनी खेळासोबत अभ्यासही महत्त्वाचा आहे, खूप खेळा आणि खूप शिका असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

# ललित कला भवन मैदानाची दुर्दशा

■ प्रमोद जांभूळकर
नागपूर, दि. १५ :



विकासाच्या प्रतीक्षेत खेळाडू व नागरिक

पोलीस भरतीपूर्वी दरवर्षी 1000 ते 1500 युवक, युवती जेथे सराव करायचे, आपल्या भविष्याचे स्वप्न बघायचे, जिथे कलावंत घडवणारे रंगमंच होते, नाट्यप्रयोग व्हायचे असे उत्तर नागपूर येथील प्रभाग क्रमांक 2 व 7 यांच्या मधोमध असलेले ललित कला भवनचे खेळाचे मैदान सध्या दयनीय अवस्थेत आहे. यामुळे खेळाडूंचा व कलावंतांचा आधारवडच उमळून पडला आहे. मैदानातील वाढलेले गवत, साचलेला कचरा, खराब रस्ते, अपुरी कुंपण व्यवस्था यामुळे नागरिक नाहक त्रास सहन करीत आहेत.

. स्थानिक नागरिक व तरुणांनी याच्या स्वच्छतेसाठी आणि विकासासाठी आवाज उठविला आहे. मैदानातील वाढलेले गवत, साचलेला कचरा, अपुरी कुंपण व्यवस्था आणि खराब रस्त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. दरवर्षी पोलिस भरतीपूर्वी या मैदानात सुमारे १००० ते १५०० युवक-युवती सराव करतात. मात्र, सध्या मैदानाची परिस्थिती पाहता सराव करणे कठीण झाले आहे. मैदानाच्या चारही बाजूंनी अपुरा तारेचा कुंपण आहे, संरक्षण भिंत नाही. जागोजागी कचरा साचलेला असून, प्रवेशद्वाराजवळचा रस्ताही उखडलेला आहे. या अस्वच्छतेमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, गवतामुळे गवती किड्यांचा त्रासही वाढला आहे.

सामाजिक कार्यकर्ते सुबोध साखरे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत सांगितले की मैदानात साठवलेल्या सुका व ओला कचऱ्यामुळे आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे. मैदानात नियमित स्वच्छता व देखभाल होणे अत्यंत गरजेचे आहे. स्थानीय रहिवासी अजय सहारे म्हणाले पूर्वी येथे खुले रंगमंच होते, नाट्यप्रयोग व्हायचे, अनेक कलाकार या केंद्रातून घडले. परंतु आता कोणतेही सांस्कृतिक कार्यक्रम होत नाहीत. सभागृह फक्त भाड्याने दिले जाते. तरणताल मंजूर झाले असले तरी त्याची उभारणी कधी होईल याची कल्पना नाही. प्रा. डॉ. अभय शेंडे म्हणतात नागपुरात खासदार खेळ महोत्सव, सांस्कृतिक महोत्सव होत असताना उत्तर नागपूरच्या या मैदानाची दयनीय अवस्था ही शोकांतिका आहे. 300 ठिकाणी खेळांचे मैदान साकारले जातील. लाखो मुलांना खेळण्याची संधी मिळेल, अशा घोषणा अमरावती मार्गावरील ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार उड्डाणपुलाचे भव्य लोकार्पण च्या कार्यक्रमात झाल्या. मग उत्तर नागपूरकडे दुर्लक्ष का? राजेश पासपुलकर यांची खंत आहे की या मैदानावर पूर्वी हॉकी, फुटबॉल, क्रिकेट, वॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, कॉर्फ बॉल, टेबल टेनिस अशा अनेक खेळांचा सराव व स्पर्धा होत असत. अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू या मैदानातून घडले, परंतु आज तेच मैदान उपेक्षित आहे.या मागणीला अमर गौरखेडे, अर्पित मनोहर, संदेश बागडे, कमलेश बागडे, लोकेश बंसोड, सौरभ वासनिक, शैलेश बोदिले, अनुप राहाटे, प्रशांत साखरे, हेमराज जांभूळकर, सत्यजित लांजेवार, सुमित नागदवणे, देवानंद पानतावणे, सिद्धार्थ सहारे आदी स्थानिक नागरिकांनीही भरघोस पाठिंबा दिला.

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १५ :

जबलपूर ते नागपूर महामार्गावरून येणाऱ्या आयशर वाहनातून २८ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित तंबाखू जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई (१४ सप्टेंबर) दुपारच्या सुमारास करण्यात आली. पोलिसांनी सापळा रचून आयशर क्रमांक यूपी ८०/ केटी १०५७ छापा मारला. वाहनाची तपासणी केली असता त्यात ५० मोट्या पोत्यांमध्ये एकूण दोन हजार किलो सुगंधित तंबाखू आढळून आला. जप्त मालाची किंमत आठ लाख ५० हजार रुपये व वाहनाची किंमत २० लाख, अशी एकूण २८ लाख ५० हजार रुपये आहे. या प्रकरणी पोलिसांनी चालक राशिक खान व राहुल राठोड आदींना ताब्यात घेतले. सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे देवलापार येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# दवलामेटीत विवाहित तरुणाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १५ :

सम्राट अशोक नगर येथील धिरेन्द्र नामदेव बागडे (वय ४२ वर्षे) यांनी सोमवारी सकाळी साडेदहा ते अकरा वाजताच्या सुमारास राहत्या घरातील किचनमध्ये सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी सव्वादहा वाजता घरात काही इलेक्ट्रिक फिटिंगचे काम करण्यासाठी वायरमन पहिल्या मजल्यावर गेले. दरवाजा ठोठावूनही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दरवाजा ढकलला असता धिरेन्द्र बागडे हे फॅनला लटकलेल्या अवस्थेत दिसून आले. त्याचवेळी त्यांच्या वडिलांनी आरडाओरड केली. त्वरित याची माहिती वाडी पोलिस स्टेशनला देण्यात आली.सूचना मिळताच पीएसआय सतीश गुलबे टिमसह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी प्रेत खाली उतरवून पंचनामा केला.

# माजी पोलिस महासंचालक डी. शिवानंदन यांच्या पुस्तकाचे प्रकाशन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

मुंबई शहरात ९० च्या दशकात अनेक गंभीर आव्हानांचा सामना करावा लागत होता. त्यावेळी मुंबई पोलिसांनी दाखवलेले धैर्य, शिस्त आणि कार्यकुशलता ही खरोखरच प्रशंसनीय होती. मुंबईच्या गुन्हेगारी विश्वावर अनेकांनी लेखन केले, चित्रपटही साकारले गेले, परंतु या पुस्तकाच्या माध्यमातून त्या काळाचे वस्तुनिष्ठ चित्रण नव्या पोलिस अधिकाऱ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक तसेच नागपूर शहराचे माजी पोलिस आयुक्त डी. शिवानंदन यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने लेखन केलेल्या दी ब्रम्हास्त्र अनलॅश्ड पुस्तकाचा प्रकाशन सोहळा चिटणवीस सेंटर, सिव्हिल लाईन्स येथे पार पडला. त्या प्रसंगी पोलिस आयुक्त सिंगल बोलत होते. व्यासपीठावर डी. शिवानंदन, सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सिंगल म्हणाले की, अभ्यासपूर्ण पद्धतीने लेखन असलेल्या या पुस्तकामुळे महाराष्ट्र पोलिस दल तसेच सर्वसामान्य जनतेला त्या काळातील परिस्थितीचे वास्तव समजून घेण्यास निश्चितच मदत होईल. सेवानिवृत्त पोलिस महासंचालक व लेखक डी. शिवानंदन यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ह्यनागपूर व मुंबई या दोन्ही ठिकाणी कार्य करण्याची संधी मला लाभली. मुंबईतील गुन्हेगारी जगतातील विविध पैलू वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे. हे पुस्तक वैयक्तिक अनुभव मांडण्यासाठी नसून संपूर्ण महाराष्ट्र पोलिस दलाला समर्पित केले आहे.

याप्रसंगी पोलिस उपायुक्त निकेतन कदम, नित्यानंद झा, महक स्वामी, ऋषिकेश सिंगारेड्डी तसेच अपर पोलिस आयुक्त शिवाजी राठोड आणि राजेंद्र दाभाडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बगारिया तसेच रोटी बँक संस्थेचे सदस्य यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महासागर प्रभाग वार्ता

# पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटवा, नागरिकांची मागणी

किरण बेलूरकर,
नागपूर दिनांक १५



प्रभाग क्रमांक ३५ मनिषनगर परिसरातील मनीष नगर ते अंडरग्राऊंड रेल्वे पूल मार्गावर असलेल्या फुटपाथ मार्गावर भाजीपाल्याचे दुकाने, फळांची दुकाने, पानटपऱ्या यांनी केलेले अतिक्रमण हटविण्याची मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

या मार्गावर सकाळी आणि संध्याकाळी ज्येष्ठ नागरिक फिरायला जात असतात पादचारी मार्गावर अनेक दुकानदारांनी आपली दुकाने थाटून अतिक्रमण केल्याने ज्येष्ठ नागरिकांना मुख्य रस्त्याने वाटचाल करावी लागते. मुख्य रस्त्याने अनेक वाहन चालक सुसाट वेगाने वाहत चालवीत असल्याने ज्येष्ठांना बराच त्रास सहन करावा लागतो. या मार्गावर भाजीपाल्याचे दुकाने,फळाचे दुकाने, पान टपऱ्या,नाश्ता सेंटर आणि प्रॉपर्टी डीलर यांनी अतिक्रमण केले आहे.या दुकानामध्ये येणारे ग्राहक चक्क रस्त्यावर आपली वाहने उभी करीत असतात. रस्त्यावर खड्डे आणि पाणी साचत असल्याने अनेक जेष्ठ नागरिक पादचारी मार्गाचा वापर करतात परंतु पादचारी मार्गावरील अतिक्रमण ज्येष्ठांसाठी डोकेदुखी ठरत आहे .तसेच शताब्दी चौक ते बेलतरोडी कडे जाणाऱ्या मार्गावर चक्क चिकन सेंटर आणि भंगार ची दुकाने आहेत.त्यामुळे नागरिकांना फूटपाथ वरून चालणे कठीण झाले आहे.पादचारी मार्गावर कुणाच्या आशीर्वादाने अतिक्रमण करण्यात आले हेच कळत नसल्याची व्यथा या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली.



या पादचारी मार्गावरील अनधिकृत अतिक्रमण त्वरीत हटवून हा मार्ग जेष्ठा नागरिकांसाठी मोकळा करून द्यावा अशीही मागणी या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे.

# पाटणकर चौकात कचऱ्याचा डोंगर, दुर्गंधी व रोगराईचा धोका

प्रभू गजभिये,
नागपूर दि. १५



पाटणकर चौक प्रभाग क्रमांक २ येथील बाल सुधार गृहाच्या संरक्षण भिंतीलगत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा साठा झालेला असून, या दुर्गंधीयुक्त कचऱ्यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. विशेष म्हणजे, या साचलेल्या कचऱ्यात जनावरे अन्न शोधत येतात आणि त्याचा अधिक प्रसार होतो. यामुळे जनावरांनाही त्रास होण्याची शक्यता असून, रोगराई पसरण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे.

या कचऱ्यामुळे परिसरात माशा आणि डासांचा प्रचंड त्रास वाढला असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथींचा धोका उभा ठाकला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.स्थानिक नागरिक चंद्रकांत रामटेके, सुदेश शेंडे, सुदर्शन मून, प्रकाश पाटील, मंगेश नागदेवे, युवराज सोनारे, शिशुपाल रंगारी, प्रशांत मुंघाटे आणि हेमराज जांभुळकर यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षाचा निषेध करत तातडीने स्वच्छतेची मागणी केली आहे.

अनेक वेळा तक्रारी करूनही आजवर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने स्थानिक प्रशासनाविषयी असंतोष वाढत चालला आहे.प्रशासनाने तातडीने या भागातील कचरा उचलून, नियमित साफसफाई आणि कीटकनाशक फवारणी करावी, अशी जोरदार मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

# रायसोनी एमबीए कॉलेज ते माधव नगरी रस्त्याची दुरावस्था

प्रफुल्ल पाटणकर,
नागपूर दि. १५



हिंगणा : वाघधरा परिसरातील राय सोनी एमबीए कॉलेज ते माधव नगरी दरम्यानचा मुख्य रस्ता अतिशय दुर्धर अवस्थेत असून नागरिकांना व पादचाऱ्यांना या रस्त्यावरून ये-जा करणे कठीण झाले आहे.

दररोज शाळकरी मुले-मुली, शाळेच्या बस व नोकरीला जाणारे नागरिक या मार्गाने प्रवास करतात. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने अनेकदा अपघातांचा धोका निर्माण होतो. पावसाळ्यात पाणी साचल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनते, तर रात्रीच्या वेळी या मार्गाने जाणे अत्यंत धोकादायक ठरते.

या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिकांनी अनेक वेळा इसासनी ग्रामपंचायतीतील संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली. मात्र अद्याप काहीही तोडगा निघालेला नाही. नागरिकांचे म्हणणे आहे की सकाळी व सायंकाळी या मार्गावरून मोठ्या प्रमाणात लोकांची ये-जा होते, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता जास्त आहे.रस्त्याची दयनीय अवस्था असूनही अधिकाऱ्यांकडून दुर्लक्षच होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

# भारत माता चौकात कचऱ्याचा डोंगर; नागपूरकरांचे आरोग्य धोक्यात

प्रमोद जांभूळकर
नागपूर दि. १५




प्रभाग २० लकडगंज जागनाथ बुधवारीतील भारतमाता चौकात, नागपूर महानगर पालिका झोन क्रमांक ६ अंतर्गत असलेल्या सुलभ शौचालयासमोर प्रचंड प्रमाणात कचऱ्याचा ढीग साचलेला आहे. या ठिकाणी दररोज गोमाता, खंडोबा आदी जनावरे खाद्यपदार्थांच्या शोधात येत असून, दूषित अन्न खाल्ल्याने त्यांच्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे यासोबतच घाण व दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य प्रभावित झाले आहे.

स्थानिक रहिवासी रूपेश टेंभुर्णे यांनी सांगितले की, येथे मोठी बाजारपेठ असून नागपूर शहरातील विविध भागांतून ग्राहक वर्ग येतो. दुकानांतील दुकानदार, कर्मचारी तसेच नागरिक या सुलभ शौचालयाचा नियमित वापर करतात. मात्र शौचालयासमोरच असलेली ही प्रचंड घाण माणसांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकते.या कचऱ्यामुळे परिसरात माशा व डासांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांमध्ये याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत असून, परिसरातील आशिष भोतमांगे, दिलीप भोतमांगे, मुकेश भोतमांगे, जावेद खान व इतर नागरिकांनी त्वरित कारवाईची मागणी केली आहे.नागपूर महानगरपालिकेने याकडे लक्ष देऊन त्वरित साफसफाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# नवी मंगळवारी येथे तुटलेले चेंबर, नागरिकांचे आरोग्य प्रभावित

प्रदीप पौनिकर,
नागपूर दि. १५

प्रभाग क्रमांक ५ अंतर्गत नवी मंगळवारी मध्ये अनेक ठिकाणी तुटलेले चेंबरआहे.झोन स्तरावर अनेकदा निवेदने देऊनही काम जसे चे तसेच आहे.रस्त्यावरील गडर चे चेंबर तुटल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मुसळधार पाऊस आल्यास प्रभागात नागरिकांवर संकट येण्याची शक्यता आहे

मागील दोन वर्षापासून प्रभाग स्तरावर लहान सहान कामासाठी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. अधिकारी तक्रारीची दखल घेत नाही दुसरीकडे मनपा ची आर्थिक स्थिति बिकट असल्याचे नागरिकांना सांगतात.झोन स्तरावर तक्रार केली तर संबंधित कामासाठी आर्थिक तरतूद नसल्याचे सांगितले जाते. नागरिकांकडून कोट्यावधी रुपयांचे कर घेणारे कर्मचारी व अधिकारी स्वतःच्या स्तरावर खर्च करीत आहे. परंतु नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पैसा नाही आम आदमी पक्षाच्या वतीने प्रशासनाला



तुटले चेंबर दुरुस्त करण्याचे निर्देश दिले आहेत जर चेंबर दुरुस्ती झाली नाही तर आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आम आदमी पक्षाच्या वतीने देण्यात आला..यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल संदीप साखरे, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, नागसेन सहारे, कृष्णा पाठराबे, अंशु बिरेवार, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, अनिल चांदेकर व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.